म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २२९६

# फुलराणी

— कुसुमाग्रज

REFBK-0021498
REFBK-0021498

भरती ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 DEC 1979
17 FEB 1980
UL 1980
13 JUL 1980
3 MAR 1982
6 OCT 1982

[क्रु. मा. प.]

# फु ल रा णी

मराठीचे सर्वश्रेष्ठ निसर्गकवी म्हणून बालकवी साऱ्या काव्य-रसिकांस परिचित आहेत. झाडाझुडपांत, दऱ्याखोऱ्यांत, निर्झर-नद्यांत, आकाश-अवकाशात ठायी ठायी भरलेले दिव्य सौंदर्य त्यांनी बेभान होऊन गोळा केलेले आहे. किंबहुना रांगड्या मराठी मनाला निसर्गाच्या अलौकिक रूपाचे सूक्ष्म चमत्कार बघायला त्यांनीच शिकविले आहे. त्यांची संगीत-मय सुरेल कविता या किंवा त्या कालखंडाची, या किंवा त्या साहित्यिक वादाला साकार करणारी कविता नाही. ती निसर्गाचा अविभाज्य घटक म्हणून जगू पाहणाऱ्या महामानवाचीच चिरंतनाची व्यथा आहे.



२९४९८
९५।२५५.
M१०५

# फुलराणी

## बालकवींच्या निवडक कविता

संपादक : कुसुमाग्रज

प्रस्तावना : डॉ. रा. शं. वाळिंबे

CONTINENTAL PRAKASHAN
Rs 6/-
POONA 30

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

प्रकाशन क्रमांक : ५६४

CONTINENTAL PRAKASHAN
Rs. 6/-
POONA 30

पहिली आवृत्ती १९६८ ■ दुसरी आवृत्ती १९७०
तिसरी आवृत्ती १९७१

© सर्व हक्क सुरक्षित ■ [redacted]

प्रकाशक : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी रोड, पुणे ३०

मुद्रक : चिं. स. लाटकर, ‘ शिव-पार्वती ’
कल्पना मुद्रणालय, ४६१/४ सदाशिव, पुणे ३०

मुखपृष्ठ : प्रभाकर गोरे

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १ ते ६४ |
| १ | आनंदी-आनंद | १ |
| २ | अरुण | ३ |
| ३ | निर्झरास | ७ |
| ४ | मधुयामिनी | १२ |
| ५ | संध्यारजनी | १३ |
| ६ | फुलराणी | १६ |
| ७ | मंगलमय प्रेमकवन | १९ |
| ८ | तारकांचे गाणे | २० |
| ९ | संध्यातारक | २३ |
| १० | श्रावण मास | २५ |
| ११ | फुलपाखरूं-फुलवेली | २६ |
| १२ | बाल-विहग | २८ |
| १३ | तडाग असतों तर | ३१ |
| १४ | तृणपुष्प | ३३ |
| १५ | आनंदी पक्षी | ३५ |
| १६ | सुकलेलीं फुलें | ३६ |
| १७ | पांखरास | ३९ |
| १८ | अप्सरांचें गाणें | ४२ |
| १९ | कवि | ४३ |
| २० | कवीची इच्छा | ४५ |

| | | |
|---|---|---|
| २१ | काव्याची कल्पना | ४७ |
| २२ | शारदेस | ४८ |
| २३ | कवीचें अंतरंग | ५० |
| २४ | मी | ५१ |
| २५ | धर्मवीर | ५२ |
| २६ | यमाचे दूत | ६२ |
| २७ | दुबळें तारूं | ६३ |
| २८ | आवाहन | ६६ |
| २९ | शुक्रोदय | ६८ |
| ३० | अनंत | ६९ |
| ३१ | शारदीय सौंदर्यदेवता | ७० |
| ३२ | कवि-बाळें | ७१ |
| ३३ | ध्येय | ७५ |
| ३४ | प्रेमाचें गाणें | ७६ |
| ३५ | काळाचे लेख | ७८ |
| ३६ | प्रेम-लेख | ७९ |
| ३७ | सौंदर्याचा अभ्यास कर | ८० |
| ३८ | काल आणि जीवित | ८१ |
| ३९ | काळास | ८२ |
| ४० | दोष व प्रीति | ८३ |
| ४१ | जीर्ण दुर्ग | ८४ |

| | | |
|---|---|---|
| ४२ | तूं तर चाफेकळी ! | ८५ |
| ४३ | प्रीति हवी तर | ८६ |
| ४४ | पाऊस | ८७ |
| ४५ | उदासीनता | ८८ |
| ४६ | निरांशा | ८९ |
| ४७ | पारवा | ९० |
| ४८ | खेड्यांतील एक रात्र | ९२ |
| ४९ | कवीची इच्छा | ९३ |
| ५० | मोहिनी | ९४ |
| ५१ | हृदयाची गुंतागुंत | ९६ |
| ५२ | मेघांचा कापूस | ९९ |
| ५३ | औदुंबर | १०० |
| ५४ | शून्य मनाचा घुमट | १०१ |
| ५५ | विश्वाचा प्रवास | १०२ |
| ५६ | संशय | १०३ |
| ५७ | जिज्ञासु | १०४ |
| | या कवितांसंबंधी | १०५ |
| | कवितांच्या पहिल्या ओळींची सूची | १३३ |
| | कवितांच्या तळटीपा | १३६ |

# प्रस्तावना

## लेखक : डॉ. रा. शं. वाळिंबे

**पार्श्वभूमी :**

१९०७ साली जळगावी पहिले महाराष्ट्र-कविसंमेलन झाले. या संमेलनाने त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांना ‘ बालकवि ’ ही पदवी मिळवून दिली. या वेळी बालकवी सुमारे अठरा वर्षांचे होते. यानंतर दहा वर्षे त्यांनी कविता लिहिल्या. परंतु ज्यायोगे ‘ बालकवि ’ ही पदवी असार्थ ठरावी असे काहीही घडले नाही. ज्या बालत्वसुलभ कुतूहलाने त्यांनी आपली अगदी पहिली कविता लिहिली असेल त्या कुतूहलाचा पगडा शेवटपर्यंत त्यांच्या मनावर होता; आणि प्रथम निसर्गाचे वर्णन करीत असता ज्या अद्वितीय आनंदाने त्यांचे शरीर व मन पुलकित झाले असेल त्याच आनंदाने आयुष्यातील शेवटचे निसर्गगीत लिहीत असतानाही त्यांचे मन मोहरून गेले असले पाहिजे, यात कसलीच शंका नाही. भोवतालच्या जगात प्रत्यही पडणाऱ्या अनंत घटना त्यांच्या या बालत्वाला थोडीही बाधा करू शकल्या नाहीत.

**बालकवींची अलिप्तता :**

बालकवींच्या काव्यविषयक कर्तबगारीला सुरुवात होण्यापूर्वी वीस-पंचवीस वर्षे महाराष्ट्रात फार मोठी वैचारिक क्रांती सुरू झाली होती, व त्या क्रांतीची विविध स्वरूपे बालकवींच्या आसपास अमर्याद प्रभाव दाखवीत होती.

आपल्याभोवती घडत असलेल्या या प्रभावी घटनांपासून बालकवी मात्र सर्वस्वी अलिप्त राहिले. समाजात केवढी मोठी वैचारिक क्रांती घडत आहे, याचा पुसट देखील विचार त्यांच्या मनात आला नाही. आणि क्वचित् असा विचार त्यांच्या मनात डोकावला असला तरी तळहातात रुतलेले कुसळ जसे तापदायक व्हावे तसा तो विचार बालवींच्या हळव्या मनाला तापदायक होत असावा. केशवसुतांनी विशाल मानवतेचे ध्येय आपल्या काव्यात आविष्कृत केले, समाजातील विषमतेचे व अन्यायाचे जे पिढ्यान् पिढ्या बळी होते अशा असंख्य लोकांच्या मुक्या तळमळीला वाचा प्राप्त

करून दिली, आणि नवीन मानवाचे ध्येयवादी चित्र रंगविले. रेव्हरंड टिळकांनी ' वनवासी फुला 'च्या तोंडून मानवी जीवनातील अनेक विसंगतींचे आविष्करण केले व त्यांवर टीका केली. दलितांच्या दुर्धर सामाजिक परिस्थितीविषयी कळवळा उत्पन्न होऊन त्यांनी अंत्यजापेक्षाही नीच होऊन त्यांचा उद्धार करण्याची तळमळ बाळगली; वांशिक श्रेष्ठतेचे तत्त्व झुगारून देऊन ब्राह्मण व महार हे दोघेही मानवच असल्यामुळे त्यांच्या बाबतीत श्रेष्ठ-कनिष्ठतेचा आग्रह धरण्याचे कोणतेच कारण नाही, हे आग्रहाने सांगितले. परंतु या नवीन विचारसरणीचा प्रभाव या काळातील ज्या दोन कवींवर मुळीच झाला नाही ते म्हणजे एक बालकवी व दुसरे विनायक. ज्या सामाजिक अन्यायांमुळे केशवसुतांचे अंतःकरण उफाळून आले व त्यांचा सारा संताप त्यांच्या कवितांतून पुनःपुनः व्यक्त झाला त्या सामाजिक अन्यायामुळे विनायकांचे कविहृदय यत्किंचित् हलले नाही. वर्तमानकाळात स्पृहणीय असे काही न दिसल्यामुळे विनायकांचे मन विस्मृतीच्या धुक्यात गुरफटलेल्या आणि म्हणूनच विशेष आकर्षक भासणाऱ्या भूतकाळातील रोमांचकारी घटनांमध्ये रमले; त्या घटनांमध्ये त्यांना सौंदर्याचा साक्षात्कार झाला; रजपूत रमणींच्या रम्योज्ज्वल जीवितांमध्ये त्यांच्या प्रतिभेला निधान लाभले. वर्तमानकाळातील उद्‌ध्वस्त आणि उदासवाण्या जीवनाचा तिरस्कार आल्यामुळेच विनायकांनी आपल्या व्यथित मनाचे समाधान करण्यासाठी गतकालातील सुखद स्मृतींमध्ये स्वतःला गुरफटून टाकले.

जो प्रकार विनायकांच्या बाबतीत झाला तोच प्रकार बालकवींच्या बाबतीतही झाला—आणि तो अधिक तीव्रपणे झाला. भोवतालच्या जगातील घटनांचे सूक्ष्म अवलोकन करून त्यांचा आविष्कार काव्यात करण्यासाठी लागणारा कणखरपणाच त्यांच्यात नव्हता. मानवी जग दुःखाने आणि अनंत असह्य निराशांनी भरलेले आहे; याचा त्यांना पदोपदी प्रत्यय येत होता. पण या गोष्टींचा नुसता विचार करणेही त्यांना कठीण वाटत होते. समाजाच्या व्यथांना, तळमळींना, इच्छांना किंवा आकांक्षांना वाचा प्राप्त करून द्यावी हा त्यांचा मुळीच उद्देश नाही. बालकवींच्या कवितांत जी दुःखे आहेत ती त्यांची स्वतःची दुःखे आहेत. समाजाच्या दुःखांशी किंवा त्यांच्या इच्छांशी बालकवींच्या काव्याचा दुरून देखील संबंध आला नाही.

## भूतकाळात रमलेली वृत्ती :

आणि यामुळेच मानवी जीवनाचे ध्येय काय असावे, हे ध्येय मानवाला प्राप्त करून घेता यावे यासाठी कवीने काय करावयास पाहिजे, भविष्यकाळात आशा करण्या-सारखे काही असू शकेल काय ? इत्यादी अनेक गोष्टींविषयी बालकवी मुग्धच आहेत. भविष्याविषयी आशादायक स्वप्ने त्यांना कधीच पडली नाहीत. यामुळे–

The trumpet of a prophecy, O wind,
If Winter comes, can Spring be for behind ?

असा कणखर आशावाद शेलीप्रमाणे प्रकट करणे त्यांना जमले नाही. वर्तमानात काही समाधान नाही आणि भविष्याविषयी कसलाच आशावाद नाही अशी बालकवींच्या मनाची स्थिती आहे. राहता राहिला भूतकाळ ! आणि या भूतकाळातील दृश्यांशी आणि घटनांशी ते पूर्ण समरस झाले. त्यांना 'वीर मराठा' कुमार दिसला; 'जीर्ण दुर्ग' दिसला आणि 'दौलतरावांची राजस मंजुळा' दिसली !

भूतकालाच्या धुक्याआड दडलेल्या जुन्या दुर्गांची, पराक्रमी वीरांची आणि राजस रमणींची चित्रे पाहिल्यामुळे वर्मेमानकाळातील अनेक व्यथांनी गाजलेल्या त्यांच्या हळव्या मनाला विलक्षण विरंगुळा मिळाला असला पाहिजे. पण आपल्या तप्त मनाला रिझविण्यासाठी त्यांनी आणखी दोन गोष्टींचा आधार घेतला. आणि हाच आधार त्यांच्या खचू पाहणाऱ्या मनाला धीर देऊ शकला. प्रेम आणि सौंदर्य या त्या गोष्टी होत. या गोष्टींचा आत्यंतिक प्रभाव सर्व आयुष्यभर बालकवींच्या मनावर होता. तो कधीही थोडासुद्धा कमी झाला नाही. किंबहुना वयाबरोबर तो वाढतच गेला असे म्हटले तरी चालेल. प्रेम आणि सौंदर्य या दोनच गोष्टीत त्यांच्या साऱ्या चित्तवृत्तींचा परिपूर्ण लय झालेला आहे.

## संशयवादाने संभ्रान्त झालेले मन :

धर्म, ईश्वर, नीती इत्यादी कल्पनांविषयी त्यांच्या मनात कधीच विचार आले नाहीत असे म्हणता यावयाचे नाही. क्वचित् हे विचार त्यांच्या मनात येत असत, हे अगदी खरे. इतकेच नव्हे तर त्यांच्या स्वरूपाविषयी समाधानकारक उत्तर त्यांच्या मनाला न मिळाल्यामुळे अनेक प्रकारच्या संदेहांनी त्यांचे मन मधून मधून व्याकुळही

होत असे. 'कवीची इच्छा' या कवितेत या प्रकारच्या अनेक संदेहांची मालिकाच आहे. सत्याचे खरे स्वरूप कोणते ? सत्य हे एक स्वप्नच आहे काय ? सत्यच स्वप्नाचा आभास निर्माण करते काय ? सत्य हेच स्वप्न असले तर मानवी जग हे त्या स्वप्नातले स्वप्न आहे असे म्हणावे काय ? जीवित हे जर स्वप्न असेल तर मरण हेही स्वप्नच आहे काय ? की जीवित आणि मरण या दोन्ही गोष्टी स्वप्नमय नसून सत्य आहेत ? इत्यादी संशयमालिकेने बालकवींचे मन अक्षरशः संभ्रांत झालेले आहे हे स्पष्ट दिसते. धर्माविषयी सुद्धा त्यांचे मन व त्यांची बुद्धी यांच्यामध्ये असाच कलह चाललेला आहे. 'हृदयाची गुंतागुंत' या कवितेत ते म्हणतात–

हे धर्म सांगती भिन्न भिन्न पथ कांहीं
मम वृत्ति सांगती भिन्न तुझा पथ पाहीं.
ही बुद्धि सांगतां मन ऐके ना तीतें
हें चित्त वदे तें पटेच ना बुद्धीतें
द्वैताची असली अक्षय झोंबी चाले.

या कवितेमध्ये बालकवींचा संशयवाद पराकोटीला गेलेला आहे. स्वार्थ चांगला की परमार्थ चांगला ? वैराग्य बरे की प्रेम बरे ? कर्म श्रेयस्कर की कर्मत्याग श्रेयस्कर ? श्रद्धा चांगली की संशय चांगला ? असला विलक्षण 'व्यामोह' कवीला झाला आहे. मृत्यू समीप आल्यावर आपल्याला सोबत कोण करील ? ज्या ईश्वराचे जन्मभर भक्तीने स्तवन केले तो ईश्वर मृत्युसमयी मदतीला धावून येईल काय ? हाही विचार त्यांना त्रस्त करीत आहे. 'संशय' या कवितेत ते म्हणतात—

अज्ञानें परि बाहिलें निजमनीं ज्या ईश्वरालागुनी
साह्या त्या समयास तो तरि अहो येईल का धावुनी ?

## ज्ञानाचे वैयर्थ्य :

सत्य, धर्म, ईश्वर इत्यादी गोष्टींविषयी बालकवींच्या मनात विचारांचे असले विलक्षण काहूर माजले आहे. मग ज्ञान, प्रेम, आनंद इत्यादी गोष्टींविषयी अनेक संशय त्यांच्या मनात थैमान घालीत असले तर त्यात नवल काय ? 'खराखुरा आनंद असे

की सर्वच आभास ? ' असा केविलवाणा प्रश्न ते ' जिज्ञासू ' या कवितेत विचारीत आहेत. ज्या ज्ञानाच्या आधाराने विश्वातील अनेक गूढे उकलता येण्याची शक्यता आहे, त्या ज्ञानाच्या सामर्थ्याविषयीच त्यांच्या मनात जबरदस्त शंका निर्माण झाली आहे असे दिसते. मानव परमेश्वराची उपासना करीत असताही इतका दुःखी का ? या प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्यासाठी ज्ञानाचा आश्रय घ्यावा म्हटले तर चित्तापुढे केवळ काही भास तरळून जातात अशी त्यांची तक्रार आहे. ज्ञानाचे वैयर्थ्य अशा प्रकारे चित्ताला पटल्यावर अज्ञात गोष्टींचा उलगडा कसा व्हावा ? शेवटी प्रत्यक्ष ज्ञानच अज्ञान आहे असे त्यांना वाटू लागले. ' हृदयाची गुंतागुंत ' या कवितेतील याविषयी त्यांचे उद्गार पाहा –

हें ज्ञान मला तर अज्ञानापरि भासे
मी सोडवितां तें उलटे बांधी फासे
मन विटलें शब्दचिकित्सा सारी
मी फिरतां गरगर बुद्धि तयामाझारीं.

ज्ञानाच्या मदतीने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील अनेक गहन प्रश्नांचे आकलन करून घेण्याची आकांक्षा प्रत्यक्ष ज्ञानाच्या वैयर्थ्यामुळे अशा प्रकारे फोल ठरली आहे. अशा स्थितीत अज्ञेयाची किंवा ' गूढ अमूर्ता ' ची गुपिते कशी कळावी ! यासाठी त्यांनी ' दिव्य विचारा ' ची विनवणी केली आहे. सृष्टीचे कोडे उकलत नाही, ' तेजोमार्गा ' वर चित्त वळत नाही, म्हणून त्यांचे मन दिव्य विचाराला उद्विग्नपणे हाक मारीत आहे. ' कविचा विचार ' या कवितेत कवीच्या मनाचा आर्तपणा प्रकट झाला आहे.

सृष्टीचा मनिं भाव कळेना । तेजोमार्गी चित्त वळेना
म्हणुनि असें उद्विग्नपणें तें । हांक मारितें अखंड तूंतें.

या दिव्य विचाराचे उगमस्थान कोणते याचेही उत्तर बालकवींच्या मनाला मिळत नाही. रम्य उषेच्या पहिल्या किरणात तो आढळेल की रजनीच्या गंभीर गानात तो आढळेल ! किंवा मातेच्या उच्छ्वासात, अथवा सात्त्विक कांतेच्या करपाशात, अथवा लहानग्याच्या मृदुल हास्यात आढळेल ! कवीला या प्रश्नांचे निश्चित उत्तर

मिळत नाही. यामुळे ही ' तत्त्वज्ञाची भुलभुलाई ' नको असेच त्याला वाटू लागते. ' सौख्यहि शिणलें, दुःखहि शिणलें, शिणले तत्त्व विचार ' असा उद्विग्न मनाचा उद्‌गार ' आवाहन ' या कवितेत आढळतो. तत्त्वज्ञान अंतिम सत्याचा शोध लावून मनाला समाधान प्राप्त करून देते, हेच मुळी कवीच्या हृदयाला पटत नाही. किंबहुना ज्ञानामुळे मानवी जीवनात एक प्रकारची विचित्र संशयग्रस्ततेचीच अवस्था निर्माण होत असेल तर, त्या ज्ञानाचा हव्यास बाळगाच कशाला ? अज्ञानच बरे नाही का ? इत्यादी विचार कवीच्या मनात डोकावू लागतात.

ज्ञानाची उपासना करून शेवटी जर निराशाच पदरी पडावयाची असेल आणि विश्वातील अनेक गूढे जर अधिकच गूढ व्हावयाची असतील तर ' अज्ञेयाच्या भव्य महाद्वारा ' वर व्यर्थ डोके आपटून घेण्यात काय मतलब आहे हे त्यांना कळत नाही. ' हृदयाची गुंतागुंत ' या कवितेत हा विचार स्पष्ट झाला आहे.

मम रुचे न किमपी व्यापकता गगनाची;  
तीं अनंततेचीं किरणें ग्रहगोलांचीं.  
ती अमर्यादता अचिंत्य गूढ दिशांची,  
ही अगाधता कीं सर्वंकष कालाची !  
हें दिसून सर्वहि मज न दिसेसें होई.

ज्ञानोपासनेचा विश्वाची गूढे उकलण्याच्या बाबतीत काहीही उपयोग नसल्यामुळे व तिच्यामुळे मनातील संशयांचा निरास होण्याऐवजी ते वाढतच जात असल्यामुळे ' नको ते ज्ञान ' असे कवी उद्विग्नतेने म्हणतो. मग कवीला हवे तरी काय ?

सौंदर्य फुलांचे, गाणीं वनविहगांचीं  
ती गोड शांतता हिरव्या वृक्षलतांची  
शीतलता सुंदर चंचल निर्झरणींची  
गंभीरपणाची मूर्ती गिरिरायाची.

### विषण्णतेची छाया :

जगातून मनाने दूर कोठेतरी निघून जाण्याची ही वृत्ती बालकवींमध्ये प्रबळ होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. आपण दुःखांनी भरलेल्या जगात नांदत

आहेत ही बालकवींना सतत जाणीव आहे. मानवी जीवनात अनेक प्रकारच्या उणीवा असून ते कधीच परिपूर्ण होऊ शकणार नाही हे शल्यही त्यांच्या हृदयात रुतून बसलेले आहे. या दृढमूल झालेल्या विचारामुळे त्यांच्या मनाला विषण्णता जाळीत आहे. मानवी जग पराकाष्ठेचे स्वार्थी असून या स्वर्थापायी अनेक दीनदुबळ्यांचे हाल होतात. 'स्वार्थाच्या बाजारात, किती पामरे रडतात,' असे कवी 'आनंदीआनंद' या कवितेत म्हणत आहे. या मर्त्य जगात दुःखाचे भयानक डोह असल्यामुळे जीवाला समाधान व शांतता या गोष्टी दुर्लभ आहेत; यामुळे ह्या क्षुद्र देहाची आसक्ती धरावीशी वाटत नाही, असा विचार कवीने अनेक ठिकाणी व्यक्त केला आहे. खिन्नपणा आपल्या निराश हृदयाला क्षणभरही सोडीत नाही असे त्यांनी पुनःपुनः केविलवाणेपणाने म्हटले आहे. 'निराशा' या कवितेत आपल्या निराश मनाचे कवीने पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे—

सुंदर सगळे, मोहक सगळे
खिन्नपणा परि मनिंचा न गळे
नुसती हुरहुर होय जिवाला – कां न कळे कांहीं !

हृदयात 'नैराश्यकालिमा' दाटलेला आहे व नैराश्यामुळे 'जीवित केवळ करुणासंकुल' झाले आहे असे आर्त उद्गार काढणारा कवी भोवतालच्या दारुण, दुःखपूर्ण घटनांना टक्कर देऊन त्यांच्यावर मात करावयास असमर्थ ठरलेला आहे, हे उघड आहे. ही अमर्याद विषण्णता येण्यास पुष्कळ कारणे झाली असली पाहिजेत. जगातील अनंत दुःखे, क्षुद्र स्वार्थ, तिरस्करणीय संकुचितपणा, आपल्या आकांक्षांचा प्रत्ययी होणारा चुराडा ही कारणे बालकवींच्या औदासीन्याच्या मुळाशी आहेत यात मुळीच शंका नाही. पण आणखीही कारणे आहेत. आपले मानवी जीवित अत्यंत अशाश्वत आहे ही गोष्ट कवीच्या मनाला विलक्षण टोचणी देत आहे. या जगात कोणतीच मानवी गोष्ट स्थिर नाही, प्रेम स्थिर नाही, सौंदर्य स्थिर नाही, वैभव स्थिर नाही !

प्रीतीचा पथ हा भयाकुल दिसे सौंदर्यसौदामिनी
डोळ्यांना क्षण तेज दाखवूनिया अस्तंगता हो झणीं.

सौंदर्य हे विद्युल्लतेप्रमाणे क्षणभर दिसते आणि लगेच नष्ट होते; आयुष्यही असेच भराभर निघून जात आहे; उद्या काय होईल ते सांगवत नाही; अशा स्थितीत कशाचा

विश्वास धरावा ? तात्पर्य, वेदनांशिवाय मानवी जीवनात दुसरे काहीच नसल्यामुळे औदासीन्याची झापड चित्तावर पडू नये तर दुसरे काय व्हावे ? स्वत: कवीला या औदासीन्याचे कारण काही वेळा समजत नाही हे स्वाभाविकच आहे. अनेक व्यथांमुळे दीन झालेल्या चित्ताला एक प्रकारची बधिरता येत असते; आणि बधिरता आली म्हणजे कार्यकारणभावच कळेनासा होतो. ‘ उदासीनता ’ या कवितेमध्ये कवी म्हणतो—

कोठुनि येते मला कळेना
　　उदासीनता ही हृदयाला ?
काय बोचते ते समजेना
　　हृदयाच्या अंतर्हृदयाला.
एथें नाहीं तेथें नाहीं
　　काय पाहिजे मिळवायाला ?
कुणीकडे हा झुकतो वारा ?
　　हाका मारी जीव कुणाला ?
मुक्या मनाचे मुके बोल हे;
　　घरें पाडिती पण हृदयाला !
तीव्र वेदना करिती; पण ती
　　दिव्य औषधी कसली त्याला ?

‘ शून्य मनाच्या घुमटांत ’ कसले बोल उमटत आहेत ! त्याचा अर्थच कवीला कळेनासा झाला आहे. सुस्कारे सोडणे एवढे एकच कार्य आता उरले आहे. दुःखामुळे ‘ संशयकाहूर ’ हृदयामध्ये दाटले असून ‘ स्वास्थ्य क्षणभर नाही – ’ इत्यादी जे आर्त विचार ‘ रजनीस आव्हान ’ या कवितेत प्रकट झाले आहेत, ते विचार म्हणजे कवीच्या नैराश्यपूर्ण जीवनाचे भाष्यच होत.

या औदासीन्याचा काही वेळा इतका अतिरेक होतो की, कवीला मरणाची ओढ लागते. ‘ काळास ’ या कवितेत आपल्या विमनस्कतेचे स्वरूप कवीने अगदी स्पष्टपणे वर्णिले आहे. मन शून्य झाले आहे, खिन्नपणा आला आहे, अंधःकार सुखद वाटत आहे, निद्रा पळून गेली आहे, अंतःकरण जळत आहे, अशा स्थितीत या भीषण गोष्टींचा

विसर पडला तर काय बहार होईल! शांतता लाभण्यासाठी काय करावे? काळोखात तोंड खुपसून बसावे काय? परमेश्वर दया करून मनाला हे स्वास्थ्य देईल काय? इत्यादी विचारांनी कवीचे मन अगदी दडपून गेले आहे.

शेवटी नैराश्याची भावना पराकाष्ठेची बळावल्यावर कवीने मृत्यूचे आवाहन पुढील कारुण्यपूर्ण शब्दांत केले आहे—

ये काळा, ध्यान तुझे मात्र मला लागलें!

आपल्या असंख्य यातनांतून मुक्त होण्याचा विस्मरण हा एकच मार्ग आहे असे कवीला दिसून आले आहे. पण हे विस्मरण व्हावे कसे? ज्या ठिकाणी विस्मरण शक्य आहे अशा ठिकाणी वाऱ्याने आपल्याला घेऊन जावे अशी इच्छा व्यक्त करून कवी काळाला म्हणतो—

विस्मृतिमधि बुडवि जीव तव हृदयीं हृदय ठेव.

दुःखाचा विसर पडणे अर्थातच शक्य नसल्यामुळे भोवतालच्या जीवनातून मनाने पलायन करून कलेची स्वतंत्र कल्पनासृष्टी निर्माण करणे कवीला भाग पडले आहे हे स्पष्ट दिसते.

## निसर्गाकडे धाव :

आणि जो आनंद मानवी जगातील दुःखपूर्ण व नैराश्यजनक वातावरणात कवीला प्राप्त करून घेता येणे शक्य झाले नाही तो आनंद प्राप्त करून घेण्यासाठी, आणि जे निरागस, दिव्य व शाश्वत सौंदर्य मानवांमध्ये त्याला दिसले नाही त्या सौंदर्याचा साक्षात्कार व्हावा म्हणून कवीने निसर्गाशी तद्रूप होऊन त्याच्यावर भक्ती करण्यास सुरुवात केली. आपल्या नैराश्यपूर्ण वातावरणाचा विसर पडावा म्हणून कवी निसर्गाकडे धाव घेत असे व त्याच्या सौंदर्याची अमृतवृष्टी झाली म्हणजे तो धन्य होत असे. या दारुण यातनांतून मुक्त होण्याच्या लालसेनेच बालकवी निसर्गाच्या आनंदमय व सौंदर्यमय वातावरणात राहू इच्छितात!

## निसर्ग व मानवी जीवन यांतील विरोध :

निसर्गाशी तादात्म्य पावून बाह्य जगाला विसरण्याची बालकवींना इतकी उत्कंठा

का लागली होती याची कारणे आपण पाहिली. पण या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावयास पाहिजे. ती अशी की, सुरुवातीला बालकवींनी जी निसर्गगीते लिहिली, ती लिहीत असता जगातील दुःखाचा उबग हे कारण कदाचित् तितकेसे प्रभावी नसेल. निसर्गसौंदर्यात रममाण होण्याची त्यांची प्रवृत्तीच असेल. परंतु जगातील दुःखाची जाणीव तीव्रतेने होऊ लागल्यावर मग बाह्य परिस्थितीचा विसर पडावा अशी त्यांना अधिकाधिक तळमळ लागू लागली; आणि मनाला विरंगुळा मिळावा म्हणून ते निसर्गात जास्त तन्मय होऊ लागले. या तन्मयतेमुळे त्या वेळेपुरती तरी दुःखांची जाणीव ते विसरून जात. परंतु पुन्हा मानसिक अस्वस्थता वाढू लागे, विषण्णतेची घनदाट छाया दाटू लागे, आणि त्या मनःस्थितीत ते औदासीन्याच्या तीव्र व्यथांचे परिणामकारक वर्णन करीत; आणि त्या व्यथांचा विसर पडावा म्हणून ते पुन्हा निसर्गाकडे धाव घेत. 'क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे' या बालकवींच्याच ओळीत वर्णिल्याप्रमाणे त्यांच्या आयुष्यात ऊन-पावसांचा हा पाठशिवणीचा खेळ एकसारखा चाललेला होता. निसर्गातील अद्वितीय, दिव्य सौंदर्याचा साक्षात्कार होण्याच्या क्षणी त्यांचे हृदय आनंदाने परिपूर्ण होईल; पण व्यावहारिक जगातील दुःखाच्या धगीने त्यांचे मन लगेच करपून जाई. पुन्हा निसर्गसान्निध्याने त्यांच्यावर अमृतवृष्टी होई.

निसर्गाच्या निकट सान्निध्यात जाऊन बालकवी त्याच्याशी तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करू लागले म्हणजे निसर्ग व मानवी जीवन यामधील आत्यंतिक विरोधाची जाणीव त्यांना फार तीव्रतेने होत असे.

सृष्टी व मानव यांच्यामधील हा आत्यंतिक विरोध बालकवींना तीव्रतेने जाणवलेला आहे. या विरोधाच्या जाणिवेने खिन्नता निर्माण होणे अगदी अपरिहार्य आहे. पण त्याला इलाज नाही. ही विरोधाची जाणीव बालकवींनी अनेक ठिकाणी प्रकट केली आहे. निसर्गाचे गीत स्वर्गीय असून असले दिव्य गीत मला कधी गाता येणे शक्य नाही असे ते निराश होऊन म्हणतात. दिक्कालांच्या बंधनांनी जखडलेल्या मानवी जीवाला दिव्य जीवित प्राप्त होणे शक्य नसल्यामुळे दिव्य गीतांनाही तो पारखा असणारच !

परि न झरे माझ्या गानीं दिव्यांची असली श्रेणी !
जडतेला खिळुनी राही हृदयबंध उकलत नाहीं !

दिव्यरसीं विरणें जीव जीवित हें याचें नांव,
ते जीवित न मिळे मातें मग कुठुनी असलीं गीतें ?

मानवी जीवन अनेक दृष्टींनी अपूर्ण आहे याचे शल्य बालकवींना बोचत आहे. आकाशात भरारणाऱ्या पाखराप्रमाणे आपले चित्त ' तरळ ' व्हावे अशी त्यांची इच्छा आहे. पण स्वतःची अपूर्णता त्यांना शोकपूर्ण करीत आहे. चैतन्यापाठी जावयास जीव उत्सुक झाला आहे, पण देहाची गाठ सुटत नाही. अनंत भवदुःखांमुळे जीवाला क्षणभरही विसावा नाही. असल्या या क्षुद्र मानवी जीवाने खगबाळाप्रमाणे स्वैरसंचार करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगण्यात काय मतलब ? पक्ष्यांच्या रमणीय जीवनातील व स्वतःच्या अपूर्ण जीवनातील विरोध ' अष्टदिशांचा गोफ ' या कवितेत कवीने पुढील प्रमाणे वर्णिला आहे—

अपूर्णताही यापरि मजला जरि बुडवी शोकीं
चित्र मनोहर खगबाला परि मी तव अवलोकी.
अपूर्ण अपुले ईप्सित झालें पूर्ण दिसे जेथें.
मनुजाचें मन सहज पावतें आकर्षण तेथें.

मानवी जीवनातील अस्थिरता व सृष्टीतील स्थैर्य यांमधील विरोध कवीने ' प्रीति व कर्तव्य ' या कवितेत आणखी एकदा वर्णिला आहे. मानवी सौंदर्य हे विजेप्रमाणे चंचल आहे. आणि प्रीतीच्या बाबतही तेच खरे आहे. परंतु निसर्गाकडे पाहावे तर—

वर्षी हा ग्रहगोल शांत वरतीं हा चंद्रमा मंगल
तैसे नील गभीर हे गगनही निश्चित ऊर्वीतल.
पाहोनी असला विरोध जगतीं चिद्वृत्ति हो घाबरी.

तात्पर्य, मानवी जीवनाची अपूर्णता, दुःखमयता, विरूपता या गोष्टी कवीच्या मनाला सहन झाल्या नाहीत. आणि उलट निसर्गात त्याला स्थैर्य, परिपूर्णता, सौंदर्य व आनंद या गोष्टी दिसल्यामुळे मानवी जीवनाकडे पाठ फिरवून सौंदर्य व आनंद यांच्या प्राप्तीसाठी त्याला निसर्गाची उपासना करणे भाग पडले आहे.

## सौंदर्यशोधासाठीच निसर्गाशी तादात्म्य :

सौंदर्याचा शोध करण्यासाठी निसर्गाशी तन्मय होण्याचे बालकवींनी ठरविले आहे. सौंदर्याचा साक्षात्कार हेच त्यांच्या जीविताचे एकमेव ध्येय आहे. सृष्टीच्या रमणीय स्वरूपात या सौंदर्याचा साक्षात्कार त्यांना झालेला आहे. सृष्टीचे स्वरूप आनंदमय आहे, सृष्टीत सर्वत्र आनंद कोंदून भरलेला आहे. सृष्टीतील या आनंदाचा उद्रेक आपल्या मनात शिरला म्हणजे ते पराकाष्ठेचे उल्लसित होते आणि मनाची अशी आनंदपूर्ण उल्लसित अवस्था झाली म्हणजे सृष्टी सर्वत्र भरलेल्या दिव्य सौंदर्याचा साक्षात्कार होतो. सृष्टीत ज्याप्रमाणे सर्वत्र आनंद व सौंदर्य या गोष्टी ओतप्रोत भरलेल्या आहेत त्याप्रमाणेच प्रेमही सर्वत्र भरलेले आहे. किंवा असेही म्हणता येईल की, सौंदर्य हेच एक मूलतत्त्व असून आनंद व प्रेम ही त्याची वेगळी स्वरूपे आहेत. या सौंदर्य-तत्त्वाचाच बालकवींना ध्यास लागलेला आहे. बालकवींनी प्रत्यक्षपणे सौंदर्य व सत्य या गोष्टी एकरूपच आहेत असे म्हटलेले नाही. तथापि सौंदर्य आणि प्रेम या गोष्टी ते अभिन्न मानीत आहेत. या दोन तत्त्वांच्या जोडीला आनंद हे तत्त्व मानले म्हणजे सौंदर्य–प्रेम–आनंद ही तत्त्वत्रयींची त्रिपुटी तयार झाला.

सृष्टीत सर्वत्र आनंद भरलेला आहे, हा विचार बालकवींनी अनेक वेळा सांगितला आहे. 'आनंदी–आनंद' या कवितेत या आनंदाची व्यापकता वर्णिली आहे.

आनंदी–आनंद गडे !
इकडे तिकडे चोहिंकडे
वरतीं खालीं मोद भरे
वायूसंगें मोद भरे;
    नभांत भरला
    दिशांत फिरला
    जगांत उरला,
मोद विहरतो चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे !

ही कविता बालकवींनी वयाच्या विसाव्या वर्षी लिहिलेली आहे. याचा अर्थ अल्लड वयातील ही कल्पना आहे. काही दिवस त्यांना सृष्टीच्या स्वरूपात सर्वत्र आनंदोद्रेकच दिसत असे. आकाशातील ' नाचरा ' आनंदोद्रेक पाहून पर्वत जणू समाधिस्थ झाला आहे, अशी कल्पना ' अष्टदिशांचा गोफ ' या कवितेत आली आहे. ' स्थिर भरला परमानंद ' ही कल्पना ' बाळें तीं खेळत होतीं ' या कवितेतील आहे.

पण बालकवींचे सारे लक्ष सौंदर्य या एकाच तत्त्वात केंद्रित झाले आहे. मानवी आयुष्याचे ध्येय कोणते असावे ? या प्रश्नाला ' अष्टदिशांचा गोफ ' या कवितेत बालकवींनी पुढील असंदिग्ध उत्तर दिले आहे—

सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावें
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं
बनवावें मन धुंद रंगुनी काव्य सुधापानीं.

**विश्वात्मक सौंदर्याचा ध्यास :**

ज्या सौंदर्याचा ध्यास बालकवींना लागलेला आहे ते मानवी जगातील ललनेचे उन्मादक सौंदर्य नसून निसर्गातील विविध दृश्यांत अथवा वस्तूंत सामावलेले सौंदर्य होय हे कधीही विसरू नये. हे सौंदर्य त्यांना मेघांत, निर्झरांत, फुलांत, तारकांत सर्वत्र दिसते. थोडक्यात सर्वच निसर्ग सौंदर्याने ओतप्रोत भरलेला असून मेघ, निर्झर, फुले, तारका ही केवळ त्याची विविध रूपे होत असाच बालकवींचा आशय आहे.

संध्यासमयी आकाशामध्ये जास्वंदीच्या रंगाची छटा पसरली असताना सौंदर्याची लयलूट दिसते. प्रभातकाली पूर्व दिग्भागी ' साजिरा रंग ' दिसू लागल्यावर वनामध्ये मूर्तिमंत सौंदर्यदेवताच अवतरल्या आहेत असा भास होतो; आकाशात रात्री तारकांचा उदय झाला असता—

सौंदर्यें शब्दातीत–स्वर्भूवर अवतरत
तेजाची फुटली पेठ–दिव्यत्वाची लयलूट.

आकाशात जी ही सौंदर्ये आहेत, त्यांचा केंद्र म्हणजे शुक्र. हे सौंदर्य इतके

मोहक आहे की, कवीचे मन अक्षरश: वेडे झाले आहे. या सौंदर्यामध्ये त्याला विश्वाच्या सत्यस्वरूपाचा साक्षात्कार झाला आहे.

सौंदर्यें वेडें झालें–तेजाची वारुणि प्यालें.
दिव्याच्या मागुनि चाले–विश्व खरें, कळुनी आलें.
केंद्र तया सौंदर्याचा–शुक्र नभीं उगवे साचा.

चांदणे पडले म्हणजे आकाशात अशीच तेजाची लयलूट होते आणि ‘ सौंदर्याची वेल ’ बहरते. हेच दिव्य सौंदर्य कवीला अवखळपणे वाहणाऱ्या निर्झरात दिसते. निर्झर म्हणजे सौंदर्याचे निधानच. हे सौंदर्य विश्वामध्ये मुक्त हस्ताने निर्झराने उधळून द्यावे, मानवी वृत्ती सौंदर्याने विकसित व्हावी, आणि प्रेम, शांती व सौंदर्य यांच्या योगे अखिल विश्व वेडावून जावे अशी कवीची उत्कट इच्छा आहे., कवीला सृष्टीतील अगणित वस्तूंच्या ठायी सौंदर्याची लयलूट दिसत असून ज्या अभागी माणसाला याचा दिव्य साक्षात्कार होत नाही, त्याची कवीला करुणा येते. जर हे सौंदर्य आपोआप दिसत नसेल तर अशा माणसाने सौंदर्याचा अभ्यासच केला पाहिजे असा कवीचा आग्रह आहे. सृष्टीत सौंदर्याचा साक्षात्कार कोठे होईल हे कवीने ‘ सौंदर्याचा अभ्यास कर! ’ या कवितेत सांगितले आहे.

सूर्याचीं किरणें, सुनिर्मल तशा त्या तारकामालिका,
संध्येचे रमणीय रंग, उदयीं सृष्टी मनोहारिका,
वृक्ष श्यामल पुष्पसंकुल चलद्‍दूर्वादलाच्छादिता,
वाहे शांतपथा सुरम्य सरिता कल्लोलमालायुता.

## विश्वसौंदर्याच्या साक्षात्काराची प्रक्रिया :

सूर्य, तारे, संध्याकालीन रक्तिमा, उषा, श्यामल वृक्ष, हिरवळ, फुले, नद्या इत्यादी सौंदर्यनिधाने जगतात डोळ्यांसमोर असताना सुद्धा ‘ सौंदर्य कोठे आहे ? ’ असा प्रश्न विचारणारा माणूस वेडाच असला पाहिजे. हे सारे विश्व सौंदर्याने ओतप्रोत भरलेले आहे. या सौंदर्यपूर्ण विश्वात प्रेमाने अभिषिक्त झालेले रमणीय चित्र दिसते. या रमणीयतेमुळे चित्तालाही रमणीयता प्राप्त होते आणि मग या चित्ताच्या रमणीयतेचे संगीतात रूपांतर होते.

प्रेमानें अभिषिक्त चित्र मग त्या रामण्यविश्वीं दिसे
चित्ताची रमणीयता उतरुनी संगीत होतें तसें.

उत्कट आनंदाने ओसंडून वाहणारे काव्य कसे निर्माण होते त्याचा हा इतिहास आहे. ही काव्यनिर्मितीची प्रक्रिया आहे. निसर्गाचे अवलोकन करण्याच्या प्राथमिक अवस्थेपासून प्रत्यक्ष काव्य निर्माण होईपर्यंत कोणते भिन्न मानसिक व्यापार होत असतात याचे या ठिकाणी बालकवींनीं उत्कृष्ट वर्णन केले आहे.

निसर्गातील दिव्य सौंदर्याच्या अवलोकनाने मनावर मोहनी पडते. सौंदर्यामुळे जणू काही 'प्रेमाचा लोंढाच' पृथ्वीवर अवतीर्ण होतो. सौंदर्याची ही वृत्ती होत असता कवीला अन्य कोणत्याही गोष्टीची यत्किंचित् जाणीव राहत नाही. चक्षुरिंद्रियाने या सौंदर्याचे अवलोकन केल्यावर ते त्याच्या हृदयात संक्रान्त होते. असे झाल्याबरोबर हृदयामध्ये भावनांचा उद्रेक होतो. भावनांचा उद्रेक झाल्यावर त्या हृदयात सामावू शकत नाहीत; त्यांचे विविध कल्पनांत रूपांतर होते; या कल्पना एकमेकांत गुरफटतात; त्यांचे रुचिर मीलन होते; आणि शेवटी त्याची मधुर संगीतात परिणती होते; हेच कवीचे मूर्त काव्य होय. या मूर्त आविष्कारात कवीच्या सर्व उत्कट भावनांना आकार प्राप्त होतो. हे सर्व कवी जाणिवेने करतो असे मुळीच नाही. हे सर्व व्यापार अबोधपूर्व होत असतात. उत्कट भावनांचे मूर्त काव्यात रूपांतर होत असता कवीला तंद्रीच लागलेली असते. या तंद्रीतच त्याला बाह्य उपाधींचा पूर्ण विसर पडतो. काव्यनिर्मितीची ही प्रक्रिया बालकवींनी 'काव्याची कल्पना' या कवितेत उत्कृष्टपणे वर्णिली आहे.

वस्तुवस्तुमधिं काव्य विलसतें
श्रवणीं नयनीं हृदयीं उतरुनि
पूर्ण करी जें जड जीवातें.
बाह्य वेष जरि सुंदर धरितें;
मंजुगीत त्यामधुनी स्फुरतें;
दिव्य अहा मग तें अवतरतें.

तात्पर्य, बालकवींना ज्या सौंदर्याचा साक्षात्कार झालेला आहे ते सौंदर्य त्यांना 'वस्तुवस्तुमधिं' दिसले आहे. हे विश्वात्मक सौंदर्य आहे. विश्वात्मक सौंदर्याच्या या

हव्यासामुळे विशिष्ट सौंदर्याची अभिलाषा बालकवींच्या ठायी नाही; किंबहुना त्याची त्यांना जाणीवही नाही. अमूर्त सौंदर्याच्या मागे लागल्यामुळे त्यांना सौंदर्यातील विविध छटा व त्यांचे विविध प्रकार यांचा विचार करण्याचे कारणच पडले नाही.

## सौंदर्यसाक्षात्कारामुळे आनंद व शांती :

बालकवींना जे सौंदर्य दिसले आहे व ज्याच्या ठायी त्यांच्या साऱ्या चित्तवृत्ती तल्लीन झालेल्या आहेत ते सौंदर्य मानवी जगातील नसून सृष्टीच्या विविध स्वरूपातील अमूर्त सौंदर्य आहे, हे एकदा लक्षात घेतले म्हणजे या सौंदर्याच्या साक्षात्काराने त्यांच्या मनात निर्मळ आनंदाची व उदात्त प्रेमाची एकरूप भावना का निर्माण झाली ते ताबडतोब कळून येईल. रमणीच्या आकर्षक व उन्मादक सौंदर्याच्या दर्शनाने चित्तवृत्ती उल्लसित होतात हे खरे असले तरी त्यामुळे अभिलाषा, आसक्ती इत्यादी विकार प्रादुर्भूत होणे अगदी अपरिहार्य असते. असे विकार प्रादुर्भूत झाले म्हणजे वृत्तीची निरागसता नष्ट होते. या प्रकारच्या उन्मादक सौंदर्याविषयी पाहणाराला जे प्रेम वाटते ते आसक्तीने कलुषित झालेले असते. परंतु सृष्टिसौंदर्याच्या बाबतीत असे होत नाही. या सौंदर्याच्या अवलोकनाने दिव्य व निरागस आनंद प्राप्त होतो; कोणतेही हीन विकार प्रादुर्भूत होत नाहीत. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी की, अलौकिक शांती चित्ताला लाभते. ही दिव्य शांततेची, अधिकृत मानसिक समाधानाची, आसक्ती आहे. ही दिव्य शांतता, हे अविकृत मानसिक समाधान, मानवी जगात त्यांना लाभणे शक्य नव्हते; आणि म्हणूनच निसर्गसौंदर्याशी तादात्म्य पावून त्यांनी निरागस, अकलंकित आनंद, आणि दिव्य शांती यांची प्राप्ती करून घेतली. ' फुलें शांतिचीं अहा उधळलीं जगतीं चौफेर.' निसर्गातील शांतता कवीच्या मनात संक्रान्त झाली असून व्यावहारिक जगतामध्ये जे मानसिक स्वास्थ्य कवीला मिळाले नाही ते निसर्गाच्या सान्निध्यात गवसले.

## बालत्वसुलभ कुतूहल :

लहान मूल ज्या आश्चर्यातिरेकाने, उत्कट आनंदाने व तन्मयतेने एखाद्या नवीन गोष्टीकडे पाहात असते त्याच आश्चर्यातिरेकाने, उत्कट आनंदाने व तन्मयतेने बालकवी निसर्गाच्या विविध स्वरूपांकडे पाहात आहेत. कुतूहल–आत्यंतिक कुतूहल–ही बालत्व सुलभ गोष्ट बालकवींच्या ठायी भरपूर आहे.

बालकवींची वृत्ती शेवटपर्यंत एखाद्या निरागस मुलाप्रमाणेच अल्लड राहिली. निसर्गातील सौंदर्याकडे प्रथम पाहिल्यावर सृष्टीच्या बाल्यावस्थेतील संवेदनक्षम मानवाला जो उत्कट आनंद प्राप्त झाला असेल अथवा लहान मुलाच्या निष्पाप डोळ्यांत जो आनंद ओसंडून वाहतो तसलाच आनंद, अगदी उत्कट आनंद बालकवींना निसर्गातील सौंदर्याकडे पाहताना शेवटपर्यंत होत असे. त्या आनंदाने ते अक्षरशः वेडावून जात आणि त्या दिव्य सृष्टिसौंदर्यापुढे लोटांगण घालून 'उदो उदो सौंदर्यदेवते' असे भावनावश होऊन उद्‍गार काढीत.

## दिव्य, अमूर्त निसर्गसौंदर्य आणि उन्मादक मानवी सौंदर्य :

बालकवींची ही सौंदर्यदेवता कोणी शरीरधारी मानवी सौंदर्यदेवता नसून निसर्गात ठायी ठायी भरलेले दिव्य, अमूर्त सौंदर्य होय हे नीट लक्षात घेतले म्हणजे या सौंदर्यदेवतेच्या उपासनेमुळे त्यांना परमानंद व रुचिर शांती या दुर्लभ गोष्टींचा लाभ कसा होऊ शकला याचा सहज उलगडा होईल. बालत्व सुलभ कुतूहल आणि आनंदाने बेभान होण्याची वृत्ती या दोन गोष्टींमुळेच बालकवींना निसर्गाशी तादात्म्य पावणे जमले व त्याच्या सौंदर्यामधून मानसिक शांतता प्राप्त करून घेता आली.

विश्वात सामावलेल्या अमूर्त सौंदर्याचाच ध्यास लागल्यामुळे बालकवींना निसर्गातील विविध वस्तूंमध्ये स्त्रीचे शरीरसौंदर्य दिसले नाही. तारका, वायू, रजनी इत्यादी गोष्टींवर त्यांनी सचेतनत्वाचा आरोप केलेला आहे हे खरे असले तरी त्यांच्या ठिकाणी असलेले सौंदर्य पाहून एखाद्या लावण्यवतीच्या अवयवांच्या ठिकाणी विलसणारे उन्मादक सौंदर्य बालकवींना दिसले नाही.

बालकवींची वृत्ती अगदी निराळी असल्यामुळे निसर्गसौंदर्याचे तन्मय होऊन वर्णन करीत असता उन्मादक स्त्रीसौंदर्याची अथवा धुंद कामुकतेची वर्णने करण्याचा मोह त्यांना होणे संभवनीयच नव्हते. आणि निसर्गाच्या सौंदर्याशिवाय इतर कसलेही सौंदर्य त्यांच्या मनाला भुरळ घालू शकत नाही. स्त्री-सौंदर्याचे वर्णन कण्याचा त्यांनी दोन तीन ठिकाणी प्रयत्न करून पाहिलेला आहे. पण तो प्रयत्न सफल होणे शक्यच नव्हते; कारण बालकवींची वृत्ती याला प्रतिकूल होती. 'जादुगारीण' या कवितेत प्रणयाच्या धुंदीचे ओझरते वर्णन आले आहे. 'तू तर चाफेकळी' या कवितेत निरागस

अल्लड बालेच्या सौंदर्याचे वर्णन कवीने केले आहे. पण त्या वर्णनात परिणामकारक उत्कटता मुळीच नाही. 'Passion' ही काय चीज आहे याची बालकवींना कल्पनाही नाही. 'थडग्यातील रमणी' या कवितेत अद्‌भुत वातावरण निर्माण करण्यात कवीला थोडेफार यश मिळाले आहे; पण 'हे देवी विजयस्विनी' हे संबोधन सोडून दिले तर लावण्यलतिकेच्या सौंदर्याचा अद्वितीय प्रभाव कसा असतो याचे वर्णन कवीने मुळीच केले नाही. आणि त्याला ते करताही येणे शक्य नाही.

## बालकवींच्या प्रेमविषयक कल्पनेचे स्वरूप :

सौंदर्याच्या बाबतीत बालकवींची जी वृत्ती आहे, तीच प्रेमाच्याही बाबतीत आहे. सृष्टीतील सर्व वस्तूंच्या ठायी सामावलेले सौंदर्य—विश्वात्मक सौंदर्य-बालकवींना सौंदर्य अभिप्रेत आहे. किंबहुना बालकवी ज्या सौंदर्याशी तादात्म्य पावले आहेत ते सौंदर्य अमूर्त ( abstract ) आहे. ज्या प्रेमाचे बालकवींनी ठायी ठायी स्तवन केले आहे ते प्रेमही विश्वात्मक आहे. निराळ्या भाषेत सांगावयाचे झाले तर विश्वात्मक सौंदर्याविषयी वाटणारे प्रेम बालकवींना अभिप्रेत आहे. विश्वात्मक सौंदर्य जसे अमूर्त तसेच हे प्रेमही अमूर्त आणि अतींद्रिय. स्त्रीला पुरुषाविषयी जे अलौकिक आकर्षण वाटते किंवा पुरुषाला स्त्रीविषयी जे तसलेच आकर्षण वाटते, आणि ज्या अनावर आकर्षणाला आपण 'प्रेम' ही संज्ञा देतो तसले प्रेम बालकवींना अभिप्रेत नाही.

## निराश प्रेमाची व्यथा :

प्रेमनैराश्याच्या व्यथा व्यक्त करणाऱ्या बालकवींच्या चार पाचच कविता आहेत. '...ला' या कवितेतील स्त्री सत्यसृष्टीतील आहे की स्वप्नसृष्टीतील आहे ते कळावयास मार्ग नाही. शिवाय या लहानशा कवितेतील विषण्णतेची भावना प्रेमभंगामुळेच उद्‌भवली आहे की काय याविषयीही संदेह आहे. 'भटकणे' या कवितेतील प्रेमिक म्हणतो—

मैदानावरि खुळ्या पिशापरि भटकत फिरलों किती !
किती लोटली रात्र तयाची नाहीं हृदया क्षिती !

किति हृदयांची तीव्र वेदना तुजसाठीं सोशितो !
परि अजुनी तूं दूर किती वद पथ दुःखद वाटतो.

हा प्रेमिक प्रेमदेवतेच्या मागे वेड्याप्रमाणेच भटकत आहे; पण ती अजून दूर आहे असा विलाप तो करीत आहे. यावरून तिने त्याच्या प्रणययाचनेचा अव्हेर केला असून ती त्याच्या आटोक्यातील नाही आणि म्हणून तो कष्टी झाला असे दिसते, याला याच कवितेत पुरावा आहे.

तुझ्याजवळ मी कशी देवते, प्रेमयाचना करूं ?
मी गवताहुनि दीन दास तव, दूर नको परि धरूं ?
थोर थोर नर नित्य वांच्छिती तुझे कृपावीक्षण,
तव चरणाच्या धूळि लोभलें दुबळें माझें मन !

या ओळींवरून प्रेमदेवतेजवळ आपले प्रेम प्रकट करावयाचा अजून या प्रेमिकाला धीरच झालेला नाही, असे स्पष्ट दिसते. याचे कारण त्यानेच सांगितले आहे. ती उच्चपदी विराजत आहे आणि हा स्वतःला क्षुद्र मानीत आहे. तेव्हा ही प्रेमभंगाची व्यथा नसून प्रणयभावना प्रकट करण्याचा धीरच होत नाही म्हणून होणारी वेदना आहे. ‘ मूढ मालती ’ या कवितेत प्रेम स्थिर राहू शकेल की ते क्षणभंगुर ठरेल अशी शंका हृदयाला जाळीत असते, ही कल्पना आविष्कृत झाली आहे. यामुळे हीही कल्पना साक्षात् प्रेमभंगाच्या व्यथेवर आधारलेली नाही हे उघड आहे. प्रीतीचा घात ही अत्यंत भयंकर गोष्ट असून तो दुसरा कल्पांतच होय अशी कल्पना ‘ प्रीति हवी तर ’ या कवितेत व्यक्त झाली आहे. प्रीती ही ‘ तलवारीची धार ’ किंवा ‘ नागिणी लस-लसती ’ असून प्रीतीसाठी जीव ‘ कुर्बान ’ करावा लागतो. प्रीती हा जहरी प्याला आहे—

परि प्रीतीचा घात भयंकर दुसरा कल्पांत
जीवंतपणीं मरण घेउनी फिरणें जगतांत.

या कवितेत प्रेमभंगाच्या दुःखाची दारुणता वर्णिली असली तरी कवीच्या वैयक्तिक अनुभवातून ही कल्पना स्फुरलेली असावी असे वाटत नाही. केवळ प्रेमाच्या

बाबतीत एक सार्वत्रिक सत्यच कवीला सांगावयाचे असावे असे वाटते. हे आत्म-निवेदन दिसत नाही.

आणखी एक कविता आहे. आणि ती या सर्व प्रेमगीतांत महत्त्वाची आहे. ' कवीची इच्छा ' ही ती कविता होय. या कवितेतील भावना मागच्या कवितेतील भावनेपेक्षा अधिक उत्कट आहे. प्रेमिकाला खरे प्रेम मिळाले नाही, प्रेमाचा फक्त भास झाला, प्रेमाचा खेळ झाला. यामुळे पराकाष्ठेची उद्विग्नता आली. तो जगाला विटला आणि संसाराची सारी बंधने झुगारून द्यावी असा विचार त्याच्या मनात प्रबल झाला. त्याची विपण्णता इतकी अतिरेकाला गेली आहे की कीर्ती, प्रत्यक्ष प्रेम, सौख्य, विलास, किंबहुना मृत्यू यांपैकी कोणीही त्याला आता अडवू शकणार नाही. चिंता, अश्रू, ममता, निःश्वास या गोष्टी अगदी व्यर्थ होत, असे त्याच्या मनाने पुरतेपणी घेतले आहे. शेवटी तो आवेगाने म्हणतो—

पुरे संबंध प्रेमाचा–नको हा खेळ प्रेमाचा
खरा जो प्रीतिचा प्याला–जगीं प्याला सुखी झाला !

या ओळींतील भावना अगदी स्पष्ट आहेत. प्रेमिकाला खरे प्रेम लाभलेले नसून अनेक भास दाखवून ते कांचनमृगाप्रमाणे अदृश्य झाले आहे. प्रेमाचा हा केवळ खेळ झाला आहे. म्हणून ज्याला खरे प्रेम लाभले तोच खरा सुखी होय असे म्हणणे त्याला भाग पडले आहे. प्रीतीला लाल गुलाबांचा रंग लावलेला नसून तिला रुधिराचा रंग लावलेला आहे; प्रीती हा जहरी प्याला आहे या कल्पना ' प्रीति हवी तर ' या कवितेत व्यक्त झाल्या आहेत. प्रीतीचा प्याला जहरी आहे असे अनुभवाला आल्यावर आणि प्रेमाचा खेळ केवळ छळालाच कारण झाला हे दिसल्यावर ' पुरे संबंध प्रेमाचा ' असे वैतागाचे उद्‌गार प्रेमिक काढीत आहे.

या शेवटच्या प्रेमगीतातील भावना अत्यंत उत्कट आहे असे दिसते, प्रेमाविषयी केवळ सार्वत्रिक सत्य याही ठिकाणी कवीला सांगावयाचे आहे की त्याच्या वैयक्तिक भावनांची ही कटुता आहे ते निश्चितपणे सांगता येणे कठीण आहे. ही सर्व प्रेमगीते बालकवींनी नेमकी केव्हा लिहिली हे ठरविण्यास काही साधन नाही. प्रेमभंगाची घटना खरोखरच त्यांच्या आयुष्यात घडलेली होती असे त्यांच्या उपलब्ध चरित्रावरून दिसत

नाही. मग प्रेमभंगाची ही कल्पना केवळ कल्पनासृष्टीतीलच काय ? पण या कवितेतील उत्कटता इतकी विलक्षण आहे व भावनाविष्करण इतके प्रामाणिकपणे झालेले दिसते की ही केवळ कल्पनासृष्टी नसून आत्मानुभूतीचा त्यात बराचसा अंश असावा असे वाटू लागते. उत्कट भावना कवी आत्मानुभूतीवाचून सहसा व्यक्त करू शकत नाही. दुसऱ्यांच्या भावनांचे वर्णन कवीने कितीही चातुर्याने व सहानुभूतीने केले तरी त्यातील तिऱ्हाईतपणाची भावना मनाला जाणवल्याशिवाय राहत नाही. या कवितेत बालकवी प्रणयनैराश्याची भावना केवळ तटस्थपणाने आणि तिऱ्हाईतपणे वर्णीत आहेत असे दिसत नाही.

## सौंदर्य आणि प्रेम अभिन्न :

निसर्गसौंदर्याच्या अवलोकनाने उदात्त प्रेम व रुचिर शांती याच गोष्टींची प्राप्ती होत असते हे बालकवी पुन्हा पुन्हा सांगत आहेत. त्यांच्या निसर्गगीतांमध्ये 'प्रेम,' 'प्रीति' हे शब्द असंख्य वेळा आलेले आहेत. पण या सर्व ठिकाणी स्त्रीपुरुषांमधील शारीरिक आकर्षण अशी कल्पना त्यांच्या मनात मुळीच नसून स्वर्गीय प्रेम, दिव्य प्रेम, उदात्त, निरागस व कोणत्याही प्रकारच्या हीन वैषयिक अभिलाषेने जे कलंकित झालेले नाही असे अतींद्रिय प्रेम हीच कल्पना त्यांच्या चित्तात सदैव आहे. जसे निसर्गातील सौंदर्य दिव्य व विश्वात्मक, तसेच हे प्रेमही दिव्य व विश्वात्मक. निसर्गातील सौंदर्य हे इंद्रियग्राह्य असले तर त्या सौंदर्याच्या साक्षात्काराने निर्माण होणारे प्रेम केवळ बुद्धि-ग्राह्य व अतींद्रिय आहे, ही आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे. जे बुद्धिग्राह्य व अतींद्रिय असते ते आत्यंतिक सुख होय ही भगवद्‌गीतेतील कल्पना जमेला धरली म्हणजे या अतींद्रिय प्रेमाच्या योगे बालकवींना इतका उत्कट व दिव्य आनंद का होत आहे याचा उलगडा होईल. काही ठिकाणी बालकवी निसर्गातील वस्तूंवर मानवी भावनांचा आरोप करीत असतात हे खरे आहे. 'अरुण' या कवितेत दिवस हा प्रियकर आणि रजनी ही प्रेयसी अशी कल्पना करून बालकवी त्यांच्या मीलनाचे पुढीलप्रमाणे वर्णन करतात.

दिवसयामिनी परस्परांचे चुंबन घेतात,
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत !

संध्याकालीन वारा फुलराणीचे चुंबन घेतो अशीही एक कल्पना ‘ फुलराणी ’ या कवितेत आली आहे. पण या चुंबनाच्या वर्णनात कामुकतेचा लेशही वाचकाला दिसू नये अशी बालकवींनी खबरदारी घेतली आहे. त्यात कसलाही उन्माद साठवलेला नाही. तो उन्माद कालिदासाच्या ‘ मेघदूता ’ त पाहावयास सापडेल.

बालकवींच्या कोशात सौंदर्य व प्रेम या गोष्टी अभिन्न आहेत. निसर्गामध्ये सौंदर्याचा अतिरेक झाला म्हणजे त्याच्या साक्षात्कारात त्यांना प्रेमाचाही साक्षात्कार होत असतो हे लक्षात ठेवले पाहिजे. निराळ्या शब्दांत सांगावयाचे झाले तर बालकवींचे प्रेम हे दिव्य सौंदर्याचे प्रेम आहे आणि हे दिव्य सौंदर्य केवळ निसर्गातच त्यांना दिसले. त्यामुळे त्यांना निसर्गातील दृश्यात प्रेम बहरलेले दिसत आहे. अरुणोदयाच्या वेळची नभःश्रीच्या गालावरील लाली पाहिली म्हणजे प्रीतीची ध्वजा फडकत आहे असे त्यांना वाटू लागते. या काळाला कोणी वेडेपणाने ‘ अरुणोदय ’ हे नाव देत असले तरी वास्तविक हा ‘ प्रेमकाल ’ होय; सूर्याचा हात प्राचीचे गालाला लागल्या-बरोबर ती लाजून अधोवदन झाली आणि, ‘ प्रेमाची अद्‌भुत लहरी ’ पृथ्वीवर आली. हे जे अद्‌भुत सौंदर्य अरुणोदयाच्या वेळी आकाशात अवतीर्ण होते, ते सौंदर्य म्हणजे मूर्तिमंत प्रेमाची लाट असून या ‘ प्रेमाच्या लाटेखाली मस्तक नमवावे ’ अशी लालसा कवीला झाली आहे. सूर्याच्या आगमनाने वसुंधरा प्रेमातिशयाने स्वतःला विसरून जाईल असे कवीला वाटते. वसुंधरेच्या शरीरावर लज्जेचे जे रोमांच आले आहेत त्यामुळे कवीचे मनही बेभान होऊन तो वसुधेला म्हणतो—

> प्रेमचंचले ! प्रेमच तुजवर मग ते उधळील !
> प्रेमावांचुनि फेड कशानें प्रेमाची व्हावी ?

‘ ही प्रेमाची लाट ’, ‘ हा प्रेमाचा लोंढा ’ आकाशातून पृथ्वीवर उतरला आहे असे कवी जेव्हा म्हणतो तेव्हा स्वर्गीय सौंदर्याची वृष्टी पृथ्वीवर होत आहे असेच त्याला म्हणावयाचे आहे. प्रभातकाळी अरुणोदय झाला म्हणजे पूर्वदिशा ज्याप्रमाणे प्रेमाने भारली जाते, त्याचप्रमाणे सूर्यास्ताच्या समयी पश्चिम दिशाही अशीच प्रेमाने भारली जाते. ‘ पहा चमकते प्रेमपताका पश्चिमदिग्वदनीं. ’ तिची प्रेमसमाधी उतरतच नाही,

इतकी ती बेभान झाली आहे. आकाशात तारकाबालिका जणू क्रीडा करण्यासाठी जमल्या आहेत अशी कल्पना करून कवी म्हणतो–

गगनमंडळी फेर धरूं दे प्रेमाचा त्यांना
दिशादिशाला तुझीं गाउनी प्रेमाचीं गाणीं
रजनीदेवी ! विश्व टाक हें प्रेमें भारोनी !

हे अद्‌भुत दिव्य प्रेम आणि ब्रह्मानंद यांचे स्वरूप एकच आहे. 'ब्रह्मांडाचे हृदय नाचवी प्रेमाच्या रंगें'. असल्या या दिव्य प्रेमाचे स्तवन करता करता कवीचेही चित्त 'प्रेमाच्या निद्रेंत रंगले' आहे आहे. हे प्रेम संपूर्णतया सात्त्विक आहे. मानवाला उदात्त करावयाचे व त्याच्या शुद्ध मनाला शांतता मिळवून देण्याचे सामर्थ्य त्याच्यामध्ये आहे. या प्रेमामुळे आणि या सौंदर्यामुळे भावना क्षुब्ध व विकारदूषित न होता त्या अधिक पवित्र व उदात्त होत आहेत अशी कवीची अनुभूती आहे.

निर्मत्सर व्हा, प्रेमसंगमीं पोहा चिरकाल
ब्रह्मांडाचा गोल धरी या प्रेमाचा फेर,
फुले शांतिचीं अहा उधळळीं जगतीं चौफेर !

या सौंदर्यात आणि प्रेमात तल्लीन होऊन जाण्याची कवीची इच्छा आहे. इतकेच नव्हे तर त्याच्यापुढे मस्तक नमवून अनन्यभावाने तो त्यास शरण गेला आहे. बालकवी ज्या प्रेमाची उपासना करीत आहेत ते सात्त्विक, मंगल, पवित्र, अतींद्रिय असून त्याच्या कृपाकटाक्षाने सर्वत्र शांतीची अमृतवृष्टी होत आहे. बालकवी ज्या सौंदर्यदेवतेवर प्रेम करीत आहेत ती सुद्धा प्रशांत आहे. तिच्या ठायी तेज आहे, पण ते मृदुल आहे. त्यात कामुकतेचा व क्षुद्र विकारांचा अंशही नाही.

बालकवी ज्या प्रेमाची आसक्ती धरीत आहेत, त्या प्रेमाचे हे असे स्वरूप आहे. ते स्त्रीपुरुषांमधील अभिलाषेने कलंकित झालेले शारीरिक प्रेम नसून दिव्य व अतींद्रिय प्रेम आहे. जगातील सर्व गोष्टी नाहीशा झाल्या तरी हे मंगल प्रेम अबाधित राहील. 'सृष्टी निमाली स्वर्गहि नुरले, प्रेम मात्र मंगलमय भरलेले' हे 'मंगलमय प्रेमकथन' या कवितेतील वचन कवीच्या मनोवृत्तीचे उत्कृष्ट द्योतक आहे.

तात्पर्य, स्वतःच्या जीवनात जो आनंद नव्हता, जे प्रेम नव्हते, तो आनंद व ते प्रेम यांची प्राप्ती करून घ्यावी याच उद्देशाने बालकवींनी भोवतालच्या क्षुद्र, दुःखपूर्ण, स्वार्थी, सौंदर्यशून्य अशा मानवी जगताकडे पाठ फिरविली व निसर्गाशी ते तादात्म्य पावले. हे तादात्म्य इतके परिपूर्ण होते की बाह्य जगाचा त्यांना त्या तादात्म्याच्या क्षणी अक्षरशः पूर्ण विसर पडत असे. किंबहुना एका निराळ्याच अलौकिक सृष्टीत ते अशा वेळी वावरत असत. निसर्गाशी इतकी विलक्षण तन्मयता दुसऱ्या कोणत्याही मराठी कवींमध्ये दिसावयाची नाही.

## बालकवींची आत्यंतिक संवेदनशीलता :

वस्तुजातामध्ये बालकवींना जे सौंदर्य प्रतीत झाले ते इतर कवींना प्रतीत होऊ शकले नाही. याचे कारण बालकवींच्या ठायी काही विशेष सामर्थ्य होते, आणि म्हणून सौंदर्याचा साक्षात्कार त्यांना त्वरेने होत असे. एक प्रकारचा काही विशेष हळुवारपणा त्यांच्या ठायी होता. एखाद्या निष्पाप बालिकेचे मन त्यांना प्राप्त झाले होते. आनंदाची इवलीशी झुळूक आली तरी ते नाचू लागे आणि दुःखाची अंधुक छटा येताच ते कंपित होई व काळवंडून जाई. किंबहुना ते इतके मृदू होते की सुखाचा अतिरेकही त्याला असह्य झाला असता. वाऱ्याच्या मंद लहरीबरोबर डुलणाऱ्या एखाद्या नाजुक फुलाची जी अवस्था तीच त्यांच्या मनाचीही होती. आत्यंतिक भावनाशता हे त्यांच्या जीवितांचे सार आहे. अशी माणसे अगदी क्षुद्र कारणाने हर्षनिर्भर होतात आणि अगदी क्षुद्र कारणाने उदासही होतात असे ‘ क्षणांत हसणे क्षणांत रडणें ’ या वृत्तीचे वर्णन करता येईल. ‘ क्षणांत येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे ’ ही मागे उद्धृत केलेली ओळ याच वृत्तीची द्योतक आहे. ही वृत्ती अजाण मुलाची किंवा भावनावश स्त्रीची आहे आणि हीच वृत्ती बालकवींच्या निसर्गगीतांमध्ये ठायी ठायी दिसून येते. मला नेहमी असे वाटते की निसर्गाकडे तल्लीन होऊन पाहत असता बालकवींना स्त्रीचे हृदय व स्त्रीचे नेत्र प्राप्त होत असावेत. या खेरीज इतकी कोवळीक त्यांच्या गीतांत दिसली नसती. अनेक शब्द, शब्दसमूह, आणि अनेक कल्पना याचा पुरावा देण्यास समर्थ आहेत. ही कोवळीक आकर्षक आहे यात शंका नाही. पण तिचा अतिरेक झालेला असल्यामुळे कठोरतेचे थोडेसे अस्तित्व अधिकच स्पृहणीय ठरले असते.

तात्पर्य, स्वतःच्या जीवनात जो आनंद नव्हता, जे प्रेम नव्हते, तो आनंद व ते प्रेम यांची प्राप्ती करून घ्यावी याच उद्देशाने बालकवींनी भोवतालच्या क्षुद्र, दुःखपूर्ण, स्वार्थी, सौंदर्यशून्य अशा मानवी जगताकडे पाठ फिरविली व निसर्गाशी ते तादात्म्य पावले. हे तादात्म्य इतके परिपूर्ण होते की बाह्य जगाचा त्यांना त्या तादात्म्याच्या क्षणी अक्षरशः पूर्ण विसर पडत असे. किंबहुना एका निराळ्याच अलौकिक सृष्टीत ते अशा वेळी वावरत असत. निसर्गाशी इतकी विलक्षण तन्मयता दुसऱ्या कोणत्याही मराठी कवींमध्ये दिसावयाची नाही.

## बालकवींची आत्यंतिक संवेदनशीलता :

वस्तुजातामध्ये बालकवींना जे सौंदर्य प्रतीत झाले ते इतर कवींना प्रतीत होऊ शकले नाही. याचे कारण बालकवींच्या ठायी काही विशेष सामर्थ्य होते, आणि म्हणून सौंदर्याचा साक्षात्कार त्यांना त्वरेने होत असे. एक प्रकारचा काही विशेष हळुवारपणा त्यांच्या ठायी होता. एखाद्या निष्पाप बालिकेचे मन त्यांना प्राप्त झाले होते. आनंदाची इवलीशी झुळूक आली तरी ते नाचू लागे आणि दुःखाची अंधुक छटा येताच ते कंपित होई व काळवंडून जाई. किंबहुना ते इतके मृदू होते की सुखाचा अतिरेकही त्याला असह्य झाला असता. वाऱ्याच्या मंद लहरीबरोबर डुलणाऱ्या एखाद्या नाजुक फुलाची जी अवस्था तीच त्यांच्या मनाचीही होती. आत्यंतिक भावनाशता हे त्यांच्या जीवितांचे सार आहे. अशी माणसे अगदी क्षुद्र कारणाने हर्षनिर्भर होतात आणि अगदी क्षुद्र कारणाने उदासही होतात असे ‘ क्षणांत हसणे क्षणांत रडणें ’ या वृत्तीचे वर्णन करता येईल. ‘ क्षणांत येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे ’ ही मागे उद्धृत केलेली ओळ याच वृत्तीची द्योतक आहे. ही वृत्ती अजाण मुलाची किंवा भावनावश स्त्रीची आहे आणि हीच वृत्ती बालकवींच्या निसर्गगीतांमध्ये ठायी ठायी दिसून येते. मला नेहमी असे वाटते की निसर्गाकडे तल्लीन होऊन पाहत असता बालकवींना स्त्रीचे हृदय व स्त्रीचे नेत्र प्राप्त होत असावेत. या खेरीज इतकी कोवळीक त्यांच्या गीतांत दिसली नसती. अनेक शब्द, शब्दसमूह, आणि अनेक कल्पना याचा पुरावा देण्यास समर्थ आहेत. ही कोवळीक आकर्षक आहे यात शंका नाही. पण तिचा अतिरेक झालेला असल्यामुळे कठोरतेचे थोडेसे अस्तित्व अधिकच स्पृहणीय ठरले असते.

मृदुता, भावनावशता, हळवेपणा इत्यादी गोष्टी बालकवींच्या स्वभावात ओत-प्रोत भरलेल्या आहेत. त्यांच्या हृदयाचे दुकूलवस्त्र मृदुतम भावनांच्या आडव्याउभ्या धाग्यांनी विणलेले आहे आणि लुसलुशीत तृणांकुरांचा कोमलपणा त्यात सामावलेला आहे. असल्या या पराकाष्ठेच्या मृदू हृदयामध्ये निसर्गाचे रमणीय दृश्य जेव्हा संक्रांत झाले तेव्हा ते पुढीलप्रमाणे त्यांच्या गीतांत सुकुमार लावण्य धारण करून प्रकट झाले–

हिरवे हिरवे गार गालिचे – हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती – फुलराणी ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत – अव्याज मनें होती डोलत
प्रणयचंचला त्या भूलीला – अवगत नव्हत्या कुमारिकेला !
आईच्या मांडीवर बसुनी – झोके घ्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला – साध्या भोळ्या फुलराणीला !

**स्वप्नसृष्टीचे इंद्रजाल :**

भावनावशता, हळवेपणा, कोमलपणा इत्यादी गोष्टी त्यांच्या स्वभावात भिनलेल्या असतात अशी माणसे वरीचशी स्वप्नाळू असतात; स्वप्नसृष्टीचे इंद्रजाल त्यांना परा-काष्ठेचे मोहक वाटत असते. बालकवींचेही असेच झाले आहे. स्वप्नसृष्टीत सतत गुंगून कल्पनाजाल गुंफीत बसणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

To dream and dream असे टेनिसनच्या Lotus–Eaters प्रमाणे बाल-कवींचे ईप्सित आहे. ते स्वतःच जर सतत स्वप्नभूमीमध्ये विहार करीत आहेत तर त्यांच्या साध्या भोळया फुलराणीच्या नाजुक नयनांवर निद्रेची गोड झापड पडल्यावर तिला प्रणयाचे मधुर स्वप्न का पडू नये ?

त्या देवीला ओव्या सुंदर – निर्झर गातो, त्या तालावर
झुलुनि राहिले सगळे रान – स्वप्नसंगमीं दंग होउन !
प्रणयचिंतनीं विलीनवृत्ती – कुमारिका ही डोलत होती;
डुलतां डुलतां गुंग होऊनी – स्वप्नें पाही मग फुलराणी !

वस्तुस्थिती अशी आहे की या क्षणी बालकवींचे मन फुलराणीच्या डोळ्यांनी रम्य स्वप्नें पाहण्यात दंग झाले आहे. या स्वप्नसृष्टीत बालकवींनी एकदा प्रवेश केला म्हणजे जगतातील व्यथा व वेदना वितळून जातात आणि फक्त संगीताच्या लकेरी तेवढ्या उरतात; स्वप्नसृष्टीतील मदिर आणि धुंद वातावरणाचे आणखी एक दृश्य पाहा—

हळुवार हिमाचे अवगुंठन हलवोनी
गाईल सर्व निद्रिस्त विश्व डुलवोनी
सारून जरा कचभार बालिका पाहे
एकेक तारका समाधिचें सुख लाहे.
निद्रिस्त भूमिका स्वप्न जणों हे दिसलें
स्वप्नांत लाडके सुंदर डोळे भिजले!

**बालकवींच्या कल्पनाविलासाचे स्वरूप :**

बालकवींनी निसर्गाची जी दृश्ये चितारली आहेत ती सत्यसृष्टीतील नसून सर्वस्वी कल्पनासृष्टीतील आहेत. या बाबतीत त्यांच्यामध्ये व वर्ड्स्वर्थमध्ये फार मोठा फरक आहे. वर्ड्स्वर्थची निसर्गवर्णने पूर्णपणे वास्तववादी असतात. निसर्गातील वस्तू ज्याला जशा दिसल्या तशाच त्याने वर्णिल्या. स्वप्नसृष्टीत प्रवेश केला नाही. निसर्गातील दृश्ये पाहण्याचे सामर्थ्य म्हणजे कल्पनाशक्ती ( Imagination ) असा त्याचा सिद्धांत आहे. या कल्पनाशक्तीला त्याच्या दृष्टीने अर्थातच वास्तव जगातील दृश्यांकडे पाठ फिरवून स्वप्नसृष्टीत विहार करण्याचे मुळीच कारण नव्हते. निसर्गातील वस्तूंचे जे स्वरूप दिसेल त्याचे यथातथ्य वर्णन केले म्हणजे वर्ड्स्वर्थचे समाधान होते. कृत्रिम रूपकांची अथवा प्रतीकांची किंवा काल्पनिक दृश्यांची खैरात करून निसर्गवर्णने सजविण्याचे काहीही कारण नाही असे वर्ड्स्वर्थचे स्पष्ट मत आहे. निसर्गातील अगदी साध्या वस्तूच्या यथातथ्य वर्णनानेही फार मोठा परिणाम घडवून आणिता आला पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. या शक्तीला वर्ड्स्वर्थने Imagination हे नाव दिले आहे; आणि वस्तुजाताच्या वास्तव रूपाकडे बुद्ध्या दुर्लक्ष करून आपल्या स्वतःच्या मनातील भावनांचा अध्यारोप त्यांच्यावर करणे या प्रकाराला त्याने Fancy हे नाव दिले आहे. वर्ड्स्वर्थची पद्धती पूर्ण वास्तववादी आहे. वस्तुजाताचे अवलोकन केल्या-

नंतर ज्या गोष्टी प्रत्यक्ष दिसतील त्यांचेच वर्णन करणे हे त्याचे ध्येय आहे. जी गोष्ट प्रत्यक्ष पाहिलेली नाही अथवा जिची अनुभूती कोणालाही नाही तिचे वर्णन वर्ड्स्वर्थने कधीच केलेले नाही; आणि ज्या गोष्टी त्याला मूळ स्वरूपात जशा दिसल्या तशाच, अविकृत अवस्थेत त्याच्या काव्यात संक्रांत झाल्या. आपल्या प्रतिभेच्या साहाय्याने त्या गोष्टींवर अवास्तव आणि केवळ स्वप्नसृष्टीतील गोष्टीचे अवगुंठन चढवून त्याने त्या अधिक रमणीय व आकर्षक करण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. तात्पर्य, निसर्गातील दृश्ये रंगविताना त्याला सत्यसृष्टीशी संबंध नसलेल्या काल्पनिक ( Ideal ) गोष्टींचा अथवा दृश्यांचा आधार घेण्याची थोडी सुद्धा जरूर भासली नाही.

बालकवींचा कल्पनाविलास वर्डस्वर्थ ज्याला Fancy हे नाव देतो त्या प्रकारात अंतर्भूत करावा लागेल. निसर्गातील दृश्यांच्या वास्तवतेचा बुद्ध्या विपर्यास करून रुचिर काल्पनिक वातावरण त्यांच्या भोवती निर्माण करणे, आपल्या स्वतःच्या भावनांचा वस्तुजातावर आरोप करणे, वस्तूंच्या वास्तव स्वरूपाशी ज्यांचा कोणताही संबंध नाही अशा घटनांचे वर्णन करणे, सृष्टीतील विविध दृश्यांमध्ये व ध्वनींमध्ये गूढ अर्थ भरलेले आहेत अशी कल्पना करणे ही या प्रकारच्या कल्पनाविलासाची वैशिष्ट्ये आहेत; आणि बालकवींच्या गीतांत ही सारी वैशिष्ट्ये प्रकर्षाने दिसून येतात. केवळ रमणीयतेकडे लक्ष देऊन सृष्टीतील वस्तूंचे वास्तव रूप आपल्या इच्छेप्रमाणे बदलून टाकण्याची करामत हा कल्पनाविलास करून दाखवितो. वैचित्र्यपूर्ण रूपके, उत्प्रेक्षा व उपमा वापरून वाचकांचे मन तल्लीन करून टाकणे हे एकमेव कार्य अशा कल्पनाविलासाचे असते. ज्यांच्या योगे जास्तीत जास्त संवेदनांची सहानुभूती होऊ शकेल अशी दृश्ये या प्रकारचा कल्पनाविलास तयार करीत असतो. परिणाम असा होतो की, निसर्गातील ज्या वस्तूंचे वर्णन चाललेले असेल तिच्या ठायी आपले चित्त केंद्रित न होता ते काल्पनिक दृश्यांतच ( याला इंग्रजीत Imagery असे म्हणतात. ) खऱ्या अर्थाने केंद्रित होत असते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून 'बाळें तीं खेळत होतीं' या कवितेकडे बोट दाखविता येईल. या कवितेतील पुढील ओळी विशेष विचारात घेण्यासारख्या आहेत—

> वैसून सूर्यकिरणात । सोन्याच्या कारंज्यांनीं
> कधि जलदजाल खुलवावें । स्वर्गीय सुधेनें त्यांनीं

कधि चंद्रकला सजवावी । नवरंगी हार विणोनी
शांतीचा करुनी पावा
अवकाशी सूर भरावा
नक्षत्रलोक खुलवावा
सौंदर्यं उधळित होती । बाळें तीं खेळत होतीं.
एकदां सडा संध्येचा । शिंपून महोत्सव केला;
बनविले वीन बाळांनी । ओढूनि सूर्यकिरणाला
ते वाद्य वाजवायाला । अनिवार हर्ष हृदयाला
ते सांध्यगिरी बहुवर्णी
छायामय त्या निर्झरिणी
गजबजल्या सुरललनांनी
परिसाया देवहि येती । बाळें तीं खेळत होतीं.

वर्ड्स्वर्थची पद्धती व बालकवींची पद्धती यामधील फरक या एका उदाहरणावरून पूर्ण स्पष्ट होईल. निसर्गातील दृश्यांचे यथातथ्य अनुकरण करून वास्तववादी चित्र रेखाटणे हा कवीचा या ठिकाणी हेतू नसून सर्वस्वी कल्पनारम्य चित्र रेखाटणे हाच त्याचा हेतू आहे.

निसर्गाच्या सौंदर्याचे वर्णन करीत असता हिरवळ, फुले, वेली, मंद वारा इत्यादींचे वर्णन कोणताही कवी करील. पण केवळ स्वप्नसृष्टीतील दृश्य निर्माण करणारी बालकवींची लालसा ‘ ताराराणी ’ या कवितेतील पुढील ओळींत दिसून येईल.

निद्रिस्त नील वनमाला । निद्रिस्त सरोवर खालीं
वर मूक मोहनें जैसीं । शशिकिरणें विरघळलेलीं
इवलाच अधर हलवून । जल मंद सोडितें श्वास
इवलाच वेल लववून । ये नीज पुन्हा पवनास
निश्चित शांतिदेवीचा । किंचितसा चळुनी हालें
रोमांच कपोलीं भरती । कुंजांत कोकिळा बोले
घननील लतावलयांत । हिमधवल शिला तलभागीं
चमकून मोहिनी झाली । जणु कुंजकुंजनें जागीं

सौंन्दर्य-भरीं भरलेलें । तारुण्य चढे रंगास
अलवार कोंवळें अंग । जशि काय फुलांची मूस
धरि आम्रमंजिरी कानीं । हातांत जुईची वेणी
कंठांत मालतीमाला । माधवीच भासे वाला.

हे दृश्य स्वप्नसृष्टीतील असले तरी यातील कल्पनाविलास इतका उत्कृष्ट आहे की या दृश्यातील प्रत्येक घटना अगदी स्पष्टपणे डोळ्यांसमोर उभी राहते. स्वप्नाच्या धुक्यात गुरफटलेले असूनही हे दृश्य आपण स्वतः पाहत आहोत असा भास आपल्याला झाल्या-वाचून राहणार नाही. आणि बालकवींच्या कल्पनाविलासाचे हेच वैशिष्ट्य आहे.

## कल्पनासुमनांचे झेले :

तात्पर्य, बालकवी हे नेहमी स्वप्नसृष्टीत दंग झालेले असल्यामुळे निसर्गाच्या रम्य दृश्यांमध्ये त्यांची सर्व स्वप्ने साकार झाली. या स्वप्नसृष्टीत उन्मादक वातावरणात त्यांच्या कल्पनालतेला असंख्य धुमारे फुटतात. ती अत्यंत रमणीय फुलांनी बहरते. आणि या फुलांचे शेवटी झेले तयार होतात. निसर्गातील एखादे दृश्य पाहिल्यावर त्यांच्या डोळ्यांसमोर एक कल्पनाचित्र तत्क्षणी तरळू लागते आणि थोड्याच वेळात असल्या कल्पनाचित्रांची परंपराच तयार होते. ही कल्पनाचित्रे बनावयास मुळीच वेळ लागत नाही. पावसाची सर यावी त्याप्रमाणे त्यांची सर येते. कारंजातून वेगाने जलबिंदू उफाळून वर यावेत त्याप्रमाणे त्यांच्या मनातून या विविध कल्पना अत्यंत त्वरेने अक्षरशः उफाळून वर येत असतात. प्राजक्ताच्या झाडावर अनंत फुले फुलावी आणि त्यामुळे ते भारावल्यासारखे व्हावे, त्याप्रमाणे अनंत कल्पनांनी बालकवींचे मन मोहरून जाऊन ते भारावते आणि मग भारावलेल्या मनातून त्या कल्पना काव्यरूप धारण करून मूर्त होईपर्यंत त्यांना चैन पडत नाही. या त्यांच्या कल्पना विहार करावयास जातात त्या मानवांच्या सृष्टीत नाही तर अप्सरांच्या आणि पऱ्यांच्या सृष्टीत! त्यांच्या प्रतिभेची जादू अशी काही विलक्षण आहे की त्या जादूमुळे कोणत्याही वस्तूचे क्षणार्धात रूपांतर होते व ती निराळीच दिसू लागते. या सर्व वस्तू बालकवी आपल्याबरोबर अमरकन्यांच्या रमणीय उद्यानात घेऊन जातात व तेथे त्या कल्पनांवर सौंदर्याचे नवीन लखलखीत पाणी चढते. उदाहरणार्थ, 'संध्यारजनी' कवितेतील तारकांच्या आगमनाचे हे वर्णन पाहा —

संध्येच्या खिडकींत येउनी ही हंसरी तारा,
हळुच पाहते, खुणावितेही ' या-या ' कोणाला ?
पलिकडचा तो तेजोमय नव पडदा सारून
वघते, हंसते, क्षणांत लपते, ही दुसरी कोण ?
लाजत, लाजत असाच येइल सारा स्वर्लोक,
मुग्ध बालिका जमतिल गगनीं आतां नवलाख

आता कल्पनाविलासाच्या सौंदर्याचे हे भांडार पाहा—

आली होती भरती, आता अस्तसमुद्राला
त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला
कल्पतरूंचीं फुले उडालीं कीं वाऱ्यावरती ?
आकाशींच्या गंगेला कीं बुद्बुद् हे येती ?
नव टिकल्यांची चंद्रकळा कीं गगनश्री नेसे ?
स्वर्गीचें भांडार उघडलें कीं रात्रीसरसें ?
विश्वशिरावर टोप चढविला हिऱ्यामाणकांचा !

कल्पनेच्या या अवखळ प्रवाहाला जणू कसलाही अडथळा नाही. समुद्राच्या पृष्ठभागावर ज्याप्रमाणे लाटेमागून दुसरी लाट येते आणि लाटांच्या तांडवाला विसावाच नाही असे दिसते, त्याप्रमाणे बालकवींच्या कल्पनांचे नर्तन कधीही थांबणार नाही असे वाटते. ' अरुण ' या कवितेत असल्या कल्पनांची कवीने मुक्त हस्ताने खैरात केलेली आहे. आकाशातील ढगांचे रंग जसे क्षणाक्षणाला बदलतात, त्याप्रमाणे बालकवींच्या कल्पनाविलासाचे सौंदर्य क्षणाक्षणाला निरनिराळी रूपे धारण करून प्रकट होते आणि शेवटी असंख्य लोलक लावलेल्या झुंबरांप्रमाणे त्याची शोभा दिसू लागते.

**रंगाची विलक्षण आसक्ती :**

बालकवींच्या निसर्गवर्णनात आणखी एक वैशिष्ट्य आहे. रंगाची विलक्षण आसक्ती हे ते वैशिष्ट्य होय. दुसऱ्या कोणत्याही आधुनिक मराठी कवीने रंगाची अनिवार आसक्ती प्रकट केलेली नाही. निसर्गातील विविध दृश्यांमध्ये व वस्तूंमध्ये दिसणाऱ्या रंगाच्या छटा बालकवींच्या चक्षुरिंद्रियांवर जे संस्कार करतात तेच संस्कार काव्यरूप धारण करून प्रकट होतात. रंगाच्या बाबतीत बालकवींचे मन अत्यंत संवेदनशील आहे.

त्यांच्या कवनात रंगाचे जे उधळण झाले आहे त्याचा अभ्यास करण्यासारखा आहे. निसर्गातील दृश्यांमध्ये दिसणाऱ्या रंगांच्या छटांचे तर ते वर्णन करतातच; पण रत्नांचे मनोहर रंग, वस्त्रांचे रंग यांचेही वर्णन करतात. रंगांच्या विविध छटांच्या बाबतीत इतकी विलक्षण आसक्ती केवळ बाणभट्टांच्या कादंबरीत व कालिदासाच्या मेघदूतात दिसून येते. शेताचे वर्णन करीत असता बालकवी एकदा म्हणतात–' पुरा विनोदी संध्यावात डोलडोलवी हिरवें शेत. ' शेताचे पुन्हा वर्णन करीत असता ते म्हणतात– ' हीं पुढचीं पिवळीं शेतें । सळसळती गाती गीते. ' हिरवळीचे वर्णन करताना तर ते खुषीत आल्यासारखे दिसतात. हे एक वर्णन पाहा–

जा हळु हळु वळसे घेत लपत छपत हिरवाळींत
पाचूचीं हिरवीं रानें झुलव गडे झुलुझुलु गानें.

या ठिकाणी हिरवळीची पाचूच्या हिरव्या रंगाशी तुलना केली आहे. फक्त गर्द हिरव्या रंगाचीच संवेदना येथे अभिप्रेत आहे. परंतु रत्नाच्या तेजस्वी जोडीला हिर-वळीच्या अत्यंत कोवळ्या लुसलुशीतपणाची भर पडल्यास ते अधिक आकर्षक होईल यात शंकाच नाही. हिरवळ पाहिल्याबरोबर तत्क्षणी तिच्या हिरवेगारपणाची जशी संवेदना जागृत होते तशीच पूर्वीच्या प्रत्यक्ष अनुभूतीवर आधारलेली तिच्या विलक्षण कोवळेपणाची व लुसलुशीतपणाचीही जाणीव होत असते. ही निर्भेळ संवेदना ( Sensation ) होय.

' हिरवे हिरवे गार गालिचे–हरित तृणाच्या मखमालीचे ' या ओळीत हिरवळीच्या मोहक हिरव्या रंगाची संवेदना आहे, त्याचप्रमाणे मृदू स्पर्शाचीही संवेदना आहे. उंची काश्मीरी गालिच्याची लव अथवा हिरव्यागार उंची मखमलीची लव यांच्या स्पर्शाची संवेदना कवीने या ओळीत व्यक्त केली आहे. अशा रीतीने नेत्र व स्पर्श या दोन इंद्रियांचे या ठिकाणी तर्पण झाले आहे. हिरवळीच्या लुसलुशीतपणाचा आणखी एक उल्लेख आला आहे.

' चोहिंकडे लसलशित बहरल्या हिरवळी छान '

बालकवींना एकंदरीत लुसलुशीत हिरव्यागार हिरवळीचे आकर्षण विशेषच आहे

असे दिसते. ' मेघांचा कापूस ' व ' औदुंबर ' या कवितांमध्येही हिरवळीच्या दृश्याने होणाऱ्या संवेदनेचे वर्णन आले आहे.

संध्यासमयी आकाशात पश्चिम क्षितिजावर तांबूस रंगाच्या ज्या अनंत नयन-मनोहर छटा दिसतात, त्यांचेही बालकवींना मोठे आकर्षण आहे. पण प्रत्यक्षात मात्र बालकवींना संध्याकालीन रंगच्छटांतील फक्त एकाच छटेचा – सुवर्णाच्या रंगाचा – उल्लेख केला आहे.

सांज खुले सोन्याहुनि पिवळे हें पडलें – ऊन ।

या ठिकाणी सोन्याच्या तेजस्वी वर्णाचा उल्लेख आहे. ही तांबूस पिवळ्या वर्णाची छटा आहे.

बैसून सूर्यकिरणांत । सोन्याच्या कारंज्यांनीं
कधिं जलदजाल खुलवावें । स्वर्गीय सुधेचें त्यांनीं
कधिं चंद्रकला सजवावी । नवरंगी हार विणोनी

या ठिकाणीही सुवर्णाच्याच छटेचा उल्लेख आहे. बालकवींनी एका ठिकाणी कुंकुम-रसाच्या वर्णाचा उल्लेख केलेला आढळतो.

स्वर्गाचे नव लेख कुंकुमरसें ती सांध्यदेवी लिही.

बालकवींनी संध्यांसमयी पश्चिम क्षितिजावर दिसणाऱ्या तेजस्वी वर्णाच्या फार छटा दाखविल्या नसल्या तरी मेघाचे वर्णन करीत असता त्यांनी रंगांच्या विविध छटा दाखविल्या आहेत.

फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा
वरुनि कुणी गुलजार फुलविला हात कुसुंब्याचा
त्यांतहि हसली मंदपणें ती चंद्रकला राणी
कडेकडेच्या मेघावर ये मोत्यांचें पाणी

मेघ विरळ असल्यामुळे ते कापसाप्रमाणे दिसत आहेत. हा मेघांचा कापूस फिकट निळ्या रंगाचा असून त्यावर कुसुंबी रंगाची नाजुक छटा आली आहे, आणि मोत्यांच्या

तेजस्वी शुभ्र रंगाने त्या मेघाच्या कडा सारविल्यासारख्या दिसत आहेत. फिकट, निळा कुसुंबी आणि मोत्यांच्या पाण्याप्रमाणे शुभ्र अशा तीन रंगांच्या छटा कापसाप्रमाणे विरळ मेघांवर पडल्यावर त्यांना मोहक सौंदर्य प्राप्त झाल्यास नवल नाही.

मेघांच्या रंगाचे वर्णन करून बालकवी थांबले नाहीत. भोवतालच्या पर्वतांचा निळा रंग, दरीमधून वाहणाऱ्या प्रवाहांचा शुभ्र रंग आणि जिकडे तिकडे पसरलेला हिरवळीचा हिरवा रंग, यांचेही वर्णन त्यांनी केले आहे.

इंद्रनिळाचा रंग वहरवी गिरिच्या अंगाला
मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोहनमाळा
चौबाजूला थाट दाटला हा हिरवाळीचा

संध्याकाळच्या वेळी पश्चिम आकाशात दिसणाऱ्या रंगांचे, मेघांचे, आणि पर्वत, नवी कुरणे इत्यादींमध्ये दिसणाऱ्या रंगांचे बालकवींनी जसे वर्णन केले आहे तसेच प्रभातकाळी पूर्व क्षितिजावर तरळणाऱ्या अनेक रंगछटांचेही वर्णन त्यांनी केले आहे. हे वर्णन बव्हंशी संध्याकाली न रंगांच्या वर्णनासारखेच असले तरी त्यात थोडेसे निराळेपण भासमान होईल,

पूर्वसमुद्री छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणीं उधळली मूठ नभीं ही लाल गुलालाची ?
पूर्व दिशा मधु मृदुल हासते गालींच्या गालीं.

या वर्णनात सुवर्णाचा रंग आला आहेच, पण विशेष गोष्ट अशी की, येथे तांबड्या रंगाची आणखी एक छटा दिसेल. गुलालाचा लाल रंग हे येथे नावीन्य आहे. आणखी एक मोहक नावीन्य येथे आढळेल. पूर्व दिशेच्या गालांवर स्मिताची आकर्षक लालसर छटा कवीला दिसली आहे.

प्रभातकाली मेघांवर जे रंग दिसतात त्याचे वर्णन करीत असता बालकवींनी सुवर्णाचा रंग, पिवळा रंग, तांबडा रंग व पांढरा रंग याच उल्लेख केला आहे. पांढऱ्या रंगाचे वर्णन करीत असता कापराप्रमाणे असलेला पांढरा रंग बालकवींच्या डोळ्यां-समोर आहे.

हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिवळे कांहीं
रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं.
उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुररस अपुल्या अंगा.

प्रभातकालीन आणि संध्याकालीन मेघांच्या रंगांचे वर्णन करून बालकवी थांबले नाहीत. संध्यासमयीं जोराची पावसाची सर आल्यावर कृष्ण, नील जांभळ्या इत्यादी जे विविध रंग आकाशात मेघांवर पसरलेले दिसतात त्यांचे सौंदर्यही मोहक असते असे बालकवी म्हणतात. यावेळी दिसणारा मेघांचा कृष्णवर्ण घोटलेल्या काजळाप्रमाणे आहे, त्यांचा निळा रंग इंद्रनीळ मण्यापेक्षा अधिक गडद आहे, त्यांचा जांभळा रंग गोकर्णाच्या फुलासारखा आहे, आणि पांढुरका रंग तेजात मिसळलेल्या धुराच्या लाटेप्रमाणे आहे.

व्योमपोटीं जलदांची झाली दाटी,
कृष्ण कुणी काजळिच्या शिखरावाणी !
नील कुणी इन्द्रमण्याच्या कान्तिहुनी !
गोकर्णी, मिश्र जांभळे तसे कुणी
तेजांत धूमाचे उठती झोत
चकमकती पांडुरही त्यापरिस किती !

उषेच्या आगमनाचे वर्णन करीत असता पृथ्वीने धुक्याचे शुभ्र वस्त्र परिधान केले आहे असे कवी म्हणतो.

शुभ्र धुक्याचे वस्त्र लेवुनी–हर्षनिर्भरा नटली अवनी.

सूर्य उगवून त्याचा प्रकाश सर्वत्र पडल्यानंतरच्या दृश्यांचे हे वर्णन पाहा—

तेजोमय नव मंडप केला–लखख पांढरा दहा दिशांला
जिकडे तिकडे उधळित मोती–दिव्य वऱ्हाडी गगनीं येती
लाल सुवर्णी झगे घालुनी–हासत हासत आले कोणी;
कुणीं बांधिला गुलाबि फेटा झकमकणारा सुंदर मोठा.

या वर्णनात वस्त्रांच्या रंगांचे वर्णन आले आहे. तेथील झगे लाल आणि सोनेरी आहेत. पण बालकवींच्या नेत्रांना निसर्गात निळे झगेही दिसतात. पर्वतांना उद्देशून कवी म्हणतो,

नील झग्यावर वेलबुटी तो तुमच्या चढवील.

जरतारी झगा, हिरवी शाल आणि हिरवा शेला यांचेही उल्लेख बालकवींनी केले आहेत.

रूदार झगा जरतार। अंगावर हिरवी शाल.

आणि हिरवळ म्हणजे हिरवा शेला होय.

वनमालांनो, हळूच हलवा हा हिरवा शेला.

संध्यासमयीची आकाशाची शोभा अथवा सूर्योदयाच्या वेळची आकाशाची शोभा ही दृश्ये रंगांच्या दृष्टीने बव्हंशी एकरूप होत. परंतु निसर्गात इतर अनंत दृश्ये अशी असतात की, एकाच लहानश्या भूप्रदेशामध्ये निरनिराळ्या वस्तूंचे रंग अगदी स्वतंत्र रीतीने प्रतीत होतात.

Landscape मधील एकाच वेळी दिसणारे अनेक रंग ज्या कौशल्याने चित्रकार चित्रित करू शकेल, त्याच कौशल्याने प्रतिभाशाली कवीलासुद्धा ते रंग शब्दांच्या सहाय्याने व्यक्त करू शकतो व ते समग्र दृश्य जसेच्या तसे आपल्या डोळ्यांसमोर उभे राहावे अशी योजना करू शकतो. बालकवींची या बाबतीतील उत्कृष्ट कामगिरी ‘औदुंबर’ या छोट्या कवितेत पाहावयास सापडेल.

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळा सावळा झरा वाहतो बेटाबेटांतुन
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गर्दी पुढें
पायवाट पांढरी तयांतुन अडवीतिडवी पडे
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.
झाकळुनी जड गोड काळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.

हे सारेच दृश्य अत्यंत वास्तववादी आहे. दृश्य डोळ्यांना जसे दिसले तसे हुबेहूब चितारलेले आहे. त्यात कल्पनिकतेचा थोडासुद्धा लेश नाही. बालकवींच्या नित्याच्या कल्पनासृष्टीतील वर्णनांमध्ये हे वास्तववादी वर्णन फार खुलून दिसते. झुडपांच्या गर्दीतून वाहणाऱ्या झऱ्यांचे निळसर काळे पाणी, झऱ्यांच्या दोन्ही बाजूंना असलेली हिरवळ,

पलीकडे दिसणारी धूसर घरे, दाट हिरवे शेतमळे, त्या शेतमळ्यांत हिरव्या कुरणांतून चाललेली, मळलेली पांढरी पाऊलवाट, पलीकडचा काळा डोह, आणि डोहात काठावर असलेल्या औदुंबराच्या सावलीमुळे डोहातील पाण्याची पृष्ठभागावर पसरलेली काळसर छटा. अत्यंत वास्तववादी वर्णन करूनही निसर्गाच्या दृश्यातील रंगांच्या इतक्या विविध छटा कवीने केवढ्या कौशल्याने दाखविल्या आहेत ! असली वास्तववादी निसर्गगीते बालकवींनी आणखी लिहिली असती तर !

## निसर्गातील संगीत :

बालकवींच्या कवनात नेत्रेंद्रियाच्या जोडीला आणखी एकाच इंद्रियाला प्राधान्य दिलेले दिसते. ते म्हणजे कर्णेंद्रिय होय. पक्ष्यांच्या मनोहर कूजितांचा अनेक ठिकाणी उल्लेख आलेला आहे. भ्रमर, भारद्वाज, कोकिळा इत्यादी पक्षी मंजुळ गीतांनी सृष्टीच्या सौंदर्यात भर टाकीत आहेत. प्रत्यक्ष पक्ष्याला उद्देशून बालकवी स्वतंत्र कवन सहसा लिहीत नाहीत. त्यांच्या सृष्टिसौंदर्याच्या वर्णनामध्ये खगांचे कूजित भोवतालच्या वातावरणात भर टाकण्यासाठी केवळ अनुषंगाने येत असते. 'भारद्वाजास' या कवितेत भारद्वाजाच्या कूजनाचे मुळीच वर्णन नाही. त्याच्या 'भरभर' फिरण्याचेच तेवढे वर्णन आले आहे. अन्यत्र अधूनमधून या पक्ष्यांच्या गाण्याचा उल्लेख आला आहे. उदाहरणार्थ—

उठ कोकिळा, भारद्वाजा उठ गडे आतां
मंगल गाणीं टाका मोहुनि जगताच्या चित्ता !

खरे म्हणावयाचे तर बालकवींच्या दृष्टीला जे निसर्गसौंदर्य दिसत आहे, ते सर्व 'मंजुळ शब्दांहीं' दुमदुमले आहे. जिकडे तिकडे संगीत भरलेले असून त्या संगीताच्या दिव्य मोहिनीमुळे अखिल ब्रह्मांड प्रेमभराने डुलत आहे. वाऱ्याचे गाणे, ओढ्याचे गाणे, नदीचे गाणे, सर्वत्र गाणेच गाणे ! लताकुंजात संगीत, कुरणात संगीत, धबधब्यात संगीत, रानात संगीत, शेतात संगीत ! अखिल जगत् संगीतमय झाले आहे. संगीतमय वातावरणाचे हे वर्णन पाहा—या सर्व त्रुटित ओळी आहेत.

वेलीच्या वलयांत बसोनी गा कोणी गाणीं
प्रपातांतही बसुन गा कुणी मंजुळ शब्दांहीं !

सख्या मारुता गाऊनि गाणीं झोंके दे त्याला.
सरिते, गाणें तुझें सुरामधि या मिळवी बाई.

या सर्वत्र भरलेल्या गाण्याचा प्रभाव कवीने पुढीलप्रमाणे वर्णिला आहे—

पिवळीं कुरणें या गाण्यानें हर्षोत्कट झालीं,
गाऊं लागलीं, नाचुं लागलीं, वेडावूनि गेलीं.

हे मानवाने निर्मिलेले संगीत नसून हे निसर्गाचे दिव्य संगीत आहे. निर्झर वाहत असता त्याच्या ध्वनीमुळे ज्या 'संगीतति' झरतात त्यांचेच वर्णन कवीला करावयाचे आहे. अर्थात या संगीतात वैचित्र्य नसले व कंटाळवाणी एकरूपता असली तरी कवीला त्याची क्षिती नाही. त्याला ते पूर्णपणे दिव्यच वाटत असून त्याच्या योगे दिव्य शांतता जगतात निर्माण होत आहे असे त्याला दिसत आहे. निर्झराच्या संगीताचे पुढील वर्णन याची साक्ष देईल—

पर्वत हा, ही दरी दरी तव गीतें भरलीं सारीं
गाण्यानें भरलीं रानें वर खालीं गाणें ! गाणें !
गीतमय स्थिरचर झालें ! गीतमय ब्रह्मांड डुले !
व्यक्त तसें अव्यक्तहि तें तव गीतें डुलतें झुलतें !
मुरलीच्या काढीत ताना वृंदावनि खेळे कान्हा;
धुंद करूनि तो नादगुणें जडताही हसवी गानें;
दिव्य तयाच्या वेणुपरी तूंहि निर्झरा ! नवल परी–
गाऊनि हें झुळझुळ गान विश्वाचें हरिसी भान !

त्यामुळे ओढ्याचे मंजुळ गाणे व भ्रमरादिकांचा गुंजारव यांच्या योगे बालकवींच्या मनात संगीताविषयी ज्या कल्पना निर्माण झाल्या आहेत त्या तेवढ्या त्यांनी आपल्या कवनात वर्णिल्या आहेत. हे 'दिव्य' गाणे आहे एवढेच त्यांना समजत आहे.

चराचराच्या चित्तीं भरलें दिव्याचें गान
मूर्त गान हें दिव्य तयाला गाणारे कोण ?
दिव्य गायनें दिव्य शांतता दिव्याचे झोत.
वसुंधरेच्या अरुण ओततो नकळत हृदयांत.

बालकवींचे मन संवेदनशील असले आणि त्यांची कल्पनाशक्ती तरल असली तरी ती कल्पनाशक्ती केवळ नेत्रेंद्रीय व श्रवणेंद्रिय या दोनच इंद्रियांशी संबद्ध असलेल्या संवेदनापुरतीच मर्यादित आहे असे दिसून येईल. म्हणजेच पंचेन्द्रियांच्या विषयांपैकी फक्त शब्द व रूप या दोनच विषयांपुरत्या त्यांच्या संवेदना मर्यादित आहेत. मृदू स्पर्शाच्या संवेदनाची जाणीव बालकवींना फक्त एकदाच झालेली आहे. पण ती सुद्धा त्यांनी स्पष्ट शब्दांत प्रकट केलेली नाही. ' हिरवे हिरवे गार गालिचे-हरित तृणाच्या मखमालीचे ' हे ते उदाहरण होय. सर्वांनाच या उदाहरणात स्पर्शसंवेदनेचे अस्तित्व भासमान होणार नाही. हे झाले स्पर्शसंवेदनेविषयी. घ्राणेंद्रियाचा विषय जो गंध त्याची दखलही बालकवींना नाही. ' मोदभरे, रानभरे, मंद सुगंधाते विखरे ' या ओळीस सुगंध हा नुसता शब्द आला आहे. बालकवींनी फुलांचे व त्यांच्या सुवासाचे वर्णन कोठेही केलेले नाही. या विषयाची त्यांना जाणीवही नाही. मनाला धुंद व उन्मत्त करून टाकणाऱ्या सुगंधाचे सौंदर्य बालकवींना माहीत नाही.

जिव्हेचा विषय जो रस त्याचेही वर्णन बालकवींनी केले नाही. एकच मामुली उदाहरण आढळले. ' रव करिती, भृंगतति, पुष्पांचा मकरंद पिती ' हे ते उदाहरण होय.

तात्पर्य, पंचेंद्रियांच्या विषयांपैकी शब्द ( ध्वनी ) व रूप ( दृश्य जगत् ) या दोनच विषयांची संवेदन बालकवींना आहे असे दिसते. म्हणजे सर्वसामान्य माणसांना ज्या गोष्टींची जाणीव तत्क्षणी होते त्याच गोष्टींची जाणीव बालकवींना आहे. फरक इतकाच की त्यांची नेत्रेंद्रियाच्या बाबतीतील संवेदनशीलता अत्यंत तीव्र असल्यामुळे ते सृष्टीतील विविध रंगांच्या छटांचे इतके मनोरम वर्णन करू शकले.

संवेदनशीलता ( sensibility ) सूक्ष्म अवलोकन, व यांच्या जोडीला पराकाष्ठेचे भावनाप्राधान्य या गोष्टी बालकवींच्या ठायी भरपूर प्रमाणात असल्यामुळे निसर्गातील काही विशिष्ट प्रकारच्या सौंदर्याचे बालकवींना कलापूर्ण रीतीने वर्णन करता आले. कोणतेही दृश्य पाहताक्षणीच तद्नुरूप संवेदना त्यांच्या मनात जागृत होत असे. आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की, या संवेदनाशी त्यांचे कमालीचे तादात्म्य होत असे. तादात्म्याची ही अवस्था म्हणजे ब्रह्मानंदाचीच ( ecstacy ) अवस्था होय. या अवस्थेमध्ये बालकवींचे मन विलीन झाले म्हणजे सर्व स्थिरचर विश्वामध्ये संपूर्ण आनंदच

कोंदून भरलेला आहे असा त्यांना विश्वास वाटे आणि त्या आनंदाच्या उद्रेकाचे निर्झर त्यांच्या गीतांतून खळाळू लागत.

## मानवी व्यथांची निसर्गावर छाया :

सौंदर्य, प्रेम, आनंद व संगीत यांनी निसर्ग अगदी ओतपोत भरलेला आहे व मानवी दुःखाचा काळिमा निसर्गसौंदर्याला कधीही मलीन करू शकणार नाही; उलट निसर्गाच्या सौंदर्यपूर्ण सान्निध्यात मानवच आनंदमय होईल, ही एकच भावना बालकवींनी घोळून घोळून व्यक्त केली आहे. निसर्गाचे वर्णन करीत असता निसर्गाच्या ठायी भरलेले सौंदर्य व मानवी जीवनाची विरूपता, निसर्गात ओतप्रोत भरलेला आनंद व मानवी जगतातील विषण्णता, इत्यादी आत्यंतिक विरोध बालकवींनी अनेक गीतांतून स्पष्ट केला आहे; पण मानवाची दुःखे निसर्गात प्रविष्ट झाल्याचे बालकवी सहसा दाखवीत नाहीत. पण याला एकच कविता अपवाद आहे. 'पाखरास' ही ती कविता होय. या कवितेतील पाखरू दुःखाने अगदी खिन्न झाले आहे; आणि कवी त्यास प्रेमाने सहानुभूती दाखवीत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, कवी स्वतः अत्यंत उदासीन आहे, यामुळे ते पाखरूही अत्यंत दुःखी आहे असे त्याला वाटत आहे. आता कवी व ते पाखरू यांचे कमालीचे तादात्म्य झाले आहे. पाखराला उद्देशून कोणीही गाणी म्हटली नाहीत, रानात जाऊन त्यांच्यासाठी कोणीही अश्रू ढाळले नाहीत. बरोबरच आहे. सुखी जीवन असले म्हणजे सर्व त्या सुखाच्या उबेत राहण्यासाठी धडपडत असतात. दुःखाच्या वेळी मात्र कोणीही कोणाचा वाली नसतो. आणि पाखराचे जीवन दुःखपूर्ण असल्यामुळे त्याला कोण सहानुभूती दाखविणार ? असा कवीचा प्रश्न आहे.

> पाखरा, गाइलें तुला कधींहि न कोणी
> नच अश्रु गाळिले कुणी वनीं येवोनी
> निश्वास धावती सौख्यामागें सारे
> दुःखाचा वाली कुणा कुणीहि न बा रे !

भोवतालचे वातावरण कितीही आनंदी असले तरी पाखराच्या मनातील विषण्णतेची घनदाट छाया मात्र थोडीही कमी होत नाही. सूर्याच्या कोमल किरणांनी कमले उमलली, कोकिळा उन्मत्तपणे गाऊ लागल्या. फुलपाखरे स्वैरपणे बागडू लागली, तथापि पाखरांचे

गाणे मात्र केविलवाणेच आहे. दुपार झाली. सूर्याच्या वदनावर रागीट छटा दिसू लागली, कळ्या कोमजल्या, वारे उष्ण झाले, तथापि त्या पाखरांची खिन्नता सकाळी होती तशीच कायम राहिली आहे. निसर्ग बदलत आहे, पण पाखराच्या विषण्णतेत काहीही बदल नाही.

निष्प्रेम मनाचें गाणें केविलवाणें
तें तुझें मात्र राहील तसेंच्या तैसें.

संध्याकाळ झाली, सूर्य कलला, तारका उगवू लागल्या, रात्र झाली, जग निद्रेच्या समाधीत गुंग झाले. पृथ्वीला निद्रेत जणू मोहक स्वप्न पडू लागले. सर्व वातावरण सुखपूर्ण झाले. परंतु त्या दुःखी पाखराला त्याचे काय होय !

परि तोहि काळ तव हृदया नच सुखदायी
निष्प्रेम मनाला कोठेंही सुख नाही.

रात्र संपली, पुन्हा प्रभात झाली, सूर्याचे कोमल किरण दिसू लागले. सारे जग हा वेळपर्यंत समाधीतच गुंग होते. पण पाखराला मात्र थोडीसुद्धा शांतता माहीत नव्हती. कोणत्यातरी काटेरी झुडपात बसून ते पाखरू आपले विषण्णतेने भरलेले करुण गाणे म्हणत होते.

असली ही विषण्ण अवस्था चिरकाल टिकवायची असेल तर जगणे हेच त्या पाखराला मृत्यूपेक्षाही अधिक दुःखद नाही का ? त्याचे करुण गीत त्याच्या दुःखी जीवनाबरोबरच संपावयाचे असेल तर त्याच्या त्या उदास जीवनाचा अंत करणारा दिवस त्याच्या दृष्टीने भाग्याचाच ठरेल यात शंका नाही. एखादा पारधी येईल. गोफण झाडील, आणि अगोदरच पिचून गेलेले पाखराचे हृदय छिन्नविछिन्न होऊन काट्यांवर पडेल. आणि मरता मरता एक आर्त किंकाळी फोडून त्याचे पोळलेले हृदय अखेर मृत्यूमुळे निवेल.

येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा
फिरवून भरारा गोफण तो झाडील
कांट्यावर उपडे भग्न हृदय पाडील !
मग एकच धडकी, एकच अंतिम बोल
गाऊन तुझे हे जळते हृदय निवेल !

मानवी जगतातील अनेक दुःखद घटनांमुळे व्यथित झालेले कवीचे निष्प्रेम मन आपले केविलवाणे गाणे म्हणत असता त्या पाखराचे गाणेही त्याला आपल्या गाण्याप्रमाणेच उदास व केविलवाणे वाटत आहे. भोवताली आनंद व सौंदर्य यांचे अस्तित्व असताही कवीला त्यांचे आकर्षण वाटत नाही. म्हणून निसर्गाकडे त्याने धाव घेतली असता, तेथेही त्याला आपल्याच विषण्ण भावनांचे प्रतिबिंब दिसते. वस्तुस्थिती अशी आहे की, कवीचे व त्या पाखराचे पूर्ण तादात्म्य झाले आहे. कवीचेच पाखरात रूपांतर झाले आहे असे म्हणावयास हरकत नाही. पाखरू विषण्ण गीत गात आहे, याचा अर्थ स्वतः कवीच ते गीत गात आहे. मृत्यूने पाखराच्या निष्प्रेम मनाची तळमळ थांबेल. याचाच अर्थ असा की, कवीच्या निष्प्रेम व पोळलेल्या हृदयाला शांतता प्राप्त करून देण्यास जगात एका मृत्यूखेरीज कोणी समर्थ नाही. त्या पाखराचे छिन्नविच्छिन्न झालेले हृदय काट्यांवर उपडे पडेल आणि शेवटचा एकच करुण बोल गाइल्यावर त्याची सारी धडपड थांबेल. कवीचे हृदयही भग्न झालेले आहे. त्याचे केविलवाणे बोल मृत्यू आला म्हणजेच विरून जातील. प्राणज्योत विझून गेल्यावर त्या हृदयाची धडपड कायमची बंद पडेल आणि त्याच्या यातना अखेर संपतील.

केवळ दिव्य सौंदर्य, स्वर्गीय आनंद, अलौकिक प्रेम व रुचिर शांती यांनी परिपूर्ण भरलेल्या बालकवींच्या अनेक निसर्गगीतांत हे एकुलते एक गीत मानवी भावनांनी निथळून निघाल्यासारखे वाटते. मानवाचे तीव्र दुःख या ठिकाणी निसर्गात प्रविष्ट झाले आहे. यामुळे हे गीत मनाला चटका लावून सोडते यात शंकाच नाही.

## पुन्हा मूळ पदावर :

पण बालकवींची मनाची अवस्था फार थोडा वेळ टिकली. या गीतात प्रकट झालेल्या भावना अत्यंत उत्कट आहेत यात शंका नाही. पण पुन्हा त्यांच्या मूळ प्रवृत्तीने उचल खाल्ली आहे. पुन्हा त्यांना दिव्य अमूर्त सौंदर्याचा मोह पडलेला आहे. आणि आपली तीव्र दुःखे या सौंदर्याच्या सान्निध्यात विसरून जाण्याचा ते उत्कट प्रयत्न करीत आहेत. यामुळे —

सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि घ्यावें
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे

प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कार्नी
बनवावें मन धुंद रंगुनी काव्यसुधापानीं !

अशी त्यांची पुन्हा आत्यंतिक वृत्ती बनलेली दिसत आहे. असली वृत्ती ज्या माणसाची बनलेली आहे, त्याला भोवतालच्या जगातील दृश्ये नष्ट करावीत व त्याची उन्नती करावी असे कितीही प्रामाणिकपणे वाटले तरी आपली इच्छा कृतीमध्ये उतरविता येणे त्याला सर्वथा अशक्य आहे. आपले या बाबतीतील सामर्थ्य किती, आपले मन नेहमी कोणत्या गोष्टींकडे अधीर होऊन धावते, हे कळल्यावर बालकवींनी आपला सारा प्रतिभाविलास एकाच, म्हणजे निसर्गसौंदर्याच्या कामातच, उपयोगात आणला. हे एका अर्थी रास्तच झाले असे म्हणावयास हरकत नाही. ' सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि ' घेणें हे त्यांना मानवी जीवनाचे सार वाटत आहे. आदर्शभूत जीवनाचे हे त्यांचे स्वप्न आहे. ' मीतूंपण तें क्षणि विसरवितें, लावि अखंड ध्यास जिवातें ' हे त्यांच्या दृष्टीने काव्याचे कार्य आहे. अशा स्थितीत खास आपले कार्य त्यांनी सोडून दिले असते व जग सुधारण्याची किंवा जगाला उन्नतीचा महामंत्र शिकविण्याची महदाकांक्षा त्यांनी बाळगली असती तर ती त्यांची मोठी चूक झाली असती. खरे म्हणावयाचे तर व्यवहारात प्रत्यक्ष काही कृती करून जगाची बिघडलेली घडी फिरून नीट बसविणे ही गोष्ट रोमँटिक कवीच्या सर्वस्वी आवाक्याबाहेरची असते. मग स्वप्नसृष्टीत रममाण होणे हाच ज्यांचा मूळ स्वभाव अशा बालकवींनी आपले खास क्षेत्र कोणते ते अजमावून त्यातच आपला सारा कल्पनाविलास प्रकट करावयाचे ठरविले हे युक्तच झाले. बालकवींसारख्या हळव्या कवींनी ' प्रेमाला गाता गाता ' स्वप्नात गुंग होऊन जावे. जगतात वटवृक्षासारखे वृक्ष ऊन–पाऊस धीराने सोसून इतरांना छाया देण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम करीत असतात. पण कुंदकळ्यांना हे काम कसे करता येणार ? पण यामुळे कुंदकळ्यांनी आपल्या दुर्दैवाला दोष देत बसण्याचे काहीच कारण नाही. आपल्या सौंदर्याने व सुवासाने मानवाला मुग्ध करून टाकणे हेच त्यांचे जीवितकार्य असते. याप्रमाणेच बालकवींसारख्या भावनावश, हळव्या, सौंदर्यपिपासू कवीचे कार्य निराळे, आणि क्रियावान समाजसुधारकांचे कार्य निराळे !

**धर्मवीरांचा विष्कंभक :**

पण १९१४ च्या सुरुवातीस केव्हातरी मानवतेचे व व्यापक धर्माचे उदात्त

विचार त्यांच्या मनात आले. समाजातील दुष्ट रूढींवर व अन्यायांवर आगरकरांप्रमाणे किंवा केशवसुतांप्रमाणे अत्यंत कडक टीका करावी, अशी कल्पना त्यांच्या मनात प्रादुर्भूत झाली आणि त्यांनी ' धर्मवीर ' ही कविता लिहिली. या कवितेतील सत्याचा आग्रह, सर्वांभूती प्रेम, खोट्या धर्मकल्पनांवरील टीका इत्यादी गोष्टी आक्षेपार्ह आहेत असे म्हणता येणार नाही. त्यांनी या कवितेत प्रतिपादिलेले ध्येय उदात्त नाही असे कोणीही म्हणू शकणार नाही. त्यांच्या भावना प्रामाणिक नाहीत असेही म्हणता यावयाचे नाही. पण जे ध्येय या कवितांपुरते बालकवींनी आपल्यापुढे ठेवले आहे ते साध्य करण्यासाठी ज्या प्रकारचा कणखरपणा अंगी असावा लागतो त्याचा लेशही दुर्दैवाने बालकवींच्या ठायी नाही हीच खरी तक्रार आहे. आपला या बाबतीतील दुबळेपणा बालकवींच्या लवकरच प्रत्ययास आला असला पाहिजे. कारण धर्मवीराची कोणतीही आवृत्ती पुढे निघाली नाही आणि ' तुतारी ', ' दसरा ', ' शिंग ' या कवितांच्या अनुकरणाने त्यांनी इतःपर काहीही लिहिले नाही. आणि मानवतेच्या विशाल ध्येयाची स्वप्ने रंगविण्याचा, नवीन मानवाच्या अमर्याद आकांक्षा व्यक्त करण्याचा, त्यांचा आवेग ' धर्मवीर ' या एका कवितेतच अस्तंगत झाला.

या विष्कंभकानंतर आपला मार्ग कोणता हे त्यांच्या पक्केपणी ध्यानात आले असले पाहिजे. सौंदर्याचा साक्षात्कार करून घेणे व निसर्गात भरलेला आनंद आपल्या जीवनात अवतीर्ण करणे हेच आपल्या जीवनाचे सार आहे, हे पुन्हा एकदा तीव्रतेने ध्यानात आल्यावर ते पूर्वीप्रमाणेच निसर्गाशी तन्मय झाले. तत्त्वज्ञानाचा मार्ग सोडून देऊन ते आनंद-संप्रदायाकडे वळले. तत्त्वज्ञानाच्या विचारांनी अखेर संदेहाचीच अवस्था आल्यामुळे तत्त्वज्ञानाचे क्षेत्र त्यांना वर्ज्य झाले, आणि ध्येयवाद आपल्या आटोक्यातील नाही या ज्ञानाच्या साक्षात्कारामुळे ध्येयवादाचे आविष्करण संपले.

## बोध न करणारा निसर्ग :

निसर्गाशी तादात्म्य पावल्यामुळे बालकवींना निसर्गातूनच बोध घेता येणे शक्यच नव्हते. निसर्गाच्या निकट सान्निध्यामुळे त्यांना सौंदर्य, प्रेम व आनंद या त्रयींचा साक्षात्कार झाला. यापरते निसर्गाचे त्यांनी कोणतेही तत्त्वज्ञान शिकविले नाही. आणि इतरांना बोधामृत पाजावयास सापडावे या हेतूने त्यांनी निसर्गाचा उपयोग करून घेतला

नाही. निसर्ग व मानव यांच्यामधील विरोध त्यांनी अनेक ठिकाणी स्पष्ट केला असून निसर्गाची आनंदमयता व सौंदर्यपूर्णता यांवर भर दिलेला आहे, हे खरे असले तरी वर्डस्वर्थने केले, त्याप्रमाणे निसर्गातील वस्तूंच्या द्वारे त्यांनी मानवाला कोणतेही धडे दिले नाहीत. निसर्गातील वस्तूंच्या ठायी मानवी भावनांचा व मानवी कृतींचा त्यांनी वारंवार अध्यारोप केलेला आहे हे खरे असले तरी वस्तू मानवी जगातील निरनिराळ्या नैतिक सद्‌गुणांची प्रतीके आहेत असे त्यांनी मानले नाही. निसर्गाच्या सौंदर्यपूर्ण वातावरणात मनुष्य वावरत असला तरी कित्येक वेळी निसर्गाच्या स्वरूपाच्या अगदी विरुद्ध स्वरूप मानवी जगताचे असते. ' हा प्रभाव या जगताचा! दोषावे यात कुणाला ? ' निसर्गातील दृश्ये अलौकिक सौंदर्याने नटलेली असली आणि त्यातील वस्तुजातात आनंद भरलेला असला तरी मानवी मन दुःखातच मग्न झालेले असते. याचा अर्थ असा की, मानवी दुःखाशी निसर्गाचा काहीच संबंध नसून तो या बाबतीत अगदी उदासीन असतो. निसर्ग आपल्या दुःखात सहभागी आहे अशी खोटीच कल्पना मानव करून घेत असतो. निसर्गाच्या सान्निध्यात राहूनही मानव आपली दुःखे काही वेळा विसरू शकत नाही, याचे कारण निर्सगाची ही अलिप्तताच नाही काय ?

सुंदर सगळें, मोहक सगळें
खिन्नपणा परि मनिंचा न गळे,
नुसती हुरहुर होय जिवाला–कां न कळे कांहीं ।
चंद्रबिंबि धरि अभिनव कांती !
मेघ तयांनीं धवलित होती
परि हृदयीं नैराश्यकालिमा–मम खंडत नाहीं ।

मानवाच्या सुखदुःखांशी निसर्गाचा काहीही संबंध नाही. निसर्गाला मानवाविषयी सहानुभूती वाटण्याचे कारण नाही. निसर्गाच्या सौंदर्यमय व आनंदमय वातावरणात राहूनही मनुष्याची विषण्णता अनेक वेळा कमी होत नाही; किंबहुना निसर्ग हा या बाबतीत पूर्णपणे उदासीनच असतो अशी कल्पना केली तर तो मानवाला कसचा बोध करणार ? विद्यमान क्षणाला प्राप्त झालेल्या संधीचा फायदा घेऊन निसर्गाच्या सौंदर्याचा जितका साक्षात्कार करून घेता येईल तितका घ्यावा आणि निसर्गात ओतप्रोत भरलेल्या

आनंदाचा जेवढा अंश प्राप्त करून घेता येईल तितका घ्यावा, इतकेच मानवाचे कर्तव्य होय. भविष्यकाळात काय होणार असेल ते होवो. चालू क्षणी जो आनंद निसर्गाच्या सान्निध्यात प्राप्त करून घेण्यासारखा असेल तो अवश्य प्राप्त करून घेतला पाहिजे असा कवीचा आशय आहे.

नसत्याची भीती धरुनी । असतें का घ्यावें त्यजुनी ?
कां म्हणुनी वेडे व्हावें । चुम्बतची यासम जावें
भासाचीं सर्वहि सुमनें । चला चला चुम्बित वदनें
होइल मग सर्वचि गोड । मरण गोड जगणें गोड
दुःखाश्रूंतिल ही गोडी । हास्याहुनि नाहीं थोडी.

निसर्गातील सौंदर्यपूर्ण व आनंदपूर्ण वातावरणाते 'दुःखाश्रूंतील ही गोडी' हास्याच्या योग्यतेची मानणे म्हणजे केवळ दुःखात सुख मानणे यापेक्षा काही निराळे नाही. निसर्गाच्या रम्य सान्निध्यात असे मानणे हे केवळ निराशेचे आणि औदासीन्याचेच द्योतक आहे यात शंका नाही. परंतु बालकवींचा हा मनोधर्म आहे आणि त्याचा त्यांना कधीच त्याग करवणार नाही.

तात्पर्य, निसर्गाच्या द्वारे मानवाला उपदेश करण्याचे अथवा बोध देण्याचे काम बालकवींना का करता आले नाही, याची ही अशी कारणमीमांसा आहे. तथापि निसर्गातून त्यांना तत्त्वज्ञान प्राप्त झाले नसले अथवा बोध मिळाला नसला तरी त्याच्या सौंदर्यपूर्ण स्वरूपाची व त्याच्या आनंदमयतेची त्यांना जाणीव आहे; आणि यामुळे त्या दिव्य सौंदर्याचे स्तवन करणे हे त्यांचे सुखनिधान आहे.

**बालकवींची शब्दसंपदा :**

मानवी जीवनाचे उद्दिष्ट; काव्याचे प्रयोजन इत्यादी गोष्टींच्या बाबतीतील विचार-सरणी कोणती आहे याचा तपशिलाने विचार करून त्यांना अभिप्रेत असलेले जे दिव्य सौंदर्य, त्याचा आविष्कार करीत असता बालकवींचा कल्पनाविलास कोणती विविध रूपे धारण करून प्रकट होत असतो, हे आपण पाहिले. त्याचप्रमाणे त्यांच्या अंतरंगात खोलवर रुजलेल्या प्रवृत्तीचेही मर्म समजावून घेतले. आता त्यांचा कल्पनाविलास ज्या शब्दांचे दुकलवस्त्र परिधान करून प्रकट होत असे, आणि ज्या शब्दांमुळे त्या कल्पनांना आकार

प्राप्त होत असे, त्या शब्दांच्या सौंदर्याचे स्वरूप पाहावयाचे तेवढे उरले आहे. आत्यंतिक भावनावशता, संवेदनशीलता आणि सूक्ष्म अवलोकन या गोष्टी कल्पनाविलासाला आवश्यक आहेत, यात शंकाच नाही. पण येवढ्याने भागत नाही. कल्पनाचक्षूंपुढे उभी राहिलेली दृश्ये कितीही मनोरम असली तरी ती दृश्ये मूर्त व साकार झाल्याशिवाय इतरांना त्यातील हृद्यत्व कसे समजणार ? आणि म्हणून मूळ कल्पना जितकी रमणीय तितकीच तिची प्रत्यक्ष मूर्तीही रमणीय असावी लागते. कल्पनांची मूर्ती तयार होते व तिला आकार प्राप्त होतो तो शब्दांच्यामुळे. आणि म्हणून ज्या प्रकारची कल्पना असेल त्या प्रकारचेच शब्द तिच्या आविष्करणासाठी कवीला उपलब्ध झाले तरच कवीला ज्या कल्पनेचे प्रथम स्फुरण झाले ती कल्पना रुचिर स्वरूप धारण करून वाचकांसमोर उभी राहील. याचाच अर्थ असा की, भावनाविष्काराला अथवा कल्पनाविष्काराला उचित शब्दांच्या साधनाची मदत घ्यावी लागते.

कोणत्याही दृश्याच्या अवलोकनाने ज्या संवेदनांची जागृती बालकवींच्या मनात होत असे त्या संवेदना तत्क्षणी मूर्त स्वरूप धारण करीत असत; याचे मुख्य कारण म्हणजे बालकवींजवळ शब्दांचा खजिना नेहमी भरलेला असे. शब्दांची वाण बालकवींना कधीच पडली नाही. असंख्य शब्द गोजिरवाणा वेष धारण करून त्यांच्या दाराशी जणू नेहमी सज्ज असत व कवी आपणाला केव्हा आत बोलावती याचीच जणू वाट पाहत असत. श्रावणमासात ‘ क्षणात येते सरसर शिरवें ’ त्याप्रमाणे बालकवींच्या अंगणात शब्दांची सर येत असे. वसंतऋतूत आगमनाने झाडाच्या फांदीफांदींवर कोवळ्या लुसलुशीत पालवीचे असंख्य धुमारे फुटावेत त्याप्रमाणे बालकवींच्या चित्तात शब्दांचा उद्भव होत असे. त्यांची कल्पना अनुकूल शब्दांची वाट पाहात ताटकळत उभी राहिली आहे असे कधीच व्हावयाचे नाही. ‘ शब्दांनो, मागुते या ’ अशी केशवसुतां-प्रमाणे शब्दांची आर्जवे करीत बसण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधीच आला नाही. ते त्यांच्या सेवेसाठी हात जोडून नेहमी उभेच असत. किंबहुना कवींच्या मनात कोणत्या क्षणी कोणत्या कल्पनांचा उद्भव झालेला आहे हे जणू अंतर्ज्ञानाने ओळखून आपली आता गरज लागणार या विचाराने ते त्या कल्पनेला सामोरे जात असत.

बालकवींच्या जवळ नुसता शब्दांचा भरणा आहे असे नाही. एखादी कल्पना

परिणामकारक रीतीने व्यक्त करण्यासाठी त्या कल्पनेचा अर्क ज्याच्यामध्ये सामावलेला असा अत्यंत वेचक शब्द हे शोधून काढतात. /

या एका शब्दाने स्वतःला अभिप्रेत असलेलीच संवेदना ते वाचकांच्याही मनात निर्माण करू शकतात. केवळ एका शब्दात कांही वेळा अनेक संवेदना सामावलेल्या असतात. त्या एका शब्दाच्या उपयोगाने कितीतरी कल्पना वाचकांच्या मनात तरळून जातात. जे काम अनेक वाक्यांना करता येणार नाही ते काम असा एखादा शब्द लीलेने करून जातो. याला इंग्रजीत word-magic म्हणतात. असल्या शब्दांच्या सभोवती अनेक सहचारी कल्पनांचे रुचिर जाळे गुंफलेले असते; आणि या सहचारी कल्पना ( association ) प्रादुर्भूत झाल्या म्हणजे शब्दांचे ईप्सित साध्य झाले.[१]

बालकवींच्या गीतांतील काही उदाहरणांच्या साहाय्याने वरील विवेचन अधिक विशद करता येईल. ' माणिक हें, बाई गडे झुलतें आहे ' या फुलाच्या वर्णनातील ' झुलतें ' हा शब्द वाऱ्याबरोबर डोलणाऱ्या फुलाचे नर्तन तावडतोब डोळ्यांसमोर उभे करतो. याच कवितेतील आणखी एक हृद्य कल्पना पाहा.

दंवमाला उपमा कसलीं तरि त्याला
टपटपती स्वर्भूच्या हृदयावरती

या उदाहरणातील ' टपटपती ' हा शब्द अत्यंत आकर्षक आहे. दवबिंदूचे एकाच शब्दात अत्यंत परिणामकारक वर्णन करावयाचे आहे असे समजून वाचकांनी या शब्दाऐवजी दुसरे शब्द वापरून पाहावेत म्हणजे ' टपटपती ' हा शब्द किती अन्वर्थक व वेचक आहे याची त्यांना साक्ष पटेल. ' संध्येच्या सुंदर छाया । निमिषांतच काजळताती ' या ओळीतील ' काजळताती ' हा शब्दही सुचक व परिणामकारक आहे. ' हा कुरणांचा-थाट दाटला ' या वाचनातील ' थाट दाटला ' या शब्दांमुळे हिरवळीचे सौंदर्य व तिचा दाटपणा या दोन्ही गोष्टी प्रकट झाल्या आहेत. ' एकदा सडा संध्येचा शिंपून महोत्सव केला. ' या ओळीत ' सडा ' या शब्दाने संध्याकालीन आकाशात रंगाची जी वृष्टी होत असते तिची प्रचीती येत आहे. ' थबथबली ओथंबुनि खाली आली ' या मेघपंक्तीच्या वर्णनातील ' थबथबली ' हा शब्द संवेदनानिर्मितीच्या बाबतीत अत्यंत परिणामकारण आहे. हाच प्रकार ' क्षणात येते सरसर शिरवें ' या पावसाच्या

सरीच्या वर्णनातील ‘ सरसर ’ या शब्दाच्या बाबतीत झाला आहे. ‘ चोहिंकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान ’ या ओळीतील ‘ लसलशित ’ हा शब्द हिरवळीचे मार्दव व तेजस्वीपणा या दोन्ही गोष्टी व्यक्त करण्याचे काम उत्कृष्टपणे बजावीत आहे. त्याचप्रमाणे ‘ हिरवे हिरवे गार गालिचे; हरिततृणांच्या मखमालीचे ’ या वर्णनातील ‘ हिरवेगार ’ व ‘ मखमालीचे ’ या दोन शब्दांनी रंग व स्पर्श या दोन्ही संवेदनांची ( Visual image व tactual image ) अनुभूती होते. अनेक वेचक शब्दांच्या उपयोगामुळे सबंध वर्णनच कसे रमणीय होते हे पाहावयाचे असल्यास ‘ निर्झरास ’ या कवितेतील काही ओळींचा अभ्यास करण्यासारखा आहे—

गिरीशिखरें वनमालाही दरी दरी घुमवित येई !
कड्यावरूनि घेऊनि उड्या खेळ लतावलयीं फुगड्या
घे लोळण खडकावरुनि फिर गरगर अंगाभोवतीं
जावे हळुहळु वळसे घेत लपत छपत हिरवाळीत,
घे लोळण खडकावरूनि फिर गरगर अंगाभवतीं,
पांचूचीं हिरवीं रानें झुलव गडे झुळुझुळु गानें
हीं पुढची पिवळी शेतें सळसळती गाती गीतें
गर्द सावल्या सुखदायी वेलींची फुगडी होई
इवलालीं गवतावरती रानफुलें फुलती हंसती
झुलवित अपुले तुरेतुरे निळीं लव्हाळीं दाट भरे.

या वर्णनातील ‘ घुमवित ’, ‘ उड्या ’ ‘ फुगड्या ’, ‘ लोळण ’, ‘ इवलाली ’ या शब्दांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या संवेदना निर्माण करण्याचे केवढे विलक्षण सामर्थ्य आहे हे लक्षात घेतले म्हणजे बालकवी अत्यंत वेचक शब्द शोधून काढण्यात किती कौशल्य वापरीत असत ते सहज दिसून येईल.

अर्थ व ध्वनी यांचा गोड मिलाफ ज्यांच्यामध्ये झाला आहे, असे अनेक शब्द वरील अवतरणात आढळतील. याला इंग्रजीत onomatopoetic words म्हणतात. ‘ सळसळती ’ हा शब्द तर अप्रतिम आहे.

रानफुलांचे वर्णन करीत असता वरील अवतरणात बालकवींनी ‘ इवलाली ’

हाःशब्द वापरलेला आहे. रानफुलांचा कमालीचा नाजुकपणा कवीला व्यक्त करावयाचा आहे. हा सारा नाजुकपणा ' इवलाली ' या अत्यंत कोमल व सुकुमार शब्दात प्रकट झालेला आहे. सौकुमार्य हा गुण बालकवींच्या काही कवितांत प्रकर्षाने प्रकट झालेला आहे. ' मधुयामिनी ' ही कविता यासाठी पाहावी. या कवितेत मृदू व्यंजने (र, त, न, ल यासारखी;) इंग्रजींतील ( liquid consonants ) व ऱ्हस्व स्वर यांच्यामुळे कोमलता परिपूर्ण भरलेली आहे. उदाहरणार्थ—

मधुयामिनी नीललता
हो गगनीं कुसुमयुता
धवलित करिं पवनपथा
कौमुदि मधुमंगला—
दिव्य शांति चंद्रकरीं
आंदोलित नील सरी
गिरिगिरिवरि, तरुतरुवरि
पसरी नव भूतिला.

' तूं तर चाफेकळी ' ही सर्वच कविता शब्दयोजनेच्या दृष्टीने निरूपम झालेली आहे. भाषा अलंकृत असताही केवळ सुकुमार शब्दांच्या योगे केवढे सौंदर्य निर्माण करता येते याचा ही कविता आदर्श आहे.

क्रीडांगण जणुं चंचल सुंदर भाल तुझे हें गडे,
भुरुभुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळे उडे.
अर्धस्मित तव मद मोहने, पसरे गालांवरी
भुललें तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरीं.

पराकाष्ठेचा कोमलपणा व शब्दचित्र निर्माण करण्याचे कौशल्य ही दोन वैशिष्ट्ये पुढील ओळींत दिसून येतील—

इवलाच अधर हलवून । जल मंद सोडितें श्वास
इवलाच वेल लववून । ये नीज पुन्हां पवनास
घननील लतावलयांत । हिमधवल शिलातल भागीं
चमकून मोहिनी झाली । जणुं कुंजकुंजने जागी

सौंदर्यभरी भरलेलें । तारुण्य चढे अंगास
अलवार कोवळें अंग । जशि काय फुलाची मूस

वरील वर्णनातील ‘इवलाच अधर हलवून’, ‘इवलाच वेल लववून’ व ‘अलवार कोंवळे अंग, जशि काय फुलाची मूस’ या कल्पनांमध्ये पराकाष्ठेचा कोमलपणा ज्याप्रमाणे भरलेला आहे त्याप्रमाणे सूचकताही ओतप्रोत भरलेली आहे.

**आकर्षक शब्दचित्रे :**

अत्यंत वेचक व व्यंजनेने परिपूर्ण असलेले शब्द वापरून बालकवी परिणामकारक शब्दचित्रे निर्माण करतात. ‘खेड्यातील रात्र’, ‘पारवा’ व ‘औदुंबर’ या तीन कवितांचा या बाबतीत उल्लेख करावा लागेल.

त्या उजाड माळावरतीं
बुरुजाच्या पडक्या भिंती
ओसाड देवळापुढती
वडाचा पार—अंधार दाटला तेथ भरपूर,

परंतु या रात्रीच्या वर्णनापेक्षाही अधिक आकर्षक वर्णन पाहा—

भिंत खचली कलथून खांब गेला
जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाला
तिच्या कौलारीं बसुनि पारवा तो
खिन्न निरस एकांत–गीत गातो.

या पारव्याच्या वर्णनातील प्रत्येक ओळीत यथातथ्य चित्र रेखाटण्याचे बालकवींचे कौशल्य दिसून येत आहे, मोडकळीस आलेल्या ओसाड धर्मशाळेचे वास्तव स्वरूप बालकवींनी ‘भिंत खचली’ व ‘कलथून खांब गेला’ या दोनच लहानश्या वाक्यांत उत्कृष्टपणे प्रकट केले आहे. सर्वांगपरिपूर्ण शब्दचित्राचे उदाहरण ‘औदुंबर’ ही कविता होय. या कवितेतील रंगांच्या छटांचा मागे एकदा उल्लेख येऊन गेलेला आहे. आता शब्दयोजनेच्या कौशल्याच्या दृष्टीने या कवितेचा अभ्यास करावयाचा आहे. यामुळे ही कविता पुन्हा उद्धृत करणे भाग पडत आहे.

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासावळा झरा वाहतो बेटाबेटांतून
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे;
शेतमळ्याची दाट लागली हिरवी गरदी पुढें
पायवाट पांढरी तयातुनी अडवी तिडवी पडे
हिरव्या कुरणामधुनी चालली काळ्या डोहाकडे
झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर.

व्यंजनेने ओतप्रोत भरलेले वेचक शब्द वापरून यथातथ्य चित्र रेखाटण्याचे बालकवींचे कौशल्य या ठिकाणी कळसास पोचले आहे. हे चित्र अत्यंत वास्तववादी आहे हे मागे स्पष्ट केलेच आहे. औदुंबराची पोसलेली मुळे डोहाच्या पाण्यात शिरली आहेत हे दृश्य कवीने पाहिले आहे. आता इंग्रजीत ज्याला impersonation म्हणतात ते कवीने केले आहे. म्हणजे त्या औदुंबराच्या ठायी मानवी कृतीचा त्याने अध्यारोप केला आहे. 'पाय टाकुनी जळात बसला' हे वर्णन अत्यंत सूचक आहे. पाण्यात पाय सोडून बसलेल्या औदुंबराच्या वर्णनाला साजेल असेच वर्णन त्या दृश्यातील इतर वस्तूंचेही केले आहे. 'ऐल तटावर पैल तटावर' हा शब्दसमूह जिकडे तिकडे हिरवळच हिरवळ आहे या कल्पनेचा द्योतक आहे. 'निळा सावळा' हे झऱ्याचे वर्णन अगदी यथार्थ आहे. शेतमळ्यांची 'हिरवी गरदी' हे संक्रमित विशेषण (transferred epithet) मळे हारीने एकमेकांना अगदी भिडलेले आहेत ही कल्पना व्यक्त करीत आहे. 'अडवी तिडवी पडे' हे पाऊलवाटेचे वर्णन वस्तुस्थितीचे पूर्ण निदर्शक आहे. ऐल तटावर पैल तटावर' 'निळा सावळा' 'अडवी तिडवी' ही पुनरुक्तीही कवितेतील शब्दचित्राच्या सौंदर्याची वृद्धीच करीत आहे.

बालकवींनी या दृश्याचे इतके सुंदर वर्णन केले आहे की, एखाद्या चित्रकाराने काढलेले लँडस्केपच आपण पाहात आहोत असा भास झाल्याविना राहणार नाही.

## समीपवर्ती घटनांची उपेक्षा :

बालकवींच्या कलेचे स्वरूप आतापर्यंत आपण पाहिले. त्यांनी निर्मिलेल्या

कल्पनात्मक सृष्टीचा आपल्या व्यावहारिक जगताशी फारच थोडा संबंध आला. किंबहुना आला नाही असे म्हटले तरी चालेल. बालकवींचा मृत्यू १९१८ साली झाला. १९१४ ते १९१८ या कालखंडात जगात एक अत्यंत भयानक महायुद्ध झाले. पण युद्धाच्या वणव्याच्या ज्वाळांची थोडीही धग बालकवींच्या कलाकुंजापर्यंत जाऊन पोचली नाही. सत्यसृष्टीतील प्रखर सूर्याची असह्य उष्णता आपल्याला बाधू नये या हेतूने कविता-लतेच्या लुसलुशीत दाट दाट पालवीने त्यांनी आपला कलाकुंज कौशल्याने झाकून टाकला होता असे म्हणावयास हरकत नाही.

महायुद्धासारख्या विश्वसंहारक उत्पाताच्या बाबतीत बालकवींनी जर असले अलौकिक औदासीन्य दाखविले असले तर भोवतालच्या समाजातील राजकीय अथवा सामाजिक चळवळीच्या बाबतीत त्यांची अवस्था एखाद्या निर्लेप, निरंजन, विरक्त योग्याच्या अवस्थेप्रमाणे झाली असली तर त्यात कसलेही नवल नाही. भोवतालच्या समाजातील विविध घटना हे त्यांच्या दृष्टीने एक भयंकर स्वप्न असून कल्पनासृष्टी हीच वास्तविक पाहता त्यांची सत्यसृष्टी होती. भयंकर स्वप्न पाहिल्यानंतर हळव्या मनाच्या माणसाला जसा हादरा बसतो तसाच हादरा भोवतालच्या जगातील घटनांच्या दर्शनाने बालवींच्या मनाला बसत असला पाहिजे. ‘ धर्मवीर ’ ही कविता म्हणजे त्यांच्या कलेच्या सत्यसृष्टीतील एक नको असलेले स्वप्न होय ! दारुण स्वप्नाचा पुन्हा साक्षात्कार व्हावा अशी इच्छा कोण करील ? त्याचप्रमाणे बालकवींनीही असली कविता लिहून तिच्या द्वारे सुधारणावाद, सामाजिक ध्येयवाद, सामाजिक अन्याय इत्यादी ‘ भयानक ’ गोष्टींचा आविष्कार करण्याचा पुन्हा कधीही प्रयत्न केला नाही. ‘ दिक्कालातुनि आरपार ’ पाहू शकणाऱ्या त्रिकालदर्शी कवीला अगदी आपल्या जवळच्या गोष्टी दिसू नयेत असा सृष्टीचाच आपणास माहीत नसलेला संकेत असेल कदाचित् ! निदान बालकवींच्या बाबतीत हा संकेत अस्तित्वात असावा असे वाटते. केशवसुतांनी ‘तुतारी’ लिहिल्यानंतर मराठी कवींना ‘ तुतारी ’ सारखी एखादी तरी कविता आपण आयुष्यात लिहिलीच पाहिजे अशी उर्मी मधून मधून येत असे. ‘ तुतारी ’च्या धर्तीवर केशवसुतांचे भ्रष्ट अनुकरण करणाऱ्या ज्या अनेक कविता झाल्या त्यांच्यातील भावनाविष्काराचे स्वरूप पाहिले म्हणजे हे स्पष्ट होईल. १९११ मध्ये पुण्यात केशवसुतांच्या स्मरणार्थ निघालेल्या ‘ तुतारी ’ मंडळाचे बालकवी हे एक सदस्य होते. या मंडळात सामील झालेल्या कवींच्य

सहवासामुळेही ' धर्मवीर ' ही कविता लिहावी असे बालकवींच्या मनाने घेतले असेल. मंडळाचे सदस्य राहण्यास आपण पात्र आहोत हे कृतीने सिद्ध करून दाखवावे असा विचार बरेच दिवस बालकवींच्या मनात घोळत असावा. पण आपली मनोवृत्ती असल्या ' रूक्ष ' व व्यावहारिक विषयाच्या आविष्करणासाठी मुळीच अनुकूल नाही हे कटू सत्य त्यांना या ' मोहा ' पासून परावृत्त करीत असले पाहिजे. पण अखेर हा मोह बलवत्तर झाला आणि त्यांनी ' तुतारी ' च्या धर्तीवर ' धर्मवीर ' ही कविता लिहिली. गडकऱ्यांसारखा असामान्य प्रतिभाशाली कवीसुद्धा स्वतःस ' केशवसुतांचा सच्चा चेला ' म्हणवून घेण्यात धन्यता मानीत आहे हे लक्षात आल्याबरोबर आपणही गडकऱ्यांप्रमाणे चेलेपण पतकरावे असा विचार बालकवींच्या मनात आला असेल; केशवसुतांचा सारा लौकिक व मोठेपणा ' तुतारी ' मध्ये समावला असल्यामुळे त्या कवितेतील विषयाचे व प्रतिपादनपद्धतीचे अनुकरण करावे असा मोह प्रत्यक्ष गडकऱ्यांनासुद्धा झाला. मग बालकवींना असाच मोह झाला यात अनपेक्षित असे काय आहे ?

**बालकवींना अभिप्रेत असलेले काव्यप्रयोजन :**

किंबहुना मी याच्याही पुढे जाऊन असे म्हणतो की, केशवसुतांनी कवितेला उद्बोधनाचे किंवा सामाजिक जागृतीचे एक प्रभावी साधन बनविले हीच गोष्ट मुळी बालकवींना मनोमन पटलेली नसावी. सामाजिक सुधारणेसाठी कवितेचा आधार घेणे ही केशवसुती कल्पना आहे.

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे।
टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनिया देउं कसें ?

हे केशवसुतांचे काव्यप्रयोजनाविषयी विचार आहेत. समाजात नवचैतन्य निर्माण व्हावे, बंडाचा झेंडा उभविण्यास लोकांना स्फूर्ती यावी यासाठी केशवसुतांना अनेक वेळा काव्य लिहावेसे वाटते. समाजातील घटकांचा प्रभाव वर्धिष्णू व्हावा आणि भावी पिढ्यांना स्फूर्ती मिळावी यासाठी त्यांना काव्य लिहावेसे वाटते. याचा अर्थ असा की केशवसुतांच्या दृष्टीने काव्य हे उद्बोधनाचे अनेक साधनांपैकी एक महत्त्वाचे साधन होऊ शकेल. बालकवी जरी ' तुतारी ' मंडळात सामील झालेले होते तरी काव्याच्या प्रयोजनाविषयी केशवसुतांनी ठिकठिकाणी जे विचार स्पष्टपणे प्रकट केले आहेत ते विचार त्यांच्या मनोवृत्तीशी जुळणारे नव्हते. केशवसुतांची काव्यविषयक कल्पना व बालकवींची

काव्याची कल्पना यात महदंतर आहे हे सहज सिद्ध करता येईल. बालकवींच्या मते काव्यातून मधुर गीत स्फुरत असते, आणि स्वतःचा विसर पाडून ते मनाला अखंड ध्यास लावीत असते. समाजरूपी धोंड्याला उलथून देण्यासाठी उपयोगी पडणारी अवजड पहार अशी केशवसुतांप्रमाणे त्यांची काव्याची कल्पना नाही.

मंजुगीत त्यामधुनि स्फुरतें
दिव्य अहा मग तें अवतरतें
मी-तूं-पण तें क्षणिं विसरवितें.
लावि अखंड ध्यास जिवातें.

## बालकवींच्या काव्यात प्रकट झालेली रोमँटिक संप्रदायाची तत्त्वे :

खरी गोष्ट अशी आहे की कवितेने प्रतिभेच्या वातावरणात स्वैरविहार करावयास पाहिजे, कविता वायूप्रमाणे स्वच्छंदी असून स्वच्छंदीपणा हेच तिचे ब्रीद होय, कवितेला कोणतीही बंधने नकोत, विषयांची मर्यादा नको, असा बालकवींचा सिद्धांत आहे. हा सिद्धांत ' रोमँटिक ' कवींचा अत्यंत आवडीचा असतो. यामुळे ' रोमँटिक ' संप्रदायातील कोणत्या गोष्टी बालकवींनीं आत्मसात केल्या आहेत व त्यांचा आपल्या कवितामधून कसा आविष्कार केला आहे हे पाहणे उद्‌बोधक होईल. विषय, काव्यशैली व जीवनविषयक वृत्ती या तीन बाबतींत रोमँटिक कवींनी महत्त्वाचे बदल घडवून आणले असे युरोपमधील रोमँटिक कवितेचा इतिहास पाहिला असता दिसून येते. " कवितादेवी कोणत्याही पेचात कधीही राहू शकणार नाही, ती भक्तीत तल्लीन होईल. शृंगाराचा अनुभव घेईल, वात्सल्यरस चाखील, अगर करुणालाप काढीत बसेल, एखाद्या राजाचे वर्णन करील आणि शेतकऱ्याचे वर्णन करू नकोस असे तिला म्हटले तरी ती ऐकणार नाही " असे स्वतः बालकवी म्हणत आहेत. विषयाच्या बाबतीत कवींवर कोणतेही बंधन नसावे व वाटेल तो विषय त्याच्या कक्षेत यावा असे हे बालकवींचे मत ' रोमँटिक स्कूल ' च्या प्रमुख सिद्धांताशी अगदी जुळणारे आहे यात शंका नाही. पण प्रत्यक्ष बालकवींच्या कवितांचा अभ्यास केला तर विषयांचे त्यांना अभिप्रेत असलेले वैचित्र्य आपणांस दिसत नाही.

त्यांच्या कवितांमध्ये प्रामुख्याने जे विषय आले आहेत ते अर्थात्‌च रोमँटिक संप्रदायात नेहमी आढळणारेच विषय आहेत. उदाहरणार्थ–निसर्गाचे वर्णन. निसर्गाच्या

सान्निध्यात निर्माण होणाऱ्या वैयक्तिक अनुभूतीचे आविष्करण, ऐतिहासिक काळातील दूरच्या रमणीय दृश्यांचे वर्णन या गोष्टी आपणांस पुन्हा पुन्हा आढळतात. अज्ञेयवाद आणि गूढगुंजन ही गोष्ट रोमँटिक संप्रदायात वारंवार दिसते. केशवसुतांनी लिहिलेल्या 'झपूर्झा' किंवा 'हरपलें श्रेय' या कवितांप्रमाणे बालकवींनी गूढगुंजनात्मक कविता लिहिल्या नाहीत. त्यांच्या बऱ्याचशा कवितांमधून संशयग्रस्ततेची अवस्था मात्र दिसून येते. मानवी सृष्टीबाहेरील अतिमानुष (Supernatural) घटना रोमँटिक कवींच्या कवितांमधून आढळतात. त्याचप्रमाणे ओसाड जागेचे व रात्रीच्या भयाणपणाचे वर्णन तन्मयतेने करणे हेही आणखी एक वैशिष्ट्य रोमँटिक कवींच्या बाबतीत दिसून येते. 'खेड्यांतील रात्र' या कवितेमध्ये भयानक काळोखातील ओसाड जागेचे बालकवींनी सुंदर वर्णन केले आहे. एकंदरीत रोमँटिक कवींना रात्रीचे वेड विशेष दिसते. यक्षिणी इत्यादी अतिमानुष व्यक्तींतही अशा कवींचे मन रमते व असले काहीतरी गूढ वातावरण निर्माण करण्यात त्यांना मोठे सुख वाटत असते. 'दुबळी भूल' या कवितेत बालकवींनी असले वातावरण परिणामकारक रीतीने रंगविले आहे.

मरणाची उत्कंठा किंवा मृत्यूचा प्रभाव या रोमँटिक संप्रदायातील गोष्टी कवींच्या काव्यात नेहमी दिसून येतात. बालकवींच्या काही कवितांमध्ये मृत्यूचे आवाहन आहे ही गोष्ट पूर्वी स्पष्ट केलीच आहे. अर्थात एखादा तत्त्वज्ञ ज्या भावनेने 'मृत्यू' या कल्पनेचा गंभीरपणे विचार करील ती भावना अशा कवींची नसते. आपल्या दुःखांचा अंत करणारी एक प्रभावी शक्ती याच एका दृष्टीने ते मृत्यूच्या स्वरूपाचा विचार करीत असतात; आणि म्हणूनच त्यांना मृत्यूचा ध्यास लागलेला मधून मधून दिसून येतो. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वप्ने किंवा दिवास्वप्ने (day–dreams) रोमँटिक कवी यात अगदी तल्लीन होऊन जातात, असे अनेक कवींच्या चरित्रावरून दिसून येते. स्वप्नाळू वृत्ती हे तर अशा कवींचे वैशिष्ट्य मानावयास हरकत नाही !

## यमकानुप्रासांची बंधने

काव्याच्या बहुरंगाविषयी रोमँटिक संप्रदायातील कवींचे काही निश्चित विचार आहेत. परंपरागत संकेताचा बडिवार न माजविणे व काव्यविषयक रूढ नियमांच्या चाकोरीतून बाहेर पडण्याची धडपड करणे हे त्यांचे शैलीबाबत महत्त्वाचे तत्त्व आहे.

याविषयी स्वतः बालकवींनी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे–" कविता पूर्ण स्वच्छंदी आहे. यमक, प्रास, चाल ही कवितेची बंधने आहेत. त्यांनी तिचा देह शोभायमान दिसत असेल, पण प्रतिभेच्या वातावरणात ती स्वैर विहार करीत असता ती तिला अडवून धरतात यात शंका नाही. कवितेने...अमुक यमकप्रासांचे दागिने अंगावर चढविले पाहिजेत व अमुक वृत्तांत तिने नाचले पाहिजे...असे म्हणणे वेडेपणाचे आहे. ती वायूप्रमाणे स्वच्छंदी आहे व स्वच्छंदीपणा हेच तिचे ब्रीद होय. कवितादेवी कोणत्याही पेचात कधीही राहू शकणार नाही. " या उताऱ्यात यमक, प्रास, चाल वृत्त इत्यादी बंधनांचा जाच कवितेला असता कामा नये असे बालकवी म्हणत आहेत. या बाबतीत हे लक्षात ठेवावयास पाहिजे की, यमक व प्रास यांची बंधने स्वतः बालकवी हौशीने पाळीत आहेत. निर्यमक रचना करण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. एखाद्या कवितेत यमकाचा काहीसा नवीन नमुना वापरताना ते दिसतात हे खरे आहे. उदाहरणार्थ 'तडाग असतो तर—' या कवितेत एकंदर पाच कडवी असून प्रत्येक कडव्याच्या पहिल्या तीन ओळींच्या अंती यमक साधले आहे. चौथी ओळ मात्र पहिल्या ओळीशी यमकाच्या दृष्टीने जमत नाही. तथापि प्रत्येक कडव्याच्या शेवटच्या ओळीत यमक साधले आहे. याच प्रकारचे यमक 'मधुयामिनी' या कवितेतही दिसून येते. तथापि पूर्ण निर्यमक रचना करण्याच्या भरीस मात्र बालकवी पडले नाहीत. तेव्हा यमकाचे बंधन झुगारून स्वैर व स्वच्छंद रचना करावयास पाहिजे हे आपले मत बालकवींनी कृतीत उतरविले नाही. याचे एक महत्त्वाचे कारण असे की, बालकवींच्या मनावर नादमाधुर्याची मोहिनी फार मोठी होती; आणि संयत यमकामुळे हे नादमाधुर्य आपोआप साधते. आपल्या कल्पनाविलासाच्या स्वैर संचाराच्या आड यमके येऊ शकत नाहीत, हे लक्षात आल्यावर, निर्यमक रचनेचा हव्यास कशासाठी धरावा असाही विचार कदाचित बालकवींच्या मनात आला असेल. खरे पाहिले असता कौशल्याने साधलेली संयत अथवा मर्यादित यमके काव्याचे सौंदर्य कधीही बिघडवत नाहीत, उलट ते किती तरी पटींनी वाढवीतच असतात. अशा स्थितीत, 'यमकांचे बंधन नको,' असला विनाकारण आक्रोश करणारे कवी एक तर यमकांच्या ठायी सामावलेल्या विविध सामर्थ्यांचे स्वरूप जाणून घेण्याच्या बाबतीत दुबळे असावेत, अथवा काव्यातील सौंदर्योत्पादक तत्त्वे कोणती याचा त्यांना उमज पडत नसावा, किंवा चतुराईने आकर्षक यमके साधण्याची

त्यांच्या ठायी शक्तीच नसावी ! यमकांचे बंधन झुगारून देऊन सर्वस्वी निर्यमक रचना करण्याचा धीर बालकवींना झाला नाही याचे कारण यमकात सामावलेल्या परिणाम कारक नादमाधुर्याची त्यांना प्रचीती आली असली पाहिजे हेच होय. जो प्रकार यमकांचा तोच अनुप्रासांचा. अनुप्रासांच्या विविध छटांमध्ये मनोहर सौंदर्य असते. कलात्मक अनुप्रास असू शकतात. आणि त्यांचे सौंदर्यही आकर्षक असू शकते हे विसरणे युक्त नाही. प्रासांच्या बंधनाविरुद्ध तक्रार करणारे बालकवी स्वतःच अनेक ठिकाणी अनुप्रास साधतात. हे अनुप्रास सहजरीत्या निर्माण होत असतील असेही म्हणवत नाही. या बाबतीत बालकवी जाणूनबुजून कसबीपणा दाखविण्याची खटपट करीत असतात. उदाहरणार्थ, ' परिचंचल जळते चपळही चित्त कसे रे ' या ओळीतील अनुप्रास अगदी सहजगत्या विनासायास साधला आहे असे कोणीही म्हणू शकणार नाही. ' शाहीर ' या कवितेत जवळजवळ प्रत्येक ओळीमध्ये सुरुवातीस ' शूर वीर सरदार ', ' धीर धींग रणसिंग ', ' राजबाळ वेल्हाळ ' अशा पद्धतीचे अनुप्रास आहेत. ' नवरागरक्तिमा रंगे, रविरंजित रजनीवरती ' या ओळीत अनुप्रास साधण्याची कवीने अगदी शिकस्त केलेली दिसत नाही काय ? तात्पर्य, बंधने झुगारून देण्याचा डौल कवींनी कितीही आणला तरी नादमाधुर्याचा विचित्र मोह त्यांना स्वस्थ बसू देणे शक्य नसल्यामुळे यमके व अनुप्रास यांच्यांवर बहिष्कार घालण्याच्या बाबतीत ते सर्वस्वी दुबळे ठरतात.

बालकवींच्या बाबतीत असेच झाले आहे. परंपरागत संकेताच्या आणि नियमांच्या जाचाविरुद्ध तक्रार करूनही प्रत्यक्षात मात्र जुनी अक्षरवृत्ते सोडून देऊन नवीन जातिरचनेचा उपयोग करण्याशिवाय रचनेच्या आणि शैलीच्या बाबतीत त्यांनी काहीही महत्त्वाचा बदल केला नाही. जातींच्या बाबतीतही त्यांनी १६ मात्रांच्या चार पाच जातींशिवाय इतर कोणत्याही क्रांतिकारक किंवा नवीन रचनापद्धतीचा अंगीकार केला नाही. पाच सहा कविता त्यांनी शार्दूलविक्रीडित वृत्तात लिहिल्या आहेत. केशवसुती सुनीते त्यांनी दोनच लिहिलेली आहेत. विविध वृत्तांचा उपयोग ' माझा लहानसा बाग ' या एकाच कवितेत त्यांनी केला आहे. परंतु अक्षरवृत्तावर त्यांचे काडीचे प्रभुत्व नाही ही गोष्ट या कवितेवरून ठसठशीतपणे दिसून येते. अत्यंत नीरस रचना कशी असू शकेल याचा खरोखरच हा आदर्श आहे.

रोमँटिक संप्रदायात नेहमी दिसून येणाऱ्या आणखी काही गोष्टी बालकवींच्या काव्यात ठिकठिकाणी दिसून येतात. संवेदनशील मन, स्वप्नाळूपणा या गोष्टी जशा त्यांच्या कवितांमधून आविष्कृत झालेल्या दिसतात, तशाच रंगाची आवड, नादमाधुर्याची आवड, लालित्यपूर्ण भाषेतील भावनाविष्कार याही गोष्टी दिसून येतात.

**व्यक्तिवादी दृष्टिकोन :**

रोमँटिक संप्रदायाने काव्याला नवीन वळण लागले असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा काव्यविषयक कल्पना व काव्याचे बहिरंग या दोन क्षेत्रांत या संप्रदायातील कवींनी घडवून आणलेला बदल आपण विचारात घेत असतो. आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे मनोवृत्तीतील अथवा दृष्टिकोनातील बदल होय. आत्मनिष्ठा अथवा व्यक्तिवाद ( Individualism ) हा रोमँटिक संप्रदायाचा विशेष होय. केशवसुतांच्या काव्यात या प्रवृत्तीचा ठिकठिकाणी प्रभावी आविष्कार झालेला आहे. ' पूजितसे मी कवणाला तर मी पूजी अपुल्याला ' असे उद्गार काढणे केशवसुत स्वतःमध्ये अखिल विश्वाचे रूप पाहत आहेत. ' आम्हांला वगळा गतप्रभ झणीं होतील तारांगणें ' हे केशवसुतांचे आत्मविश्वासाचे बोल ज्याप्रमाणे आत्यंतिक आत्मनिष्ठेचे द्योतक आहेत, त्याचप्रमाणे ' पुरें जाणतों मीच माझें बल ' हे रेव्हरंड टिळकांचे बोलही पराकाष्ठेच्या आत्मनिष्ठेचे द्योतक आहेत. व्यक्तीच्या सामर्थ्याविषयीचा हा दुर्दम्य आत्मविश्वास किंबहुना दर्पयुक्त आशावाद हा रोमँटिक संप्रदायाचा एक विशेष होय. हा निर्भेळ व्यक्तिवाद होय. या व्यक्तिवादाला क्वचित् अतिरंजित कल्पनेचे स्वरूप प्राप्त होते, असेही काहींना वाटण्याचा संभव आहे. पण रोमँटिक कवींचा हा स्वभाव होय असे म्हटले तरी चालेल. ' आत्म-विश्वास ' याच नावाची बालकवींची एक कविता आहे. ' कां मग खंती जग सगळें माझ्या हातीं ' अशी एक ओळ कवितेत आहे. ' कवि ' या कवितेतही ' कवी हा, जगताचा धनी ' अशी याच प्रकारची कल्पना आली आहे. या ओळीतील कल्पना रोमँटिक मनाच्या प्रवृत्तीचीच द्योतक होय. आत्मकेंद्रितता हा असल्या कवींच्या स्वभाव-विशेष असल्यामुळे औदासीन्य, विषण्णता इत्यादी भावना जशा यांच्या ठायी दिसून येतात तशाच समाजाविरुद्ध बंडखोरपणाच्या छटाही दिसून येतात. केशवसुत व शेली यांच्या कवनातून याची प्रतीती येईल. या बंडखोर वृत्तीच्या पोटीच प्रेषितत्वाची जाणीव कवीला होत असते, कवी हा जगताचा प्रेषित आहे ही कल्पना शेलीच्या Ode to

west wind या सॉनेटमध्ये जशी दिसून येते तशी केशवसुतांच्या 'आम्ही कोण?' या सॉनेटमध्ये दिसून येते. औदासीन्य आणि बंडखोरपणा या दोन अगदी परस्परविरुद्ध वाटणाऱ्या गोष्टी अशा कवींच्या ठायी एकसमयावच्छेदेकरून दिसून येतात. यामुळेच

काळाचे कवि हे काळ, काळदिशा आमुचा खेळ !
तेजानें भरलीं अंगें ! नेउं जगा तेजामागें !
हिमगिरिचा काढा कांटा, एकिकडे सागर लोटा—

असे पराकाष्ठेचे आत्मविश्वासपूर्ण उद्‌गार काढणारे बालकवी

आशा सरली प्रीति निमाली
नैराश्याची भयाण काळी
रजनी ही चहुंकडे पसरली
मार्ग सांपडेना त्यांत.

यासारखे नैराश्यपूर्ण उद्‌गार काढतात यातील मर्म आता समजून येईल.

**कल्पनावाद :**

वस्तुजाताचे वर्णन करीत असता वास्तववादाचा अवलंब न करिता कल्पनावादाचा ( idealism ) अवलंब करणे हे रोमँटिक संप्रदायातील कवींचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. गोष्टी अशा असतात अथवा डोळ्यांना जशा दिसतात तशाच्या तशा आपल्या काव्यात हे कवी संक्रांत करीत नाहीत. यांच्या कल्पनाचक्षूला गोष्टींचे जे रूप दिसते त्याचेच वर्णन हे करीत असतात. आपल्या वैयक्तिक भावनांचा आरोप इतरत्र करून आपल्या इच्छेशी सर्वस्वी जुळणारी कल्पनासृष्टी निर्माण करून ते एका विचित्र समाधानाचा आस्वाद घेत असतात. मानवी भावनांच्या क्षेत्रात हे कवी आपल्या मनातील भावना इतरांच्या कृतीमध्ये शोधण्याची व त्या निमित्ताने स्वतःचे समाधान करून घेण्याची धडपड करीत असतात. त्याचप्रमाणे निसर्गातील वस्तुजातीचे यथार्थ किंवा वास्तववादी वर्णन वर्डस्वर्थप्रमाणे करीत न बसता निसर्ग यांच्या स्वतःच्या कल्पनासृष्टीत जी विविध रूपे धारणे करतो, त्याच रूपांचे ते वर्णन करू लागतात आणि मग निसर्ग वस्तुतः जसा आहे तसा न दिसता मानवसृष्टीतील व्यक्ती कवीला निसर्गात दिसू लागतात. बालकवींनी हा प्रकार सर्वत्र केला आहे. त्यांना फुलांमध्ये फुलराणी दिसते. त्या फुलराणीचा सूर्यप्रकाश या नवरदेवाशी विवाह होतो, धुक्याचा अंतरपाट दूर होतो

आणि प्रेयसीचे प्रियकराशी मीलन होते.\हे सारे कल्पनाचित्र आहे. ते मोहक आहे यात शंका नाही. पण प्रभातकाळी सूर्योदय होत असता उमलणाऱ्या फुलांचे सौंदर्य वर्णावयाचे इतकाच कवीचा हेतू नाही. निसर्गात दिसणाऱ्या या रम्य दृश्याचा आधार घेऊन आणि मानवव्यक्तींचा आणि त्यांच्या मनोविकारांचा अध्यारोप निसर्गातील वस्तूंवर अथवा दृश्यांवर करून सर्वस्वी निराळे कल्पनाचित्र रंगविण्यास बालकवींना जो आनंद होत असतो त्याला तोड नाही. मला नेहमी असे वाटते की, आपल्या कल्पना-सृष्टीमध्ये रेखारूपाने तयार झालेल्या चित्रात रंग भरून परिपूर्ण व्हावे यासाठीच बालकवी निसर्गदृश्यांचा उपयोग करून घेत असावेत. निराळ्या शब्दात सांगावयाचे झाले तर निसर्गातील दृश्यांचे अवलोकन हे बालकवींना आपली कल्पनासृष्टी तयार करण्यासाठी केवळ एक निमित्त ( stimulus ) असते. एकदा हे stimulus त्यांना मिळाले की, मग त्यांच्या दृष्टीसमोरून वास्तव निसर्ग अदृश्य होतो आणि कल्पना-सृष्टीतील स्वप्नसदृश दृश्ये निर्माण होऊ लागतात. मागे विस्ताराने वर्णिल्याप्रमाणे वर्डस्वर्थच्या वास्तववादी निसर्गवर्णनात व या बालकवींनी केलेल्या वर्णनात स्वरूपदृष्ट्या महदंतर आहे हे वरवर पाहाणारालासुद्धा दिसून येईल. पण बालकवींच्या पद्धतीचा असा अपरिहार्य परिणाम घडून येतो की, प्रत्यक्ष निसर्गात कवीचे लक्ष केंद्रित होण्या-ऐवजी ते निसर्गदृश्यांनी सूचित केलेल्या काल्पनिक दृश्यांतच खरे केंद्रित होते आणि कवी अशा कल्पनासृष्टीतच धुंदपणे विहार करू लागतो. मनाची ही धुंद अवस्था निर्माण झाली म्हणजे भोवताली खरोखरच कोणत्या गोष्टी प्रत्यक्षपणे दिसत आहेत याचाही विचार करण्याचे कारण कवीला पडत नाही; कारण त्याची कल्पनासृष्टी अगोदरच तयार झालेली असते. ही कल्पनासृष्टी निर्माण करण्याचे काम कविता करीत असते. अशी कल्पनासृष्टी तयार झाली की, ती कवीला सत्यसृष्टीपेक्षाही अधिक रमणीय भासू लागते आणि त्या रमणीयतेतच तो गुंगून जातो. बालकवींच्या पद्धतीचा हा अपरिहार्य परिपाक आहे. हे प्रत्यक्ष निसर्गतादात्म्य नसून निसर्गाने सूचित झालेल्या काल्पनिक दृश्यांशी व त्या दृश्यांशी संबद्ध असलेल्या धुंद स्वप्नसृष्टीशी झालेले तादात्म्य होय; आणि असे तादात्म्य एकदा परिपूर्ण झाले म्हणजे कवीचे मन दिक्कालांच्या आरपार निघून जाते व मग या जगाशी त्याचा संबंध सुतराम् राहात नाही !

निसर्गातील दृश्यांचे अवलोकन केल्याबरोबर बालकवींच्या मनात ज्या विविध

कल्पना तरळून जातात त्या कल्पनांना शरीर प्राप्त झाले आणि मनोविकारांचा त्या शरीराशी संयोग झाला म्हणजे " ताराराणी '— सारखी रुचिर कल्पनादृश्ये निर्माण होत असतात. कवीने आकाशात तारका पाहिली. त्या तारकेचे सौंदर्य पाहिल्यावर मनाची जी बेभान अवस्था झाली त्या अवस्थेत ती तारका रसरसलेल्या सौंदर्याने मुसमुसलेली मोहिनी आहे, असा कवीला भास झाला; आणि असा भास झाल्याबरोबर सृष्टीतील चित्रात विविध मनोरम रंग क्षणार्धात भरले. ती तारका अदृश्य होऊन तिच्या जागी कोणी रंभा किंवा उर्वशी कवीला दिसल्याबरोबर

किति होत नाच नयनांचा। किति रंग मुखावर आले

हे वर्णन ओघानेच आले.

## दौर्बल्याची तीव्र जाणीव :

शेली आणि कीटस — विशेषतः शेली — यांच्या काव्यात जी दौर्बल्याची जाणीव ठायीठायी दिसून येते, तीच दौर्बल्याची जाणीव बालकवींच्या कवितातही दिसून येते. आपले दौर्बल्य व्यक्त करणे हे अनेक धीराच्या लोकांना तिरस्करणीय वाटेल यात शंका नाही; परंतु बालकवींसारख्या कवींचा हा स्वभावधर्मच असल्यामुळे त्याचा आविष्कार त्यांच्या कवनातून होणे अपरिहार्य असते. " पंख तुटुनिया विव्हल पडलो मी धरणीवरतीं ! " असे केविलवाणे उद्गार काढणाऱ्या कवीने—

परिस्थितीचीं कठोर भूतें
क्षणांत करिती शून्य मनातें
पूर्वस्मृति मग ताजी होते
जळलें त्यांत। हृदयाचें होउनि भूत.

यासारखे आपल्या असहायतेचे उद्गार काढावेत यात काहीच नवल नाही. ही दुर्बलतेची जाणीव केशवसुतांनी व्यक्त केली आहे. गडकऱ्यांनीहि व्यक्त केली आहे. चित्ताच्या या दुर्बलतेबद्दल त्यांना कोणीही सहज नावे ठेवू शकेल. पण त्यांच्या स्वभावातील हे मूलभूत वैशिष्ट्य असल्यामुळे आणि सर्व कवी पूर्णपणे आत्मनिष्ठ असल्यामुळे या वैशिष्ट्याचा आविष्कार कोणत्या तरी प्रकाराने त्यांच्या काव्यात होणारच; आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी त्यांनी पुनः पुनः ही दौर्बल्याची जाणीव व्यक्त केली असताही आपल्याला त्यांच्याविषयी एक प्रकारचे विचित्र आकर्षण वाटत असावे हे

नाकबूल करता येणार नाही. आपण कवीला त्याच्या सर्व उणीवांसह पतकरण्याचे ठरविले तरच त्या दौर्बल्याची आपण थट्टा करणार नाही नाहीतर पूर्ण व्यावहारिक दृष्टीने पाहिले असता या प्रकारचे दौर्बल्य उपहासास्पद ठरेल अशी भीती वाटते. परंतु रोमॅंटिक कवींच्या सहवासात परस्परविरोधी भावनांचे अथवा प्रकृतींचे अस्तित्व नेहमी दिसून येते हे आपण मागे पाहिले आहे. क्षणात आनंद, क्षणात दुःख, क्षणात दर्पोद्धत आवेश तर क्षणात आपल्या आत्यंतिक असहायतेची जाणीव या गोष्टी आपल्यासारख्या व्यावहारिक माणसाच्या दृष्टीने कितीही उपहासास्पद ठरल्या तरी या विरोधी भावना एकसमयावच्छेदेकरूनही काही भावनाप्रधान माणसांच्या ठायी दिसून येतात हेही खरे आहे. आणि बालकवींच्या जातीचे जे कवी असतात त्यांचा तर स्वभावधर्मच असतो. याला त्याचा काहीही इलाज नाही.

**बालकवींच्या निसर्गगीतांचे अभिनव स्वरूप :**

बालकवींची निसर्गगीते मात्र सर्वस्वी भिन्न स्वरूपाची आहेत. केशवसुतांप्रमाणे त्यांनी काही गीतांमधून निसर्ग व मानव यामधील आत्यंतिक विरोध व्यक्त केला आहे, हे खरे आहे. तथापि त्यांची सर्वात गाजलेली जी निसर्गगीते आहेत, त्यांमध्ये हा विरोधाचा आविष्कार बराचसा सौम्य झालेला असून ' अरुण ', ' फुलराणी ', ' संध्यारजनी ', ' संध्यातारक ', ' शुक्रोदय ', ' ताराराणी ', इत्यादी कवितांत तर या विरोधाचा लेशही दिसणार नाही. संगीताची निर्मिती ज्यायोगे होईल असे ललित व मधुर शब्द वापरून उत्कृष्ट कल्पनादृश्ये निर्माण करणे हाच बालकवींचा या सर्व गीतांत एकमेव हेतू दिसत आहे आणि या प्रकारची गीते एका बालकवींशिवाय दुसऱ्या कोणत्याही आधुनिक मराठी कवीने धुंद मनाने स्वप्नसृष्टीत विहार करून व तेथे अगदी तन्मय होऊन लिहिली नाहीत. निसर्गातील दृश्यांवर चैतन्याचा असला अतिरिक्त अध्यारोपही दुसऱ्या कोणत्याच कवीने केला नाही; आणि रंग व ध्वनी यांची असली लयलूटही कोणी केली नाही. निसर्गाचे वर्णन करीत असता उन्मादक स्वप्नसृष्टी तत्क्षणी निर्माण करून त्या स्वप्नसृष्टी-तील आभासात्मक लावण्यलतिकांशी इतका तन्मय होणारा बालकवी हा एकच कवी होय. याच अर्थाने बालकवी हे निसर्गवर्णन पूर्ण स्वतंत्र वृत्तीने करणारे कवी होत असे विधान वर केले आहे. ही सर्वस्वी नवीन कविता होय. वैचारिक भूमिका, कल्पनाविलास,

संवेदना, मनोवृत्ती या कोणत्याही बाबतीत केशवसुत अथवा टिळक यांच्या कवितांशी बालकवींच्या निसर्गगीतांची खऱ्या अर्थाने तुलना करता येणे शक्य नाही. एखादी दुसरी गोष्ट सम आढळली तरी ती परिपूर्ण तुलना करण्यास उपयोगी पडणार नाही. केशवसुतांना निसर्गात जी दृश्ये दिसली त्यापेक्षा अगदी भिन्न दृश्यांनी बालकवींचे मन आकृष्ट केले; आणि निसर्गातील वस्तू पाहिल्याबरोबर केशवसुतांच्या मनात ज्या प्रकारच्या संवेदना निर्माण झाल्या त्यापेक्षा अगदी निराळ्या प्रकारच्या संवेदना बालकवींच्या मनात निर्माण झाल्या. निसर्ग हा मानवाला बोध किंवा उपदेश करतो अशी वर्ड्स्वर्थ-प्रमाणे टिळकांची विचारसरणी होती. बालकवींच्या ठायी विचारसरणीचा लेशही आढळावयाचा नाही. गडकऱ्यांची निसर्गवर्णनाची पद्धती निराळी आणि बालकवींची पद्धती निराळी. दोघांच्या कल्पनाविलासात काही बाबतीत थोडसे साम्य असले तरी एकंदरीत पाहता बालकवींची कविताही प्रकृतीने व प्रवृत्तीने वर उल्लेखिलेल्या तीन कवींच्या कवितांपेक्षा पुष्कळच वेगळी आहे, हे सहज दिसून येण्यासारखे आहे. बाल-कवींच्या स्फूर्तीची उगम स्थळे वेगळी, ज्यांमध्ये त्यांचे चित्त सहज रममाण होत असे त्या गोष्टी वेगळ्या, कल्पनाविलासाचे स्वरूपही वेगळे. बालकवींनी आपल्या कल्पनाशक्तीच्या सहाय्याने निर्माण केलेले कलात्मक जगत् पूर्णपणे अभिनव आहे यात शंका नाही.

## कवी या दृष्टीने बालकवींच्या मर्यादा :

या गोष्टी चित्तात चांगल्या बागविल्या म्हणजे आधुनिक मराठी काव्याच्या क्षेत्रात बालकवींनी केलेल्या कामगिरीचे खरे स्वरूप अजमावता येईल व त्यांच्या कवित्वाचा गौरव कोणत्या मर्यादेपर्यंत करता येईल या गोष्टीचा उमज पडेल. एक गोष्ट प्रथम स्पष्ट करावयास पाहिजे ती ही की, ज्यांना ‘ थोर कवी ’ असे बिरुद आपण न कचरता देऊ अशा कवींच्या रांगेत बालकवींना मुळीच स्थान नाही. पण थोर कवी ही संज्ञा प्राप्त करून घेण्याचे भाग्य एखाद्याला प्राप्त झाले नाही तरी कलात्मक चातुर्य विविध प्रकारांनी दाखविणे त्याला शक्य असते. आणि बालकवींच्या बाबतीत हे अगदी खरे आहे. कलेची कामगिरी म्हणून जी गोष्ट आहे, तिच्या बाबतीत बालकवींनी दाखविलेले कौशल्य स्पृहणीय आहे, मोहक आहे. भुरळ पाडणारे आहे. हे सारे कबूल करूनही त्यांना थोर कवी म्हणावे असा विचार स्वप्नात सुद्धा माझ्या मनात डोकावत नाही.

कवी या दृष्टीने बालकवींच्या ज्या मर्यादा आहेत त्या कोणाही जाणत्या रसिकाच्या लक्षात सहज येतील. त्यांच्या उणीवा अगदी स्पष्ट आहेत व त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचे काहीच कारण नाही. बालकवींची कल्पनाशक्ती उच्च प्रतीची आहे व तिच्या सहाय्याने त्यांनी निसर्गातील विविध दृश्यांमधील सौंदर्याचे अविष्करण यशस्वी रीतीने केले आहे त्यांचा कल्पनाविलास डोळे दिपवून टाकतो यात शंका नाही. पण हे सारे विद्युदुन्मेषाप्रमाणे आहे. वीज लखलखते आणि अदृश्य होते. त्यांप्रमाणे बालकवींनी निर्मिलेल्या रुचिर दृश्यांमुळे क्षणभर मनाला बरे वाटते; पण त्यांचा मनावर कसलाही स्थिर संस्कार मात्र होऊ शकत नाही. मानवी भावनांच्या अनंत छटा असतात. हे वैचित्र्य मानवी जीवनात आहे म्हणून तर ते इतके आकर्षक झाले आहे. या वैचित्र्याचा आविष्कार बालकवींच्या गीतात आपणास मुळीच सापडावयाचा नाही. त्यांच्या गीतात भावनांच्या फारच थोड्या छटा आपणास दिसतील. निसर्गातील दिव्य सौंदर्य व अलौकिक आनंद आणि मानवी जीवनाची अपूर्णता याच कल्पना प्राधान्येकरून त्यांनी आविष्कृत केल्या आहेत. उत्कट, रसरसलेली व धुंद करणारी प्राणयासक्तीही त्यांच्या कवितांतून प्रकट झालेली नाही. आणि दारुण प्रेमभंगामुळे येणाऱ्या आत्यंतिक नैराश्याचे आविष्करण त्यात नाही. प्रेमाच्या इतर अनेक छटा मानवी जीवनात असतात. त्याचेही आविष्करण बालकवींनी केले नाही. सौंदर्याच्या अमूर्त तत्त्वाभोवती व अतींद्रिय प्रेमाच्या कल्पनेभोवती त्यांचे मन सतत रुंजी घालीत आहे. हेच एक बालकवींच्या जीवनाचें सार बनलेले आहे. आणि दिव्य सौंदर्याचा साक्षात्कार व अतींद्रिय प्रेमाची तळमळ हेच काय ते त्यांच्या कवितेचे परमोच्च ध्येय बनले आहे. बालकवींचा इतका रम्य कल्पनाविलास या एकाच कल्पनेत सर्वस्वी विलीन व्हावा याचें वाईट वाटते. एकाच गोष्टी भोवती बालकवींचा हा कल्पनाविलास घोटाळत राहिल्यामुळे त्याचा आविष्कारही वैचित्र्याहीन व कंटाळवाणा होणे अपरिहार्य आहे. यामुळे ठराविक संकेताची, कल्पनांची, शब्दांचीं, रंगांची व दृश्यांची पुन्हापुन्हा पुनरुक्ती बालकवींना करावी लागली आहे. किंबहुना अमूर्त सौंदर्याचा साक्षात्कार व अतींद्रिय प्रेमाची लालसा या गोष्टी मानवी जीवनाचें एकमेव ध्येय होणेच अशक्य आहे. आणि एखाद्याने बालकवींप्रमाणे तेच एक ध्येय मानले तर त्या ध्येयाचा कांचनमृग पाहता पाहता दृष्टीआड होईल; स्वप्नसृष्टी विरून जाईल, आणि मग आत्यंतिक विपण्णतेशिवाय दुसरे काहीही पदरात पडावयाचे नाही.

१

# आनंदी – आनंद

आनंदी–आनंद गडे !
इकडे, तिकडे, चोहिंकडे,
वरतीं-खालीं मोद भरे;
वायूसंगे मोद फिरे,
नभांत भरला,
दिशांत फिरला,
जगांत उरला,
मोद विहरतो चोहिंकडे;
आनंदी–आनंद गडे ! १

सूर्यकिरण सोनेरी हे,
कौमुदि ही हंसते आहे;
खुलली संध्या प्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
मेघ रंगले,
चित्त दंगलें.
गान स्फुरलें,
इकडे, तिकडे, चोहिंकडे;
आनंदी–आनंद गडे ! २

नीलनभीं नक्षत्र कसें
डोकावुनि हें पाहतसे;
कुणास बघतें ? मोदाला !
मोद भेटला का त्याला ?

तयामधें तो
सदैव बघतो,
सुखें विहरतो,
इकडे, तिकडे, चोहिंकडे;
आनंदी—आनंद गडे ! ३

वाहति निर्झर मंदगति,
डोलति लतिका वृक्षतती;
पक्षि मनोहर कूजित रे,
कोणाला गातात बरें ?
कमल विकसलें,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले—
इकडे, तिकडे; चोहिंकडे;
आनंदी–आनंद गडे ! ४

स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो ?
सोडुनि स्वार्था तो जातो–
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आतां उरला,
इकडे, तिकडे, चोहिंकडे;
आनंदी–आनंद गडे ! ५

पूर्वसमुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणी उधळिली मूठ नभीं ही लाल गुलालाची ?
पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं
हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं.
क्षितिजाची कड सारविली ही उज्ज्वल दीप्तीनें,
सृष्टिसतीनें गळां घातलें कीं अनुपम लेणें ?
हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिवळे कांहीं,
रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं.
उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा,
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुररस अपुल्या अंगा ? १

अरुण चितारी नभःपटाला रंगवितो काय,
प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय ?
कीं नवयुवती उषासुंदरी दारीं येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनीं ?
दिवसयामिनी परस्परांचें चुंबन घेतात--
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत !
स्वर्गींच्या अप्सराच अथवा गगनमंडलांत
रात्रीला शेवटचीं मंगल गीतें गातात ?
किंवा ' माझी चोरुनि नेली मोत्यांची माला '
म्हणुनि नभःश्री रुसली आली लाली गालांला ? २

कीं रात्रींचें ध्वांत पळालें, आशेची लाली
उत्साहाशीं संगत होउनि ही उदया आली

किंवा फडके ध्वजा प्रीतिची जगता कळवाया,
कीं अपणांवर आज पातली हीच खरी विजया ?
कीं स्वर्गीच्या दिव्यांचें हें फुटलें भांडार.
जणूं वाटतें स्वर्गच त्यासह खालीं येणार ?
प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें ?
कीं सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे ? ३

" तेजानें न्हाणितें जगाला कोण सखे बाई ?
नवल अगाई ! तेजोमय तूं ! तेजोमय मीहि ! "
परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं
" विरहकाल संपला गा गडे, प्रेमाचीं गाणीं !
या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा–पुरे गडे ग ! हा तुमचा मान !
अम्ही गवळणी हृदयरसांनीं पूजूं प्रेमाला,
प्रेमकाल हा ! म्हणोत कोणी अरुणोदय याला.
पूर्वदिशेशीं गोफ खेळतो कृष्णगडी बाई !
उधळित सोनें सर्व तयाच्या लागूं या पायीं.
मधुस्मितानें विश्व भरूं ग ! शंकित कां म्हणुनी ?
सर्व सारख्या ? हांसावें मग कोणाला कोणीं ? "
गोफ चालला गगनमंडळीं, रंग नवा आला,
त्यांत लागला कृष्णाचा[1] कर पूर्वेच्या गाला.
विनयवती ती पूर्वदिशा मग अधोवदन झाली,
तों प्रेमाची अद्भुत लहरी वसुधेवर आली ! ४

या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावें,
हें आम्हांला, ब्रह्मांडाला, देवाला ठावें,
परंतु ही बघ भूदेवी तर वेडावुनि गेली.

टकमक पाहत स्वस्थ बैसली या मंगल कालीं !
दंवबिंदूचा–नव्हे नव्हे ! हा पडदा लज्जेचा—
मुग्धपणाचा, बालपणाचा, कोमल हृदयाचा—
निजवदनाहुनि या प्रौढेनें दूर पहा केला,
योग्यच अथवा, प्रेम न मोजी क्षुद्र लौकिकाला !
प्रेमातिशयें मला वाटतें विसरुनि जाइल ही
प्रिय नाथाचा आगमनोत्सव हा मंगलदायी.
कविते ! तिजला साह्य तूंच हो, तूंही पण वेडी !
परंतु वेडाविण सुटतिल का हृदयाचीं कोडीं ?
जा जा ! आतां लाजुं नको ग ! पाहुं नको खालीं !
लाजच अथवा–खुलशिल तूंही या मंगल कालीं,
या लज्जेनें कविमानस हें होउनियां लोल,
प्रेमचंचले ! प्रेमच तुजवर मग तें उधळील !
प्रेमावांचुनि फेड कशानें प्रेमाची व्हावी ?
हा बघ सविता प्रेमळ भूतें प्रेमानें नटवी ? ५

हा प्रेमाचा लोंढा वरुनी आला हो आला
भव्य गिरींनो, निजशिखरांवर झेलुनि घ्या याला.
नील झग्यावर वेलबुटी तो तुमच्या चढवील,
'निगा रखो !' येईल तुम्हांला सरदारी डौल !
कविवाणीचा स्फूर्तियुक्त मग होतां अभिषेक,
तटस्थ होउनि तुम्हांस बघतिल हे सारे लोक ! ६

सुवासिनींनो, वनदेवींनो, डोला ग डोला !
नटवा, सजवा वनमालेला तुमच्या बहिणीला !
वनमालांनो हळूच हलवा हा हिरवा शेला,
सूत्रधार हा नभीं उदेला, उधळा सुमनांला !

‘जय’ शब्दानें आळविण्याला लोकनायकाला
नभोवितानीं ह्या धाडुनि ही विहगांची माला !
सरोवराच्या फलकावरतीं स्वर्गीच्या छाया
कुणी रंगवा, कुणी फुलांवर लागा नाचाया !
वेलींच्या वलयांत बसोनी गा कोणी गाणीं,
या झाडावर त्या झाडावर हंसत सुटा कोणी.
कुणीकुणी या नदीबरोबर नाचत जा बाई,
प्रपातांतही बसुन गा कुणी मंजुळ शब्दांहीं,
उषःकालच्या सुगंध, शीतल मृदुल मंद वाता !
विहार कर, ये पराग उधळित अवनीवर आतां !
या कोमल रविकिरणांवरतीं स्वर्ग बसुनि आला,
सख्या मारुता, गाउनि गाणी झोंके दे त्याला ! ७

ऊठ कोकिळा ! भारद्वाजा ! ऊठ गडे; आतां,
मंगल गानीं टाकी मोहुनि जगताच्या चित्ता !
सरिते ! गाणें तुझें सुरांमधिं या मिळवी बाई !
साध्याभोळ्या तुझ्या गायना खंड मुळीं नाहीं !
पिवळीं कुरणें या गाण्यानें हर्षोत्कट झालीं,
गाउं लागलीं, नाचुं लागलीं, वेडावुनि गेलीं !
चराचराच्या चित्तीं भरलें दिव्याचें गान !
मूर्त गान हें दिव्य तयाला गाणारें कोण ?
दिव्य गायनें, दिव्य शांतता, दिव्याचे झोत,
वसुंधरेच्या अरुण ओतितो नकळत हृदयांत !
त्या दिव्याने स्वर्भूमीचें ऐक्य असें केलें;
त्या दिव्यानें मांगल्याचे पाट सुरू झाले !
मंगलता ती दिव्य कवीला टाकी मोहोनी,
वाग्देवीनें सहज गुंफिलीं मग त्यांचीं गाणीं. ८

गिरिशिखरें, वनमालाही
दरीदरी घुमवित येई !
कड्यावरुनि घेऊन उड्या
खेळ लतावलयीं फुगड्या.
घे लोळण खडकावरतीं,
फिर गरगर अंगाभंवतीं;
जा हळुहळु वळसे घेत
लपत–छपत हिरवाळींत.
पाचूंचीं हिरवीं रानें
झुलव गडे, झुळझुळ गानें !
वसंतमंडप–वनराई
आंब्याची पुढतीं येई.
श्रमलासी खेळुनि खेळ
नीज सुखें क्षणभर बाळ !
हीं पुढचीं पिंवळीं शेतें
सळसळती–गाती गीतें;
झोप कोठुनी तुला तरी,
हांस लाडक्या ! नाच करीं.
बालझरा तूं बालगुणी,
बाल्यचि रे ! भरिसी भुवनीं ! १

बालतरू हे चोंहिकडे
ताल तुला देतात गडे !
प्रेमभरें त्यांवर तूंही
मुक्तमणि उधळुनि देई

बुद्बुद-लहरी फुलवेली
फुलव सारख्या भंवतालीं
सौंदर्य हृदयांमधलीं
दे विश्वीं उधळून खुलीं !
गर्द सावल्या सुखदायी
वेलींची फुगडी होई !
इवलालीं गवतावरतीं
रानफुलें फुलती, हंसती.
झुलवित अपुले तुरे-तुरे
निळीं, लव्हाळीं दाट भरे.
जादूनेच तुझ्या बा रे !
वन नंदन बनलें सारें ?
सौंदर्याचा दिव्य झरा
बालवसंतचि तूं चतुरा;
या लहरीलहरींमधुनी
स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं २

आकाशामधुनी जाती
मेघांच्या सुंदर पंक्ती;
इंद्रधनूची कमान ती
ती संध्या खुलते वरतीं;
रम्य तारका लुकलुकती
नीलारुण-फलकावरती;
शुभ्र चंद्रिका नाच करी
स्वर्गधरेवर एकपरी;
हीं दिव्यें येती तुजला
रात्रंदिन भेटायाला !

वेधुनि त्यांच्या तेजानें
विसरुनियां अवघीं भानें,
धुंद हृदय तव परोपरी
मग उसळी लहरीलहरी
त्या लहरींमधुनी झरती
दिव्य तुझ्या संगीततति !
नवल न, त्या प्राशायाला
स्वर्गहि जर भूवर आला !
गंधर्वा ! तव गायन रे
वेड लाविना कुणा बरें ! २

पर्वत हा; ही दरीदरी
तव गीतें भरलीं सारीं.
गाण्यानें भरलीं रानें,
वर–खालीं गाणें ! गाणें !
गीतमय स्थिरचर झालें !
गीतमय ब्रह्मांड डुले !
व्यक्त तसें अव्यक्तहि तें
तव गीतें डुलतें–झुलतें !
मुरलीच्या काढित ताना
वृंदावनिं खेळे कान्हा;
धुंद करुनि तो नादगुणें
जडताही हंसवी गानें;
दिव्य तयाच्या वेणुपरी
तूंहि निर्झरा ! नवलपरी
गाउनि हें झुळझुळ गान
विश्वाचें हरिसी भान !

गोपि तुझ्या हिरव्या वेली
रास खेळती भंवतालीं !
तुझ्या वेणुचा सूर तरी
चराचरावर राज्य करी ४

काव्यदेविचा प्राण खरा
तूंच निर्झरा ! कवीश्वरा !
या दिव्याच्या धुंदिगुणें
दिव्याला गासी गाणें.
मी कवितेचा दास, मला
कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं
दिव्यांची असली श्रेणी !
जडतेला खिळुनी राही
हृदयबंध उकलत नाहीं !
दिव्यरसीं विरणें जीव
जीवित हें याचें नांव;
तें जीवित न मिळे मातें
मग कुठुनी असलीं गीतें ?
दिव्यांची सुंदरमाला
ओंवाळी अक्षय तुजला !
तूंच खरा कविराज गुणी
सरस्वतीचा कंठमणि
अक्षय तव गायन वाहे
अक्षयांत नांदत राहे ! ५

शिकवी रे, शिकवी मातें
दिव्य तुझीं असलीं गीतें !
फुलवेली-लहरी असल्या
मम हृदयीं उसळोत खुल्या !
वृत्तिलता ठायींठायीं
विकसूं दे सौंदर्याहीं !
प्रेमझरी-काव्यस्फूर्ति
ती आत्मज्योती चित्तीं
प्रगटवुनी चौदा भुवनीं
दिव्य तिचें पसरी पाणी !
अद्वैताचें राज्य गडे !
अविच्छिन्न मग चोहिंकडे !
प्रेमशांतिसौंदर्याहीं
वेडावुनि वसुधामाई
मम हृदयीं गाइल गाणीं
रम्य तुझ्या झुळझुळ वाणी !
आणि जसें सगळें रान
गातें तव मंजुळ गान,
तेंवि सृष्टिची सतार ही
गाइल मम गाणीं कांहीं ! ६

४

## मधुयामिनी

मधुयामिनि नील–लता
हो गगनीं कुसुमयुता
धवलित करि पवनपथा
कौमुदि मधु मंगला – १

दिव्य शांति चंद्रकरीं
आंदोलित नील सरीं
गिरिगिरिवरि, तरुतरुवरि
पसरी नव भूतिला – २

सुप्रसन्न, पुण्य, शांत
रामण्यकभरित धौत
या मंगल मोहनांत
विश्वगोल रंगला. ३

५

# संध्यारजनी

अस्तगिरीच्या अभिनव कुंजीं निजला निजनाथ,
बघतां बघतां त्यास रंगलें वारुणिचें चित्त
हळुंच पाहते, मधुर हांसते, जाते लाजून,
म्हणे मनाशीं " जीव टाकुं का हा ओवाळून ? "
प्रेमनिर्भरा बघुन सखीला भास्कर मायावी
जातां जातां साखरचुंबा एक तिचा घेई !
लाजलाजुनी जीव सतीचा मग अर्धा झाला,
त्यांतच आल्या रोषाच्याही लहरी गालाला ! १

गेला, झाला दृष्टिआडही सूर्य, तरी अजुनी
पहा चमकते प्रेमपताका पश्चिमदिग्वदनीं.
थक्क होउनी दिशा म्हणाल्या " काय मोहिनी ही !
प्रेमसमाधी अजुनि खुळीची या उतरत नाहीं ! "
" किती पश्चिमे ! आतां त्यांचें चिंतन करशील ?
दृष्टि लावुनी अशीच बसशिल सांग किती वेळ ?
खिन्नपणा हा पुरे, पुरे ग अश्रूंची माळ !
उद्यां बरें का तो राणीला अपुल्या भेटेल. " २

संध्येच्या खिडकींत येउनी ही हंसरी तारा,
हळुंच पाहते, खुणावितेही ' या–या ' कोणाला ?
पलिकडचा तो तेजोमय नव पडदा सारून
बघते, हंसते, क्षणांत लपते, ही दुसरी कोण ?
लाजत लाजत असाच येइल सारा स्वर्लोक,
मुग्ध बालिका जमतिल गगनीं आतां नवलाख.

प्रथम तारके ! पहा सखी तव एक पुढें आली
ही दुसरी, ही तिसरी-आतां किति तरि भंवतालीं ! ३

आली होती भरती आतां अस्तसमुद्राला;
या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला ?
कल्पतरूचीं फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती ?
आकाशींच्या गंगेला कीं बुद्बुद हे येती ?
नवटिकल्यांची चंद्रकळा कीं गगनश्री नेसे ?
स्वर्गीचें भांडार उघडलें कीं रात्रीसरसें ?
विश्वशिरावर टोप चढविला हिऱ्यामाणकांचा !
मंगल, मंगल, जिकडे तिकडे जय मांगल्याचा ! ४

रजनीदेवी वैभवशाली तूं अमुची राणी,
हीं नक्षत्रें, तारा साऱ्या, लीन तुझ्या चरणीं.
ज्याच्या त्याच्या तारा वांटुनी दे ग्रहगोलांना,
गगनमंडलीं फेर धरूं दे प्रेमाचा त्यांना
दिशादिशांला तुझीं गाउनी प्रेमाचीं गाणीं
रजनीदेवी ! विश्व टाक हें प्रेमें भारोनी !
काळ्या काळ्या या पडणाऱ्या अंधारासंगें
ब्रह्मांडाचें हृदय नाचवी प्रेमाच्या रंगें ! ५

काळ्या अंधारांत खेळतें विश्व लपंडाव,
ताऱ्यांवरतीं बसून बघती तें कौतुक देव.
दहा दिशांनीं पांघरूनि या काळ्या बुरख्याला
काळा बागुल काळोखाचा एक उभा केला
मंद मंद तेजांत शोधिते गगनश्री त्यांना.
पाजळूनि हे नक्षत्रांचे रत्नमणी नाना.

खेळ चालला एकसारखा हा खालींवरतीं;
पूर्व दिशाही तोंच हासली, सांपडली हातीं ६

उदयगिरीवर नवतेजाची शांत पताका ही !
कीं गंगेच्या शुभ्र जलाचा झोत वरी येई ?
हे मेघांचे धुऊन पडदे स्वच्छ कुणीं केले ?
मंगल मंगल तेज चहुंकडे कुठुनि बरें आलें ?
अर्ध्या मिटल्या अर्ध्या उघड्या असल्या नयनांनीं
कुणास बघती दिशा कळेना मंदस्मित करुनी ?
पहा उदेला दिव्य गोल हा-छे ! भलतं कांहीं ?
हा तारांचा सखा तयांना भेटाया येई. ७

तुमची राणी बसे सारखी तुम्हां न्याहाळीत,
गगनाच्या चौकांत चला हो, या रजनीनाथ !
धवल चंद्रिके ! दे आलिंगन दिव्य यामिनीला,
बहिणी-बहिणी तुम्ही सुखानें चंद्राशीं खेळा !
कां तारांनो ! तुम्ही लाजतां ? हा मंगल काल
निर्मत्सर व्हा प्रेमसंगमीं पोहा चिरकाल.
ब्रह्मांडाचा गोल धरी या प्रेमाचा फेर,
फुलें शांतिचीं पहा उधळलीं जगतीं चौफेर ! ८

निज निज आतां म्हणे जगाला वत्सलता माता,
रजनीदेवी गात बैसली अंगाईगीता.
गगनाच्या या शेजेवरतीं निजवा तारांना.
चंद्रा ! दे ओढणी तुझ्या नव तेजाची त्यांना.
हंसतां हंसतां झोंप लागली दहा दिशांनाहि,
ब्रह्मांडाचा गोल डोलतो, पण जागा नाहीं !
या प्रेमाला गातां गातां कविचेंही चित्त
प्रेमाच्या निद्रेंत रंगलें पाठ गात गात. ९

हिरवे हिरवे गार गालिचे—हरित तृणाच्या मखमालींचे;
त्या सुंदर मखमालीवरतीं—फुलराणी ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत—अव्याज मनें होती डोलत;
प्रणयचंचला त्या भ्रूलीला अवगत नव्हत्या कुमारिकेला.
आईच्या मांडीवर बसुनी—झोंके घ्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला—साध्या भोळ्या फुलराणीला ?

पुरा विनोदी संध्यावात—डोलडोलवी हिरवें शेत;
तोंच एकदां हांसत आला—चुंबून म्हणे फुलराणीला—
" छानी माझी सोनुकली ती—कुणाकडे ग पाहत होती ?
कोण बरें त्या संध्येंतून—हळुच पाहतें डोकावून ?
तो रविकर का गोजिरवाणा—आवडला अमुच्या राणींना ? "
लाजलाजली या वचनांनीं—साधी भोळी ती फुलराणी ! २

आंदोलीं संध्येच्या बसुनी—झोंके झोंके घेते रजनी;
त्या रजनीचे नेत्र विलोल—नभीं चमकती ते ग्रहगोल !
जादूटोणा त्यांनीं केला—चैन पडेना फुलराणीला;
निजलीं शेतें; निजलें रान—निजले प्राणी थोरलहान.
अजून जागी फुलराणी ही—आज कशी ताऱ्यावर नाहीं ?
लागेना डोळ्याशीं डोळा—काय जाहलें फुलराणीला? ३

या कुंजांतुन, त्या कुंजांतुन—इवल्याशा या दिवल्या लावुन,
मध्यरात्रिच्या निवांत समयीं—खेळ खेळते वनदेवी ही.
त्या देवीला ओव्या सुंदर—निर्झर गातो; त्या तालावर—

झुलुनि राहिलें सगळें रान—स्वप्नसंगमीं दंग होउन !
प्रणयचिंतनीं विलीनवृत्ति—कुमारिका ही डोलत होती;
डुलतां डुलतां गुंग होउनी—स्वप्नें पाही मग फुलराणी— ४

" कुणी कुणाला आकाशांत—प्रणयगाथनें होतें गात;
हळुच आगुनी आलें कोण—कुणी कुणा दे चुंबनदान ! "
प्रणयखेळ हे पाहुनि चित्तीं—विरहार्ता फुलराणी होती;
तों व्योमींच्या प्रेमदेवता—वाऱ्यावरतीं फिरतां फिरतां—
हळूंच आल्या उतरुन खालीं—फुलराणीसह करण्या केली,
परस्परांना खुणवुनि नयनीं—त्या वदल्या ही अमुची राणी ! ५

स्वर्भूमीचा जुळवित हात—नाचनाचतो प्रभातवात;
खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला—हळुंहळुं लागति लपावयाला
आकाशींची गंभीर शांती—मंदमंद ये अवनीवरतीं;
विरूं लागलें संशयजाल—संपत ये विरहाचा काल.
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवुनी—हर्षनिर्भरा नटली अवनी;
स्वप्नसंगमीं रंगत होती—तरीहि अजुनी फुलराणी ती ! ६

तेजोमय नव मंडप केला—लख्ख पांढरा दहा दिशांला,
जिकडेतिकडे उधळित मोतीं—दिव्य वऱ्हाडी गगनीं येती;
लाल सुवर्णी झगे घालुनी—हांसत हांसत आले कोणी;
कुणीं बांधिला गुलावि फेटा—झकमकणारा सुंदर मोठा !
आकाशीं चंडोल चालला—हा वाङ्निश्चय करावयाला;
हें थाटाचें लग्न कुणाचें !—साध्या भोळ्या फुलराणीचें ! ७

गाउं लागले मंगलपाठ,—सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा—कोकिळ घे तानांवर ताना !
नाचुं लागले भारद्वाज,—वाजविती निर्झर पखवाज,

नवरदेव सोनेरी रविकर—नवरी ही फुलराणी सुंदर !
लग्न लागतें ! सावध सारे !—सावध पक्षी ! सावध वारे !
दंवमय हा अंतःपट फिटला—भेटे रविकर फुलराणीला ! ८

वधूवरांना दिव्य रवांनीं—कुणीं गाइलीं मंगल गाणीं;
त्यांत कुणीसें गुंफित होतें—परस्परांचें प्रेम ! अहा तें !
आणिक तेथिल वनदेवीही—दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं--फुलराणीची गोड कहाणी !
गुंगतगुंगत कवि त्या ठायीं—स्फूर्तीसह विहराया जाई;
त्यानें तर अभिषेकच केला—नवगीतांनीं फुलराणीला ! ९

# मंगलमय प्रेमकवन

सृष्टि निमाली स्वर्गहि जुरले,
प्रेम मात्र मंगलमय भरलें;
तेज हरपलें तम मालवलें,
उन्मनींत मन तन्मय मुरलें;
जागृति नव्हती,[1] स्वप्नहि नव्हतें,
भाव मनोज्ञ स्फुरले तेथें;
सूरहि नव्हते, शब्दहि नव्हते,
गीतच हृदयंगम बनलें तें.
सृष्टि पातली, स्वर्गहि आले,
तेज-तमांचें मीलन झालें
सूर उदेले, शब्द निघाले,
विश्व कवन तें ऐकुनि धालें.

## ८ तारकांचें गाणें

कुणि नाहीं ग कुणि नाहीं
आम्हांला पाहत बाई.
शांति दाटली चोहिंकडे;
या ग आतां पुढें पुढें.
लाजतलाजत
हळूंच हांसत,
खेळ गडे, खेळूं कांहीं,
कोणीही पाहत नाहीं. १

सुंदरतेला नटवून,
कोमलतेला खुणवून, [1]
प्रेमाच्या वसतीकरितां
जगदंतर [2] फुलवूं आतां.
दिव्य सुरांनीं [3]
गीतें गाउनि
विश्वाला निजवायाला
वाऱ्याचा बनवूं झोला. २

फेकुनि द्या इकडेतिकडे
थोडेसे दंवबिंदु गडे,
या निर्मल अवकाशांत
प्रेमाचें पेरूं शेत
दिव्यमोहिनी [4]
सर्वें गुंगुनी

विश्वाला हंसलतेनें
प्रेमाचें गाऊं गाणें ३

सरितांच्या लहरींवरतीं
नाचूं या निर्भयचित्तीं;
अर्धोन्मीलित फुलवोनी
लपूं चला कलिकांत कुणी;
  कविहृदयांत
  गरके घेत
जाउनिया खेळूं आतां
हीं गाणीं गातां गातां. ४

एखादी तरुणी रमणी
रमणाला आलिंगोनी,
लज्जामूढा भीरुच ती
शंकित जर झाली चित्तीं,
  तिच्याच नयनीं
  कुणी बिंबुनी
धीट तिला बनवा बाई;
भुलवा ग, रमणालाही. ५

सुखस्वप्नांनीं गुंगवुनी
पुण्यात्मे हसवा कोणी;
आशा ज्या त्यांच्या चित्तीं,
त्याच रचा स्वप्नांवरतीं;
  दयितचिंतनीं
  विरहभावनीं;

दिवसां ही झुरली बाला,
भेटूं द्या स्वपती हिजला. ६

अनेक असले खेळ करूं,
प्रेमाशा विश्वांत भरूं,
सोडुनिया अपुले श्वास
खेळवुं नाचवुं उल्हास;
प्रभातकाळीं
नामनिराळीं
होउनिया आपण राहूं;
लोकांच्या मौजा पाहूं. ७

## ९ संध्यातारक

दिनरजनींच्या हृदयावरलें
प्रेमसंगमीं उद्‌भवलेलें
मुग्ध तान्हुलें फूलच पहिलें !
कोमल किरणीं नभ फुलवोनी खेळ खेळतें त्यांत. १

परमवत्सला जननी रजनी
संध्येचा पट दूर करोनी
रम्य गुलाबी फुलांवरोनी
चुंबुनि घे उचलोनी, बाळाला स्वकरांत, २

‘ आज दिसे पण मलूल बाई
छबूकल्याची मृदु मुद्रा ही !
काय तरी सुकुमारा होई ?
खेळुनी दमलें गडे चिमुकलें झोंपलेंच निमिषांत. ’ ३

स्ववायूच्या दिव्यांदोलीं
लहानशी मृदु शय्या केली
रजनी ओव्या गाउं लागली–
तूं लडिवाळा ! निज निज आतां पाळणियांत. ४

‘ विश्वाचें विश्रांतिस्थान
तें माझ्या गुणिलाचें गान
अशी गडे अक्षय गाईन
तूं वेल्हाळा निज निज बाळा या मम गीतरवांत. ’ ५

स्वर्गाला आंदोलन देत
मंदपणें विचरे स्वर्यांत
शांत शांत अवघ्या गगनांत;
दिव्य अप्सरा सुगुणागारा प्रीतिगीति गातात. ६

त्या प्रीतीच्या मधु लहरींनीं
गुंगी चढुनी या तव नयनीं
लागो डोळा तुझा म्हणोनी
मीही गातें अस्फुट गीतें हृदयाच्या हृदयांत. ७

झोंप कशी पण ती अजुनीही
आज गडे तुज लागत नाहीं
सांग करूं तरि आतां काई
बघ ना बा रे विश्वच सारें निजलें प्रभुहृदयांत. ८

कीं दोलीं तुज नीज न येई.
घेतें तर उचलुनि मी बाई;
झांकियलीं ग मधुनेत्रें हीं.
पदराखालें झोंपीं गेलें बाळ कसें इतुक्यांत ? ९

१०

# श्रावणमास

श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोहिंकडे;
क्षणांत येतें सरसर शिरवें, क्षणांत फिरुनी ऊन पडे. १

वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिलें नभोमंडपीं कुणि भासे ! २

झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा ! तों उघडे;
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळेंपिवळें ऊन पडे. ३

उठती वरतीं जलदांवरतीं अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा. ४

बलाकमाला उडतां भासे कल्पसुमांचि माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि कीं एकमतें. ५

फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती,
सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजबाळांसह बागडती. ६

खिलारें हीं चरती रानीं, गोपहि गाणीं गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरें. ७

सुवर्णचम्पक फुलला, विपिनीं रम्य केवडा दरवळला;
पारिजातही बघतां भामारोष मनींचा मावळला ! ८

सुंदर परडी घेउनि हातीं पुरोपकंठी शुद्धमती
सुंदर बाला या फुलमाला रम्य फुलें-पत्री खुडतीं. ९

देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत,
वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावणमहिन्याचें गीत. १०

| | |
|---|---|
| ' हें फूल | या उडत्या स्वर्गांतील. |
| माणिक हें | बाई गडे झुलतें आहे ! |
| हें तान्हें | सृष्टीचें गोजिरवाणें ' |
| कौतुकली | मधुवदना हंसली वदली– १ |
| | |
| ' स्वच्छंदी | फूलपांखरा ! आनंदी |
| माधविका | पाठविते तुज या लोका, |
| ये, गाई | चुम्बनमय गाणीं कांहीं; |
| खेळ इथें | या कोमल कलिकेवरतें; |
| ही बाला | फूलपांखरा ! चुंबि हिला ' २ |
| | |
| फुलें नवीं | मुग्धलतेवरतीं यावीं |
| त्यापरि ती | प्रेमलता फुलली चित्तीं. |
| होय ! परी | फूलपांखरूं तिचें दुरी ! |
| ना तरि तें | या सुमनीं स्वर्गंचि बघतें ! ३ |
| | |
| ' थांब गडे | धांवुं नको इकडेतिकडे; |
| कलिका ही | मुग्ध हृदय उकली पाहीं. |
| प्राणच तूं | एक तिचा जीवनहेतु ! |
| थांब तरी– | कठिणच गे नरजाति खरी ! ' ४ |
| | |
| फुलवेली | क्षणरोषें रञ्जित झाली, |
| हे बाण | मदनाचे हरिते भान. |
| रंगहि ते | जडतेला जीवन देते. |

अरसिक तें फूलपांखरूं परि होतें,  
रसिक न कां हाय पण तिचा प्राणसखा ! ५

‘ हें सुमन तुजवांचुनि चुंबिल कवण ?  
सांग तरी ’– गदगदली फुलवेल परी  
‘ विरहानें शून्य न का गमती भुवनें ? ’  
हृदयाला पूर पुरा भरुनी आला ! ६

‘ या आतां– अन्त किती बघतां नाथा !  
मी फूल या निर्जन रानांतील  
श्वासानें व्यर्थ आर्द्र करितें भुवनें ! ’  
‘ व्यर्थेचि कां ? ’ ‘ कोण – बाइ ग प्राणसखा ! ’ ७

सांज खुले दिनरजनीमीलन झालें.  
दंवमाला उपमा तरि कसली त्याला ?  
टपटपती स्वर्भूच्या हृदयावरतीं  
कूजनही मधुनिमधुनि ऐकूं येई ! ८

सांजचि ती वर्णावी कैशी गीतीं ?  
त्या छाया कवि होता अवलोकाया;  
कौतुकला शब्द परी न फुटे त्याला !  
मूकपणीं अक्षय गुंगे हेंच मनीं  
गोड भलीं फूलपांखरूं-फुलवेली ! ’ ९

( अष्टदिशांचा गोफ )

सांज खुले सोन्याहुनि पिंवळें हें पडलें ऊन;
चोहिंकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान.
पांघरली जरतार जांभळी वनमाला शाल;
सांध्यतेज गिरिशिखरीं विखरी संमोहनजाल.
तया जाचा प्राण चिमुकला संध्येचा दूत
बालविहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत. १

क्षणभर येथें, क्षणभर तेथें, भिंगोरी साची
अवकाशीं जशि काय फिरविली फिरकी जादूची !
खेळाडू कविबाळ करुनि जणुं भावांची होडी.
मूर्तरूप देउनी तिला या वाऱ्यावर सोडी.
गिरिशिखराचें गोड फूल हें सांध्य तरंगांनीं
झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतो गगनीं ! २

अष्टदिशांचा गोफ सभोंनी हा भिरिभिरि पाहे;
मंद झुले वनमाल, वाहता शांत झरा राहे.
समाधिस्थ जणुं काय जहालें हा गिरि, हें रान
हा आनंदोद्रेक नाचरा गगनीं पाहून !
सुंदरतेचा जलसा असला पाहुनिया धाला
कालहि वाटे विस्मित चित्तें स्तब्ध उभा ठेला. ३

सृष्टिदेविच्या सगुणा बाळा स्वर्गाच्या तान्ह्या
नांवहि रे तव ठाउक नाहीं मज गोजिरवाण्या !
निजदेहाचा करुनि असा हा सुंदर आंदोल
आत्मरंगीं रंगल्या मनाला झुलविसि कीं बोल ?
किंवा कोणी दिव्य देवता जरि न दिसे मज ती
लीलेनें तुज हालविते का घेउनिया हातीं ? ४

सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें,
चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें.
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं,
बनवावें मग धुंद रंगुनी काव्यसुधापानीं
अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे,
चित्त वाटतें तरल तुझ्यापरि खगबाळा व्हावें. ५

भवदुःखाच्या अनंत डोहीं परि बुडतों पाहीं;
शांति मिळेना क्षणभर जीवा विश्रांती नाहीं.
काव्यदेवता अंतरली मज गरिबाला आज;
काळ लोटला हाय किती मन वरिताहे लाज.
भ्राते माझे वातावरणीं तुजपरि भरभती;
पंख तुटुनिया विव्हल पडलों मी धरणीवरतीं. ६

सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे;
बंधहि होती शिथिल हरपतें भानहि जगताचें
जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं;

हाय[१] ! सुटेना दृढ देहाची परि बसली गांठी !
दिव्यानंदीं म्हणुनि उमाळा दुःखाचा दाटे
सत्यहि जो आनंद कल्पनामय केवळ वाटे ७

अपूर्णताही यापरि मजला जरि बुडवी शोकीं,
चित्र मनोहर खगबाला परि मी तव अवलोकीं,
अपूर्ण अपुलें ईप्सित झालें पूर्ण दिसे जेथें,
मनुजाचें मन सहज पावतें आकर्षण तेथें.
तुजला बघतां भरभर उडतां कविता आठवली.
कशीबशी ती त्वत्प्रीतीस्तव या कवनीं लिहिली ८

१३

# तडाग असतों तर–

विमल चंद्रिका क्षितिजावरतीं
तरळ तारका चमचम करिती,
दिव्य लोकिंची रुचिरा शांती
तुडुंब भरली गगनांत. १

ग्रहाग्रहावर भरलें तेज,
तेजाची लयलूटच आज,
रात्रींचा शेवटला साज
देव करिति जणुं स्वगीत. २

तेज दाटलें, शांति दाटली,
सौंदर्याची वेलही फुलली;
प्रेमाच्या नव पुष्पीं नटली
कविच्या हृदयांत. ३

मंद तेज अवनीवरते तें,
मधु एकांता वाढवितें तें,
त्यांतहि वारा हळूच हाले
निर्भर रुचिरानंदांत. ४

या समयीं जर तडाग असतों,
रम्य दिव्य तें रेखित बसतों;
हीच शांतता अशीच धरितों
शुभ्र जलाच्या हृदयांत. ५

सौंदर्याने जीवन बाणे,
प्रेमजागृती हो मग त्यानें,
लहरीवर हें लिहुनी गाणें,
मग दिवसा बसतों गात. ६

चित्रकराला कविरायाला,
अशक्य जें कां उठवायाला,
सौंदर्याच्या नव नव लीला,
त्या उठल्या मम हृदयांत. ७

मनोवेधका सृष्टिसतीच्या अगा चिमुकल्या बाळा !
स्वागत तव, ये तृणासहित या भूतें डोलविण्याला. १

सजल नील घन करोनि गेले अमृताचा वर्षाव;
चलत्तृणावरि तुला पाठवी प्रेमभरें मग देव. २

खेळ लाडक्या या सृष्टीच्या अंकावरती आतां;
घे आंदोलन सुखें ताल दे या विहगांच्या गीता. ३

या वायूच्या प्रशांत लहरी; हे गगनाचे श्वास,
या प्रेमाच्या लाटा सुमना, चुंबुनि घे तूं त्यांस. ४

म्हणोत कोणी तूं अवनीच्या उदरांतुनि आलास;
मज गमसी परि नभोविहारी देवदूत तूं खास. ५

ही मोहकता, तुझी फुला ही प्रेमनिर्भरा वृत्तीं;
सदानंद हा उद्भवेल का या भूपृष्ठावरती. ६

सदैव सस्मित, सदैव अडुला डोलत तूं असतोस;
दुःखसृष्टी कधीं स्पर्शली नाहीं तव चित्तास. ७

तुला तुडविती कितेक करिती तुजवरती आघात;
म्हणोनि नाहीं कधीं पाहिलें खिन्न तुझें मी चित्त. ८

मैदानावर मी मित्रांसह या खेळाया येतों;
प्रतिवर्षीं तुज बघतों, येथें सवेंच वेडा होतों. ९

तुझीं चुंबनें असंख्य घेतों, धरितों तुज हृदयाशीं;
तृप्ति न हो परि चित्त धांवतें पुनःपुन्हां तुजपाशीं. १०

तृणपुष्पा चल, तुज कवितेच्या ठेविन उद्यानांत;
सख्या रहा तूं तिथें निरंतर, रंजव माझें चित्त. ११

१५

## आनंदी पक्षी

केव्हां मारुनि उंच भरारी । नभांत जातो हा दूरवरी,
आनंदाची सृष्टी सारी । आनंदें भरली. १

आनंदाचे फिरती वारे । आनंदानें चित्त ओसरे,
आनंदें खेळतो कसा रे । आनंदी पक्षी ! २

हिरवें हिरवें रान विलसतें । वृक्षलतांची दाटी जेथें,
प्रीती शांती जिथें खेळते । हा वसतो तेथें ३

सुंदर पुष्पें जिथें विकसलीं । सरोवरीं मधु कमलें फुललीं
करीत तेथें सुंदर केली । बागडतो छंदें. ४

हासवितो लतिकाकुंजांना । प्रेमें काढी सुंदर ताना;
आनंदाच्या गाउन गाना । आनंदें रमतो. ५

जीवित सारें आनंदाचें । प्रेमरसानें भरलें त्याचें;
म्हणोनिया तो रानीं नाचे । प्रेमाच्या छंदें ! ६

आम्हांकरितां दुर्धर चिंता । नाना दुःखें हाल सभोंता,
पुरे ! नको ही नरतनु आतां । दुःखाची राशी ! ७

बा आनंदी पक्ष्या, देई । प्रसाद अपुला मजला कांहीं,
जेणें मन हें गुंगुन जाई । प्रेमाच्या डोहीं, ८

उंच भराऱ्या मारित जाणें । रूप तुझें तें गोजिरवाणें !
गुंगुन जाइल चित्त जयानें । दे, दे तें गाणें ! ९

( अंजनीगीत )

आयुष्याच्या प्रभातकालीं
चित्ताच्या क्षितिजावर आलीं,
सुस्वप्नें तीं क्षण लकलकलीं—
विलयाला गेलीं. १

कालतरूचीं गलित फुलें तीं
पुनरपि फुलतिल का मजभोंतीं ?
स्मरतां त्यांना अहा उसळती—
हृदयाच्या वृत्ती. २

स्मरणाच्या थडग्यांतुनि या रे !
सुमनांनो भूवरतीं सारे !
खेळ करूं ते पुन्हां एकदां
पूर्वी जे केले, ३

दिव्य माझिया नक्षत्रांनो !
बाल्यवनींच्या वनविहगांनो !
या चिमण्यांनो ! या छकुल्यांनो !
या, या, या आतां. ४

प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा तें
तुम्हांसंगतीं येइल येथें;

मीही सोडुनी तारुण्यातें
होइन बाल पुन्हां. ५

प्रेमावांचुनि अन्य न कांहीं,
दुष्टपणाचा स्पर्शहि नाहीं,
अंधाराचा मागमूसही
न दिसे ज्या ठायीं. ६

त्या बाल्याच्या सीमेवरते
दुष्ट मत्सरी जगतापरते
प्रेमाचें साम्राज्य सभोंतें
बनवोनी राहूं ७

स्वानंदाच्या त्या रानांत
मृदु हास्याचें पेरुनि शेत,
परस्परांचे धरुनी हात
नाचूं स्वछंदें ८

सत्त्वविशिष्ट प्रेमावरतीं
स्वर्गाची जर आहे वसती
नयनरज्जुंनीं बांधुनि आणूं
तर तो भूवरतीं. ९

ज्या प्रीतीच्या मंजुळ नादें
बाल्याच्या मोहोनी छंदें
वाजविली मुरली गोविंदें–
सर्वांना ठावें. १०

[illegible] झोली हाती
[illegible] अशित [illegible]
या [illegible] सीमेवरती
आपणही राहू. ११

## पांखरास

पांखरा, गाइलें तुला कधींहि न कोणीं;
न च अश्रु गाळिले कुणीं वनीं येवोनी !
निःश्वास धांवती सौख्यामागें सारे;
दुःखाचा वाली कुणा कुणीहि न बा रे ! १

मधु सुखद उष्णता मिळतां रविरायाची
हीं पवनांदोलीं कमलें उमलायाचीं.
तेव्हांच कोकिला मैना गातिल गाणीं,
होतील फुलें स्मरविव्हल त्या गीतांनीं. २

त्या मधुर सुखींचें अश्रुजाल चुंबीत
झुलतील फूलपांखरें निजानंदांत
रविवदनावरचा रंग जरा परि बदले,
मग गान सर्व सौंदर्य, सर्व हें थिजलें ! ३

या मत्त कोकिला गिरिकुहरीं रडतील,[१]
कोंवळ्या कळ्या मोडोनि मान पडतील;
लवदार मनोहर वेलबुटी नवलाची
त्या काळीं कोठें नाहीं प्रगटायाची. ४

रवि वरतीं वरतीं चढत चढत गगनांत
अंगावर भरिल या मंद शीत पवनांत
निष्प्रेम मनाचें गाणें केविलवाणें
तें तुझें मात्र राहील जसेंच्या तसें. ५

ती पूर्वतारका प्रभातरेषेवरतीं
जशि काय उभी सौंदर्यदेवता होती;
पीतांबर कसिले, रानवेत्र धरि हातीं, [1]
शिरिं मुकुट कळ्यांचा, त्रिलोकसुखदा मूर्ति. ६

हळुवार हिमाचें अवगुंठन हलवोनी
बोलेल [2] सर्व निद्रिस्त विश्व म्हणवोनी. [3]
सारून जरा कचभार बालिका पाहे.
एकेक तारका समाधिचें सुख लाहे. ७

निद्रिस्त भूमिला स्वप्न जणों हें दिसलें,
स्वप्नांत लाडके, सुंदर डोळे भिजले.
स्मरतां हि जया हो रोमांचांची भरती.
मधु मंद अहा ती घटिका सौख्यद होती. ८

परि तोहि काळ तव हृदया नच सुखदायी,
निष्प्रेम मनाला कोठेंही सुख नाहीं.
चुंबीत गुलाबी गाल मधुर संध्येचा
कर वरतीं आला सुंदर रविरायाचा. ९

जग समाधिस्थ जणुं सर्व सर्व हें होतें,
परि शांतिलेशही नव्हता ठाउक तूतें !
बैसून कुठें तरि कांटेरी झुडुपांत
तव हूं–हूं–हूं–चें होतें गीत वहात ! १०

येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.
फिरवून भरारा गोफण तो झाडील
काळ्यांवर उपडें भग्न हृदय पाडील ! ११

मग एकच धडकी, एकच अंतिम बोल
बोलून [१] तुझें हें जळतें हृदय निवेल ! १२

सुमनांच्या गर्भामाजीं । रसरंगा भरली ताजी;
आजूबाजूला वसलीं । शुभ्र अद्रिशिखरें सगळीं;
सांभाळुनि उतरा बाई । वेळ गडे स्नानाची ही १

गर्द दाट मधली झाडी । मंदमंद हलवा थोडी;
पराग, सुमनें हसलेलीं । नीट बघा पायाखालीं,
पुष्पांचा बसला थाट । हळूं हळूं काढा वाट २

गोड सुवासाचे मेघ । आळसले जागोजाग;
हिमकणिका त्यांच्या पडली । गोड गोड अंगावरतीं;
पुनीत ही गंगामाई । स्नान करा झटपट बाई ३

संध्येच्या कोमल किरणीं । नटुनि थटुनि वस्त्राभरणीं
गुंजतसे अक्षयगीतें । बैसुनि त्या भृंगावरते;
मग अपुल्या भरभर जाऊं । देवांचें दर्शन घेऊं ४

वेडा झाला, म्हणा हवें तर उठला जनतेंतुनी,
कवी हा तन्मय निजगायनीं;
सुखदुःखांच्या व्यामोहाच्या सुटला फेऱ्यांतुनी
नसे जग याच्या ध्यानींमनीं.
स्वार्थ विसरला, अविरत फिरतो गुंगत विजनीं, वनीं
म्हणुनिया निंदो याला कुणी,
परि जगीं मिळालें याचें याला पुरें,
वैभवें वाटतीं यास दुजीं पामरें,
मग करील कां हा स्पृहा तयांची बरें ?
एकच याचें यास पुरे, मग हसोत हसतिल कुणी,
कवी हा, हा जगताचा धनी १

मदांध कमले ! जगीं कुणावर जा पसरी मोहिनी;
न हा वश कविवर तुजलागुनी !
दंभा ! न[illegible]चा ! कळे न का तुज हा सत्याचा झरा,
सुखें जा नाच जगीं पामरा !
सैताना ! मत्सरा ! अरेरे ! जासी कोणाकडे ?
दिसेना कविवर का तुज पुढें ?
हा पवित्र पुरता ज्ञानसूर्य कीं अहा !
जा, तमा नीच, हा उदया आला पहा !
अविवेका घूका, दडुनि कुठेंही रहा.
हा प्रेमाचा धवलचंद्रमा भूवर ये उतरुनी;
कवी हा, हा जगताचा धनी २

स्वच्छंदी हा प्रभातवायू झोके घे अंबरीं,
लतांना पुष्पित करितो तरी;
चंद्र पहा हा गगनमंडलीं हसतो वेड्यापरी;
कर्पितो सागरलहरी तरी;
हो ! असाच समजा हा स्वच्छंदी कवी
हा जगास अपुल्या इच्छेसम वागवी,
हा भूस अर्पितो सदैव सुख मानवी;
खरा भिकारी, खराच वेडा, परंतु मोठा गुणी;
कवी हा, हा जगताचा धनी. ३

# कवीची इच्छा

तुला बघावें गुंगावें । गुंगतची चुंबुनि घ्यावें;
गुंगतची होउनि जावें । स्वदाधीन जीवेंभावें.
गुं गुं गुं गुं जोंवरती । जडतेची पडते माती,
तरलित हो हृदयज्योती । दिव्य सूर श्रवणीं येती.
मग त्याला धरुनी सोल [१] । एकेकच गुंफित बोल-- १

सौंदर्याचे, स्वप्नाचे । भासाचे, कल्पकतेचे--
अर्धस्फुट नयनांवरचे । निद्रेचे जागेपणिंचे—
मुग्ध मधुर हास्यावरले । बिंदुकिरण कलिकेमधले,
हृदयतार हालविणारे । मनस्ताप मालविणारे,
मनोवृत्ति कालविणारे । अंधकार घालविणारे,
दिव्य तरंगीं तरणारे । गोड गोड गुंफित सारे. २

प्रतिभेच्या सौधावरुनी । मरुद्गणांवरती चढुनी,
अनंतांत गगनीं उडुनी । लीन बनुनि वातावरणीं,
होउनियां सौंदर्यधनी । गुंजारव मंजुळ गाणीं,
ब्रह्मांडाची सदाफुली । अक्षयतेमध्यें फुलली.
फुलें तिचीं बघतां नयनीं । वेड भरुनि अंतःकरणीं;
फूलपांखरें परोपरी । निर्बंधपणें फुलांवरी
जशीं स्वयें तरलित होतीं । मंद तरल गंधावरतीं,
तेंवि जगाच्या फुलावरी । गंध दाटले परोपरी;
अनुभवुनी हर्षित व्हावें । सुखदुःखें चुंबित गावें. ३

सुमकोषीं आपोआप । क्षण ध्यात्री साखरझोंप
डोलतची जागें व्हावें । हांसतची गुंगत जावें,
सत्याचीं स्वप्नें व्हावीं । सत्याला स्वप्नें यावीं [१]
स्वप्नींही स्वप्नें बघत । स्वप्नांतच व्हावा अंत !
मरण्याचें स्वप्नहि गोड । जगण्याचें स्वप्नहि गोड !
येणेंपरि सर्वहि भास । अमृताचे व्हात्रे कोष. ४

काव्यपांखरूं हें मेलें । जन म्हणतिल पाहुनि सगळे
नवल परी यावर कांहीं । मृत्यूचें चिन्हहि नाहीं !
स्वर्गांचीं बहरून फुलें । सूर्यफुलें नक्षत्रफुलें
नंदनवन सुंदर वरतें । तें दिसलें नयनीं यातें;
मधुगीतें गंधर्वांचीं । नृत्यकला अप्सरसांची
देवांचीं ‘ राज्यें ’ बघुनी । हें भुललें गेलें उडुनी
अक्षय तेथें तरंगतें । तरल मनें डुलतें झुलतें. ५

काव्यपांखरूं स्वैरपणें । चुंबनगीतें अजुनि म्हणे;
नाहिं खरें जगतीं मरणे । काव्यपांखरूं बघा खुण;
नसत्याची भीती धरुनी । असतें कां द्यावें त्यजुनी !
कां म्हणुनी वेडें व्हावें ? चुंबितची यासम जावें.
भासाचीं सर्वहि सुमनें । चला चला चुंबित वदनें,
होइल मग सर्वचि गोड । मरण गोड जगणें गोड.
दुःखाश्रूंतिल ही गोडी । हास्याहुनि नाहीं थोडी.
दोघेही गोडच [२] भास । आवडती चुंबायास ६

प्रेमानें भरलें गात्र । सांपडला चुंबनमंत्र !
चुंबितची आम्हीं जाऊं । स्वैरपणें जगतीं राहूं.
प्रेतहि माझें पाहून । प्रेमानें गुंगत गान [३]
यापरि जग हर्षित व्हावें । हें इच्छी जीवेंभावें

. ग्रंथसंग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,- तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3 AUG 1994
27 AUG 1994
31 AUG 1994
1 SEP 1994
15 OCT 1994
NOV 1995
JAN 1995

1 MAR 1995
22 JUL 1995
9 SEP 1995
25 NOV 1995
9 DEC 1995
9 MAR 1996
FEB 1997
15 MAR 1997

(क्र. मा. पहा)

सुमकोषीं आपोआप । क्षण व्याची साखरझोंप
डोलतची जागें व्हावें । हांसतची गुंगत जावें,
[illegible] वें व्हावीं । सल [illegible]



26 JUL 1997
23 APR 1997

## २१ काव्याची कल्पना

वस्तुवस्तुमधिं काव्य विलसतें;
श्रवणीं नयनीं हृदयिं उतरुनी
पूर्ण करी जें जड जीवातें.
बाह्यवेष जरि सुंदर धरितें,
मंजुगीत त्यामधुनी स्फुरतें;
दिव्य अहा मग तें अवतरतें
मीतूंपण तें क्षणिं विसरवितें
लावि अखंड ध्यास जिवातें.

प्रिय कविते अमरसुते, तेजाची तूंच उज्ज्वले, खाणी;
मर्त्य जगीं अमर तुझी विश्वाला स्फूर्ति देतसे वाणी.
रविशशितारकमाला सायंतन मंगले तुझीं माते,
तव अरुण-वरुण-इंद्रहि, सुरलोकच भूति अर्पितो तूंतें.
ग्रहगोलांवरुनि तुवां मंगलता मूर्त आणिली खालीं.
हिमगिरिवर मानवता मुनिवदनीं बोल बोलती झाली. १

आले पुण्य ऋषीश्वर, अवतरले भरतमंडलावरतीं,
स्वर्गाहुनि अधिक या भूमीची वाढली तयें महती.
तीं दिव्य अद्रिशिखरें हिममंडित सूर्यमंडलाखालीं
भासविती दिव्य उषा अक्षय कीं उतरुनी जनीं आली.
ते शुद्ध पूत निर्झर उज्ज्वलता मूर्त पसरिती पाहीं !
धांवति कड्याकड्याहुनि मधुगीतें धुंधकारुनी जाई. २

पसरे कर्कश कानन......रान भरे
घोर दरी किर्र करी मैदानहि थोर त्यापुढें पसरे.
असल्या चमत्कृतीचे पाहुनि नाना विलास नयनांहीं
या क्षुद्र मर्त्य देहीं आसक्ती अल्प राहिली नाहीं.
निर्झरमय, काननमय, गायनमय दिव्य जाहला देह,
सृष्टीचेहि पुरेना विचराया स्वैर त्याजला गेह.
मन गूढ अमूर्तांचीं मधुगीतें गोड गावया लागे,
आनंदरूप झाली मानवता, मृत्यु राहिला मागें. ३

२२

## शारदेस

प्रिय कविते अमरसुते, तेजाची तूंच उज्ज्वले, खाणी;
मर्त्य जगीं अमर तुझी विश्वाला स्फूर्ति देतसे वाणी.
रविशशितारकमाला सायंतन मंगले तुझीं माते,
तव अरुण-वरुण-इंद्रहि, सुरलोकच भूति अर्पितो तूंतें.
ग्रहगोलांवरुनि तुवां मंगलता मूर्त आणिली खालीं.
हिमगिरिवर मानवता मुनिवदनीं बोल बोलती झाली. १

आले पुण्य ऋपीश्वर, अवतरले भरतमंडलावरतीं,
स्वर्गाहुनि अधिक या भूमीची वाढली तयें महती.
तीं दिव्य अद्रिशिखरें हिममंडित सूर्यमंडलाखालीं
भासविती दिव्य उषा अक्षय कीं उतरुनी जनीं आली.
ते शुद्ध पूत निर्झर उज्ज्वलता मूर्त पसरिती पाहीं !
धांवति कड्याकड्याहुनि मधुगीतें धुंधकारुनी जाई. २

पसरे कर्कश कानन......रान भरे
घोर दरी किर्र करी मैदानहि थोर त्यापुढें पसरे.
असल्या चमत्कृतीचे पाहुनि नाना विलास नयनांहीं
या क्षुद्र मर्त्य देहीं आसक्ती अल्प राहिली नाहीं.
निर्झरमय, काननमय, गायनमय दिव्य जाहला देह,
सृष्टीचेहि पुरेना विचराया स्वैर त्याजला गेह.
मन गूढ अमूर्तांचीं मधुगीतें गोड गावया लागे,
आनंदरूप झाली मानवता, मृत्यु राहिला मागें. ३

ही सर्व कृपा देवी, तव चरणाचीच, शारदे, वाटे;
सान मनें हीं अमुचीं तेजाच्या तूंचि लाविलीं वाटे;
रविकिरणीं भासतसे कीं निर्झरतांडवांत नाचतसे,
पुष्पांवर हांसतसे रूप तुझें क्षणिक मानवांस दिसे. ४

२३

# कवीचें अंतरंग

सख्या वाचका गीत कवीचें ऐकुनिया निज कानीं
न वदे, कळलें महाकवीचें अंतःकरण निदानीं. १

हृन्मंजूषीं भाव गुप्त जे भरले, जनसम्मर्दी
कथील का कधिं उच्चरवानें कवि हृदयाचा दर्दी ? २

जा जाउनिया अब्धिकिनारीं एक शुक्तिका घेईं,
रंग मनोहर दीप्तिहि अनुपम याविण अन्य न कांहीं. ३

अगाधगहनें सागरलहरी झांकुनि ठेवति कांहीं;
गूढतळींचीं त्याविषयीं ती शब्दहि बोलत नाहीं. ४

त्या शुक्तीपरि हींहि गायनें विचारलहरींवरतीं
हृदंतरांतुन महाकवीच्या उसळुनि वरतीं येती. ५

घे हातीं, कर कौतुक यांचें परि चित्तीं नच आणीं
या गीतांनीं कळलें कविचें अंतःकरण निदानीं. ६

# मी

मी न जगाचा, मी न कुणाचा, मी नच माझा माझा;
परी पसारा सगळा माझ्या विश्वीं मत्प्रेमाचा. १

मी स्वच्छंदी, पुरता छंदी, धारी मी न कुणास;
परी मोहिनी विविधरूपिणी सृष्टीचा मी दास. २

मी येथें, मी तेथें, जगतीं जरी पूर्ण भरलों मी;
प्रशांततेसह परंतु माझा वास सदाचा व्योमीं. ३

मी शूरांचें शौर्य संगरीं, मी योग्यांचें ध्यान
सृष्टीमध्यें स्वर्ग मीच, मी या विश्वाचा प्राण. ४

कल्पतरूंचीं फुलें तारका वेंचुन आणिन खालीं,
वाहिन मत्प्रिय वसुंधरेला नित्याची लाखोली. ५

जियें न कांहीं तेथुनि आणिन मूर्ती व्यक्तित्वाला
जादुगार मीं, हवें तसें या वाकवीन जगताला. ६

अधर युवतिचा कोमल, त्याहुनी कोमल सुमनें फार;
मी पुष्पासम, नव्हे नव्हे, हो, त्याहुनीही सुकुमार. ७

शून्याकारें, शून्याधारें शून्यवृत्तिनें चाले;
परी हांसतां मी या विश्वीं वस्तुजात हें डोले. ८

# धर्मवीर

आद्य ऋषींनीं जी केली
तेजाची पूजा पहिली,
ती करणें ज्यां ज्यां लोकां,
ते सारे सावध ऐका ! १

गर्जू द्या हिंदिस्तान
ऐकुनि हें माझें गान,
धर्मवीर हिंदिस्तान,
देवाचा कलिजा प्राण. २

बाळ तयाचे जे कोणी,
धर्मवीर हिंदिस्तानी,
ते सारे सावध ऐका,
सत्यधर्म कथितों लोकां– ३

ज्या तेजामध्यें भिनले
आद्य ऋषी जाउनि सगळे,
तेंच तेज हृदयीं भिनतां,
आद्य ऋषी बघतां बघतां– ४

अवतरुनी तुमच्या हृदयीं,
स्फूर्तिमंत्र गातिल कांहीं !
जडतेचें लागुनि भूत
सृष्टि करी हळहळ येथ. ५

उणीव तेजाचीच जगीं
भासतसे जागोजागीं.
क्षुद्र तुम्हीं बनलां कां रे !
मायेनें भुललां सारे ! ६

तेजाला अवमानुनियां
अंधारीं मरतां वाया.
मरणाचें काढुनि मरण
द्या मिळवा जीवंतपण ! ७

वाट करा तेजाला रे
फोडुनि हीं कारागारें
प्रकाश द्या सृष्टिला तो,
जो तुम्हांवरतीं येतो ! ८

धर्माचारांची माती
कां धरुनी बसलां हातीं ?
मातीवर चढतें कीट,
सत्य धरा ध्यानीं नीट ९

सत्य सदा निर्मळच तें,
आज उद्यां येथें तेथें.
रूढींचें चढलें कीट
धर्मावर, परजा नीट ! १०

आद्य ऋषींनीं जी केली
तेजाची पूजा पहिली,
ती करणें ज्यां ज्यां लोकां,
ते सारे सावध ऐका ! १

गर्जू द्या हिंदिस्तान
ऐकुनि हें माझें गान,
धर्मवीर हिंदिस्तान,
देवाचा कलिजा प्राण. २

बाळ तयाचे जे कोणी,
धर्मवीर हिंदिस्तानी,
ते सारे सावध ऐका,
सत्यधर्म कथितों लोकां– ३

ज्या तेजामध्यें भिनले
आद्य ऋषी जाउनि सगळे,
तेंच तेज हृदयीं भिनतां,
आद्य ऋषी बघतां बघतां– ४

अवतरुनी तुमच्या हृदयीं,
स्फूर्तिमंत्र गातिल कांहीं !
जडतेचें लागुनि भूत
सृष्टि करी हळहळ येथ. ५

उणीव तेजाचीच जगीं
भासतसे जागोजागीं.
क्षुद्र तुम्हीं बनलां कां रे !
मायेनें भुललां सारे ! ६

तेजाला अवमानुनियां
अंधारीं मरतां वाया.
मरणाचें काढुनि मरण
द्या मिळवा जीवंतपण ! ७

वाट करा तेजाला रे
फोडुनि हीं कारागारें
प्रकाश द्या सृष्टिला तो,
जो तुम्हांवरतीं येतो ! ८

धर्माचारांची माती
कां धरुनी बसलां हातीं ?
मातीवर चढतें कीट,
सत्य धरा ध्यानीं नीट ९

सत्य सदा निर्मळच तें,
आज उद्यां येथें तेथें.
रूढींचें चढलें कीट
धर्मावर, परजा नीट ! १०

सत्याची समशेर धरा,
असत्य सारें पार चिरा !
आद्यऋषींचा सद्धर्म
हेंच मात्र त्याचें वर्म— ११

सत्य प्रस्थापित व्हावें,
देहमनें जीवेंभावें.
जडतेची काढा कीट,
तेजाची उजळा वाट. १२

धर्मपताका घ्या हातीं,
उदार व्हा देहावरतीं ! [१]
अहंकार जिरला नाहीं,
मोह पुरा विरला नाहीं— १३

धर्माच्या वाफा नुसत्या
दवडितसां भलत्यासलत्या !
तोंडावर बसली माशी
शक्ति न ती उडवायासी ! १४

विषयांचा नयनीं धूर,
धर्म मात्र तुमचा थोर !
दिडकीला सतरा पापें,
धर्म धर्म म्हणणें सोपें ! १५

ब्रह्मचर्य तुमचें थोर,
चवदावे वर्षीं पोर !
देहाचे बनलां दास,
मायेचा बसला फांस, १६

स्वार्थानें वेडे झालां,
धर्माचा मुडदा केला !
धर्म नव्हे संध्यास्नान
धर्म नव्हे आसनध्यान; १७

तत्त्वज्ञानाचे बोल,
तें धर्मावरचें फोल !
अंतरंगीं तुमच्या वसतो,
आचरणीं तुमच्या दिसतो, १८

धर्म खरा तुमचा तोच,
वाकींचे शाब्दिक नाच !
वर्णाया सुंदर फार
धर्म नव्हे नाजुक नार. १९

जीवाचें द्यावें मोल,
धर्म तेधवां समजेल,
तोंवरि या वाफा सोडा,
धर्म म्हणा, छाती झोडा— २०

अध:पात टळणें नाहीं,
धर्म खरा कळणें नाहीं !
रूढि अशी कोणी दावा,
बदल[1] जिला नाहीं ठावा. २१

नामरूप बदलायाचें[2] !
चंचलता जगतीं नाचे[3] !
ही वरची[4] पोपटपंची,
अजुनि किती घोकायाची ? २२

आंत चला उघडा डोळे,
मोहाचे सोडा चाळे;
परात्परांची कांस धरा,
तेजाची समशेर करा ! २३

अंधकार तोडा मोडा,
धर्म खरा[5] पदरी जोडा
बाधक ते तोडुनि बंध,
सत्याचा मिळवा छंद २४

भिऊं नका कलिकाळाला;
धर्मवीर ! जय जय बोला !
अग्नीनें जळणें नाहीं.
शस्त्रानें तुटणें नाहीं; २५

पाण्यानें बुडणें नाहीं,
वाऱ्यानें उडणें नाहीं.
दिक्कालापरते तुम्ही,
विश्वाचे अवघ्यां स्वामी ! २६

धर्म तुम्हांसाठीं बनला,
धर्म तुम्हीं तुमचा केला.
सत्याला नांदायाला,
देव जगीं स्थापायाला; २७

तेज जनीं पसरायाला,
धर्म तुम्हीं तुमचा केला.
देवाला विसरुनि कां रे,
या पोकळ धर्माचारें २८

सत्याचा अपमान करा ?
अधःपात हा खराखुरा !
सत्य खरें मुरलें जेथें,
तेज खरें मुरलें जेथें २९

देव खरा विलसे जेथें,
धर्म खरा अमुचा तेथें.
सत्यासाठीं नित्य नवे
धर्मनियम आम्हांस हवे. ३०

तेजाचीं आम्ही बाळें
सत्यरूप आम्ही सगळे.
धर्मवीर हिंदिस्तान [1]
देवाचा कलिजा प्राण ! ३१

बाळ तयाचे जे कोणी
धर्मवीर हिंदिस्तानी,
स्वार्थाला देउनि लाथ,
तेजाचा धरुनी हात, ३२

खरे विरागी धीरवर,
गांभीर्याचे महीधर,
दिव्य चिंतनीं रमणार,
स्वयंपणें विश्वाकार. ३३

विश्वकुटुंबी विश्वधनी,
तेच खरे हिंदिस्तानी, [2]
धर्मवीर हिंदिस्तान,
देवाचा कलिजा प्राण ! ३४

सत्य बोल हे करा उठा—
धर्मवीर ! अद्वैत लुटा !
शुद्ध सत्य हृदयांत धरा,
तेजाचा उपदेश करा ! ३५

मायामय कारागारा,
तोडा मोडा पार करा !
आचारांची प्रौढि [1] नसे,
सत्य ठसावें करा असें. ३६

धर्मपताका घ्या हातीं,
व्हा केवळ तेजोमूर्ती.
व्हा सगळ्या विश्वा नेते, [2]
धर्मतत्त्व अमुचें हें तें. ३७

सत्यधर्म निरहंकार,
सर्वांचें समता सार;
सत्यधर्म जगतीं प्रेम
चोहिंकडे आत्माराम. ३८

स्वार्थाचा नुरला लेश,
देहाचा गळला पाश,
मरणाला आलें मरण,
सत्यधर्म जीवंतपण ! ३९

सत्यधर्म कळणें नाहीं,
जोंवर हीं जडता राही;
धर्माचें तोंवर सोंग,
जा मिरवा नुसतें ढोंग ! ४०

मेलेल्या सजवा रूढी,
गात बसा त्यांची प्रौढी !
शूद्रांचे सोसा शाप,
देशावर लादा पाप ! ४१

विधवांना रडतचि ठेवा,
धर्माच्या मिरवा नांवा !
कोणि असो कसली जात,
आम्ही तर पसरूं हात ! ४२

देशाचाही बंध नसे,
विश्व सर्व अमुचेंच असे,
चोहिंकडे आत्माराम,
सर्वांवर अमुचें प्रेम. ४३

खाणारे आम्ही मोतीं
राजहंस भूमीवरतीं,
आद्यऋर्षींनीं सांगितलें,
संतांनीं अमुच्या कथिलें, ४४

धर्मतत्त्व हें खरें खरें
आम्हांला कळलें सारें !
धर्मवीर भूमीवरतीं,
धर्मतत्त्व अमुच्या हातीं; ४५

देवाचे आम्ही प्राण,
आम्हांला भिवविल कोण ?
काळाचे आम्ही [1] काळ,
काळदिशा अमुचा खेळ ! ४६

तेजानें भरलीं अंगें !
नेउं जगा तेजामागें !
हिमगिरिचा काढा कांटा,
एकिकडे सागर लोटा; ४७

वाट करा आम्हांला रे.
कां मरतां व्यर्थचि सारे !
तेजाचे आम्ही दास,
सत्याची धरिली कांस; ४८

देवाला फिरवूं मागें,
दाखवितां कसलीं [2] सोंगें;
देहाची परवा नाहीं,
नांवाची परवा [3] नाहीं; ४९

धर्मवीर भूमीवरतीं,
त्या अमुची असली गीती ! ५०

वेडं भूत बनोनी जावें,
लिहिलें दैवीं काय असावें,
न कळे तोंड कुठें लपवावें,
कां छळतात--हे असे यमाचे दूत ? ६

धांव धांव सदया, जगजेठी !
दया करीं रे दीनावरतीं
आशा तुजवांचुनिया परती
नुरली कांहीं—जननी गे, धावुनि येई. ७

बोलवितात । त्रिकाळ यमाचे दूत,
गिरिशिखरावर आ पसरोनी,
काळ्या अंधारांत दडोनी,
किंवा पडक्या बुरुजावरुनी,
शब्द येतात । ' चल नको बसूं जगतांत. ' १

खोल खोल भेसुर दरडींत,
पडक्या घोर जुन्या विहिरींत
उगवुनि पिंपळ वर येतात
ते म्हणतात । ' चल जगांत दुसऱ्या शान्त. ' २

परिस्थितीचीं कठोर भूतें
क्षणांत करिती शून्य मनातें,
पूर्वस्मृति मग ताजी होते,
जळतें त्यांत । हृदयाचें होउनि भूत. ३

क्षणभर सांपडतां एकान्त
विचारलहरी उद्भवतात,
विझते प्रेमशांची ज्योत,
पेट घेतात--हे असंख्य वणवे आंत. ४

पुस्तक वाचायाला घ्यावें,
कवितेनें कीं मन रमवावें,
सृष्टीचें सौंदर्य बघावें,
हृदयीं तों तों । हा विकार दृढतर होतो. ५

वेडं भूत बनोनी जावें,
लिहिलें दैवीं काय असावें,
न कळे तोंड कुठें लपवावें,
कां छळतात--हे असे यमाचे दूत ? ६

धांव धांव सदया, जगजेठी !
दया करीं रे दीनावरतीं
आशा तुजवांचुनिया परती
नुरली कांहीं—जननी गे, धावुनि येई. ७

# दुबळें तारूं

कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ?
तुडुंब सागर भरला आहे,
दुष्ट काल झंझानिल वाहे.
तुफान तेणें खेळत राहे,
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? १

सुखदुःखाच्या लाटा येती,
क्षुब्ध समुद्रातें त्या करिती,
तेणें उपजे चित्तीं भीति
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? २

षड्रिपु जलचर पसरुनि जाळें
स्वैरगतीनें फिरती सगळे,
ओढुनि घेतिल नौका स्वबळें,
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? ३

मायावर्ती भ्रमेल का हें ?
भ्रमतां प्रलयीं बुडेल का हें ?
चित्ता चिंता जाळित आहे;
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? ४

पार पाहतां न दिसे कांहीं,
दुसरा त्राता कोणी नाहीं,
सदा भयाची जाचण हृदयीं,
कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? ५

नको नको हा प्रवास याचा!
अवधि नव्हे, दरबार यमाचा;
सोडुनि द्यावा पंथचि याचा,
कसें हाकारूं। शीडाविण दुबळें तारूं? ६

# आवाहन

श्रमलें दमलें वणवण फिरुनी गगनीं रविकरजाल;
शिणल्या सुंदर सांध्यदेविचें हो घर्मांकित भाल.
शिणले मारुत, खिन्न पयोधर दुर्धर साहुनि ताप
शून्य गिरिदरी, जर्जर निर्झर गळती आपोआप. १

उदासवाणें एकच गाणें शून्य मनें वनराई
घोळित राही, लागुनि तंद्रा शीण भरे तद्देहीं
शिणलें कोणी संसाराचा वाहुनि मायां भार,
अनंत चिंताकाहूरांनीं भरे कुणाचें ऊर. २

गायन गातां शिणली माता, शिणलें तान्हें बाळ,
शिणला पालख; मंद हालुनी घालविताहे काळ.
शिणली काया, शिणली माया, शिणले लोकाचार,
सौख्यहि शिणलें, दुःखहि शिणलें; शिणले तत्त्वविचार. ३

काळवंडल्या वातावरणीं ये करुणामय वाणी,
शीण पावली प्रीतिदेवता ब्रह्मांडाची राणी.
जगन्मोहिनी काव्यविणेचा मंद पडे रणकार,
ग्रहगोलांवर गंधर्वाचा एक जुळेना सूर. ४

पक्कपणाची पिवळी छाया सुंदरतेवर रांगे,
ब्रह्मांडाचीं शीण पावलीं, श्रमलीं, दमलीं अंगें.
ये, ये, ये जगदेकमाउली ! ये रजनी लवलाहीं,
सृष्टिदेवता नातरि बुडते भीषणतेच्या डोहीं. ५

तव अधरावर जन्म पावती नंदनवनिंचे वात,
नवजीवन ये उसळूनि तुझा वरती फिरतां[1] हात.
तुझिया स्पर्शें मृदु पल्लविता शांत लता ही घेई;
दिव्यदर्शनीं तुझ्याच जननी, फुलते सुंदरताही. ६

आद्यदेवते, रजनी, ये, ये निजले श्रीभगवान,
ब्रह्मांडाचा भार माउली तुजविण वाहिल कोण ?
प्रीतिदेविला नवसंजीवन कोण पुन्हां देईल ?
ग्रहगोलांना निज कक्षांतुनि कोण पुन्हां नेईल ? ७

ये ये रजनी, ये फिरफिरुनी, येशील न तूं जेव्हां
प्रळयकाळ या ब्रह्मांडाचा सत्वर होइल तेव्हां ! ८

# शुक्रोदय

सौंदर्यें शब्दातीत—स्वर्भूवर अवतरतात,
तेजाची फुटली पेठ—दिव्यत्वाची लयलूट,
कृष्णपक्षिची चंद्रकला—त्यावरतीं तरते विमला,
शांति दाटली निस्तुल ही—मंद कौमुदीसह[1] वाही. १

स्वर्गाच्या वरचें तेज— तारांगणिं भरलें आज,
त्यांतच तमही भासतसे— रजनीचे मधुमंत्र जसे;
निश्चिंतपणा अवनीला—निश्चिंतपणा गगनाला,
विश्वामधिं मिश्रित झाला—निःस्पंदपणा अवनीला. २

तेजतमांचें झुंज परी—अव्यक्त नभीं हास्य करी;
संधिकाल अत्युत्कट-तो—क्षितिजावर अस्फुट फुटतो!
अत्युत्कट सगळें कांहीं—नित्य नवी शोभा पाही;
सौंदर्यें वेडें झालें—तेजाची वारुणि प्यालें ३

दिव्याच्या मागुनि चाले—विश्व, खरे कळुनी आलें;
केंद्र तया सौंदर्यांचा—शुक्र नभीं उगवे साचा.
मुकुट कळ्यांचा दिव्य शिरीं—पीतांबर परिधान करी,
तेज विखुरलें चोहिंकडे—पुष्पांवर गगनीं उघडें. ४

मंगल मंगल गीत म्हणे—अस्फुट रजनी मूकपणे
बालसुधारक बालकरीं—बालशिरीं अभिषेक करी ५

३०

# अनंत

अनंत तारा नक्षत्रें हीं अनंत या गगनांत
अनंत दीसी, अनंत वसुधा, हे शशिसूर्य अनंत. १

वरतीं खालीं सर्व सांठलें वातावरण अनंत,
माप कशाचें, कुणा मोजितां, सर्व अनंत अनंत. २

कितेक मानव झटनी, करिती हाडाचेंही पाणी,
अनंत वसुधा आजवरी हो परी मोजिली कोणी ! ३

म्हणोत कोणी ' आम्हीं गणिला हा ग्रह, हाह हा तारा ',
परंतु सांगा कुणी मोजिला हा सगळाच पसारा ? ४

विशाल वरतीं गगन नव्हे, हें विश्वाचें कोठार,
उदात्ततेचा सागर हा चिच्छांतीचा विस्तार. ५

कुणीं मोजिला कुणास त्याची लांबीरुंदी ठावी ?
फार कशाला दिग्वनितांची तरी कुणीं सांगावी ? ६

अनंत सारें विश्व, जाहलें अनंतांत या लीन,
क्षुद्र मानवा, सांग कशाचा बाळगिसी अभिमान ? ७

तव वैभव हें; तुझीं धनें हीं, हे अत्युच्च महाल
जातिल का गगनास भेदुनी ? अनंत का होतील ? ८

तुझ्या कीर्तिचें माप गड्या का काळाला मोजील !
ज्ञान तुझें तूं म्हणशी ' जाइल ', कोठवरी जाईल ? ९

' मी ', ' माझे ' या वृथा कल्पना, तूं कोणाचा कोण ?
कितेक गेले मी मी म्हणतां या चक्रीं चिरडून. १०

# शारदीय सौंदर्यदेवता

प्रभातकालीं काव्यतारका सोज्वल गगनांत
उदयाचलिं परिधान करुनिया पीतांबर येत.
मुकुट कळ्यांचा शिरीं, उषेचें सिंहासन केलें,
हालवीत कचभार सृष्टिचें उत्थापन बोले. १

प्रसन्न पवनें जलद्जाल तें अपसारुनि नेलें,
तारामंडळ विश्वविभव हें आकाशी टेलें.
कणाकणांनीं शुद्धचेतना भरुनी अवकाश
सर्व धुवुनि हा निवळ साजिरा रंग भरे त्यास. २

पिकलीं शेतें मंद वायुनें आंदोलन घेतीं.
सौंदर्याच्या मूर्त देवता वनमाला होती.
निर्झरिणी या मुक्तमण्यांचें घेउनि भांडार
विमल सैकतामधुन हालतां चमचमती फार. ३

हा कुरणांचा थाट दाटला वर्णावा कोणी ?
शारदीय सौंदर्यदेवता अवतरली भुवनीं
आर्यभूमिच्या दिव्य पुरातन या देवी दोन
शरद्देवता, उषादेवता झाल्या अवतीर्ण ४

भूवरचा संसार दाविते सुफलित ही बाला;
तसा स्वर्गसंसार आमुचा दिव्य तिनें केला
एक गातसे मानवतेचें मधुमंगल गाणें;
देवपणाचे दिव्यमंत्र परि धरिले दुसरीनें ५

स्वर्गाच्या तेजोगर्भीं
बाळें तीं खेळत होतीं.
वत्सलता प्रभुरायाची
जोजवी तयां निजहातीं;
झुलवी त्यां पाळणियांत
छायामय मधु रजनी ती.
मोत्यांचें घालुनि पाणी
स्वर्गंगा त्यांना न्हाणी,
लडिवाळें बाळें तान्हीं,
देवाचीं आवडतीं तीं—कविबाळें खेळत होतीं ! १

बैसूनि सूर्यकिरणांत
सोन्याच्या कारंजांनीं
कधिं जलद्‌जाल खुलवावें
स्वर्गीय जादुनें त्यांनीं
कधिं चंद्रकला सजवावी,
ज्योत्स्नेचें जाल विणोनी.
शांतीचा करुनी पांवा
कधिं रात्रीं सूर धरावा,
नक्षत्रलोक डुलवावा,
सौंदर्यें उधळित होतीं—बाळें तीं खेळत होतीं ! २

एकदां सडा संध्येचा
शिंपुनी महोत्सव केला,

बनविलें बीन ओढोनी
कोंवळ्या सूर्यकिरणांला,
तें वाद्य वाजवायाला
बाळांचा मेळा आला;
ते सांध्यगिरी बहुवर्णी,
छायामय त्या निर्झरिणी
टाकिल्या क्षणीं व्यापोनी !
परिसाया देवहि येती—बाळें तीं खेळत होतीं ! ३

वाद्याचा ये झंकार
एकेक जसा उदयाला
एकेक सृष्टिचें फूल
लागे हो उमलायाला !
निःस्तब्ध मूक गगनाला,
निमिषांतच मोहर आला
आनंद गडे—आनंद,
गाण्याचा एकच छंद,
हो चोहिंकडे गोविंद,
ये रंगनाथ संगीतीं—बाळें तीं खेळत होतीं ! ४

परि आला तीव्र विषारी;
हा न कळे कुठचा वारा !
कंपित हो एकाएकीं
कां दिव्य देश हा सारा !
बाळांचे गळले हात,
बीनेच्या तुटल्या तारा !

ती स्वप्नसृष्टि जळाली,
गाण्याची तार गळाली,
काजळी चढे वरखालीं,
झाली हो माती माती ! बाळें तीं खेळत होतीं ! ५

त्या खोल भूमिगर्तेत
अंधार खळाळत होते;
मोहाचें जालिम वीष
बेभान करी सकळांतें;
वायूसह तीव्र विषारी
अंधुकता पसरित ये तें.
वाफारा तो लागोनी
तीं दिव्य बालकें तान्हीं
कळमळुनी पंचप्राणीं
कोसळुनी खालीं येती ! स्वर्गीय दिव्य बाळें तीं ! ६

कडकडला गगनीं तारा
ढांसळला, भूवर आला !
स्वर्गीय तेज मालवुनी
पाषाण क्षणार्धीं झाला !
हा प्रभाव या जगताचा
दोषावें यांत कुणाला ?
स्वर्गाचे ते शृंगार,
प्रेमाचे मौक्तिकहार,
गांठितां जडाचें दार
जडतेनें वेष्टित होतीं ! स्वर्गीय दिव्य बाळें तीं ! ७

काळाच्या आवर्तांत
भोंवंडुनि गिरके घ्यावे,
चांचपतां अंधारांत
ठेंचाळुनि विव्हल व्हावें.
जें जीवित या जगतीचें
तें त्यांस कसें मानावें ?
    जीवास आग लागोनी
    तळमळती माशावाणी,
    स्मरुनी ती पूर्वकहाणी
फोडितात टाहो चित्तीं–बाळें तीं खेळत होतीं ! ८

परि त्याच दीर्घ किंकाळ्या
ठरतात जगाचीं गाणीं !
निःश्वास आंत जे कढनी
तीं स्फूर्ति लोक हा मानी.
संतप्त अश्रुमालेला
गणितात कल्पनाश्रेणी !
    गौरवितें विश्व कवींना,
    जग सर्व डोलवी माना,
    परि मुग्ध मधुर आत्म्यांना
त्या काय बोंचतें चित्तीं ? बाळें तीं खेळत होतीं ! ९

## पद

हारवलें तें परकें झालें, मी शोधित फिरतों त्याला;
कुठें पाहिलें, कुठें लपालें, बोला हो कोणी बोला ॥ ध्रु० ॥
या देहाच्या जीर्णपंजरीं थांबवुनी या जीवाला
धरूं कोठवर?–त्याच्यासाठीं हा तर वेडावुनि गेला! १

नैराश्याला, या काळाला हाच भिववितो दक्पातें,
जगताचा तर छंद सोडिला कधींच याच्या चित्तें. २

बनला हा निःसंग पुरा. हा त्यासाठीं वेडा झाला;
कुठें पाहिलें कुणी तरी हो तें याचें सांगा याला, ३

नभाप्रमाणें जें सर्वांवर करिल छत्र हो तें याचें;
या जगतीं अत्युच्च उच्च जें, तें याचें हो, तें याचें, ४

भेदपंथ हे एक जाहले राज्य शांतिचें तें याचें;
तें याचें पद, जिथें दिसेना द्वेषाचें, औदास्याचें. ५

समानता सर्वत्र नांदली, प्रेमाचे फिरती वारे,
अखंड शुद्ध प्रेमच जेथें जीवन जीवाचें झालें. ६

जें याचें तें आणुनि देइल कोणी कां याचें याला!
कुठें पाहिलें, कुठें लपालें, बोला हो कोणी बोला! ७

प्रेमावांचुनि सर्व सुनें;
जग भासे बापुडवाणें,
मोठ्या उल्हासें म्हणुनी
प्रेमाचीं रचितों गाणीं.
आकाशीं तें
जगीं विलसतें,
दिशांत हंसतें;
विश्व वेष्टिलें प्रेमानें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें. १

संध्याराग म्हणो कोणी.
यातें मी अक्षय मानीं.
म्हणो कुणी ‘ ती भूल खरी ’
नाहीं मी म्हणणार परी
सौख्य मावळे;
दुःख कोसळे;
उदास सगळें;
प्रेम वाढतें परी दुणें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें. २

उचंबळे जें तुझे मनीं,
गुंग तुला टाकी करुनी,
तेंच खेळतें दिनरजनी
मित्रा, माझ्या नित्य मनीं.

त्याविण जगतीं
—दुःखें, खंती—
भरलीं भाती,
व्यर्थ त्याविणें हो जगणें;
प्रेमावांचुनि सर्व सुनें. ३

प्रेम कुठें? तें रानभर;
प्रेम खेळतें फुलांवर.
गातें मंजुळ तें गाणें
जगतीं साऱ्या दिनरजनीं!
कुणीं बांधिलें
कुणीं रोधिलें
नाहीं अडलें
तें फिरतें स्वच्छंदानें
प्रेमावांचुनि सर्व सुनें. ४

प्रेमावांचुनि रान घर,
जाच मना दे घोरतर!
प्रेम जिथें तें कांतार
उघडे स्वर्गाचें द्वार!
ये तर गगनीं
जगीं हिंडुनी
आणूं शोधुनि,
त्यास आळवूं ये गाणें,
प्रेमावांचुनि सर्व सुनें. ५

ब्रह्मांडावरि नित्य नूतन अशीं चित्रें सुरम्यें किती
पंखांहीं अपुल्या विशाल लिहितो हा काळ दिव्यकृती
संध्या आणि उषा, तसे रविशशी, नक्षत्र तारांगण
दिव्यें दाखवितो अनंत असलीं आम्हांस रात्रंदिन. १

त्यानें शांति नभीं गंभीर लिहिली आम्हां न ती लाभते;
दिव्य प्रीति तयें जगीं पसरिली, आम्हीं तियेचीं भुतें;
विश्वाच्या हृदयांतल्या निवडुनी स्वर्गीय भावांप्रती
चित्रें रंगविलीं तयें, न कळती हा हंत आम्हांस तीं ! २

" मातें स्वर्ग दुरावला " म्हणुनिया चित्तीं विचारि कुढे
त्रस्ता दीन वसुंधरा बघुनिया व्योमस्थ तेजाकडे;
" स्वर्गीचें सगळेंच गूढ वसलें काळाचिया लेखनीं "
बोले विश्वमुनी " कधीं तरि मला सांगेल कां तें कुणी ? " ३

काळाचीं जर हीं निगूढ लिखितें आम्हां कळालीं तरी
देवा रे ! वसुधा क्षणांत बनवूं प्रत्यक्ष स्वर्गापरी. ४

मेघाचें करिं भूर्जपत्र धरुनी अस्ताचलीं प्रत्यहीं
स्वर्गांचें नव लेख कुंकुमरसें ती सांध्यदेवी लिही;
रात्रीं शांत गभीर अंबुनिधिच्या आनील पृष्ठावरी
लज्जालेख लिही विकंपित करें ती तारकासुंदरी. १

श्यामा निर्झरिणी पुनःपुनरपी सारीत नीलांचला
मुग्धालेख सुरम्य सैकतिं लिही मंदोर्मिमालाकुला;
वेलींचे स्वकरें कराग्र धरुनी त्या मंदामंदानिलें
क्रीडालेख वनस्थलीहि लिहिती कांहींतरी आपुले. २

हे सारे मधुलेख घेउनि जगीं नाचोत वेडे कवी,
गावो गीतशतें तयास, मजही त्यांची कळे थोरवी,
लज्जामुग्ध परी शिरःकमल तें ठेवून माझ्या उरीं
श्वासांच्या कवनीं लिही प्रियतमा ही प्रेमलेखावली, ३

सारे ते मग लेख तुच्छ गमती चित्ताचिया लोचनीं,
तीचा अक्षय लेख एकच, उभा मी मग्न पारायणीं ! ४

## ३७ सौंदर्याचा अभ्यास कर !

गाणं हें रचिलें असें जुळवुनी कोठून कांहींतरी,
वाणी सत्य तुझी असेल भरली द्वेषानलानें जरी;
रम्याकार चमत्कृतिप्रचुर हें ब्रह्मांड नेत्रीं दिसे.
खेळे कांहिंतरीं तयांतुनि, मनीं गाणें तदा होतसे. १

सूर्याचीं किरणें सुनिर्मल तशा त्या तारकामालिका,
संध्येचे रमणीय रंग, उदयीं सृष्टी मनोहारिका,
वृक्ष श्यामल पुष्पसंकुल चलद्दूर्वादलाच्छादिता,
वाहे शांतपथा सुरम्य सरिता कल्लोलमालायुता; २

प्रेमाने अभिषिक्त चित्र मग त्या रामण्यविश्वीं दिसे;
चित्ताची रमणीयता उतरुनी संगीत होतें तसें
तें सौंदर्यच आणिलें जुळवुनी कोठून कांहींतरी.
तूंतें तें न दिसे म्हणून सखया अभ्यास याचा करी. ३

# काल आणि जीवित

गेले भंगुनि दुर्ग, दुर्गशिरिचीं गेलीं झरोनी शिरें;
गेले देश कितेक राख बनुनी संतप्त कालानलें.
होवोनी थरकांप, पेटुनि मनीं, ज्वालामुखें प्रत्यहीं
जें तें नश्वर ! हाय हाय ! म्हणुनी निश्वास टाकी मही ! १

भूमीचा वडिवार काय तरि या, तो विश्वसाक्षी वरी,
कालव्याधशरें प्रतापनिधिही घायाळ हो अंतरीं;
शुक्राच्या शशिच्या कला स्मरुनि हो स्वर्देवता सुंदरी
भीतिग्रस्त खगोल नेत्र करुनी दिङ्मूढ वेड्यापरी ! २

काळाचा घनघोर उग्र वणवा दुर्वार्य ऐसा जरी
ब्रह्मांडांत प्रतिक्षणीं भडकुनी अस्वस्थ चित्ता करी,
चित्ताच्या परि नंदनांतिल पहा एकेक माझ्या कळी
स्वानंदांत डुलोनियां प्रगटवी स्वामित्व कालानलीं ! ३

'जावो विश्व जळून जीवित तुझें कालस्थलाबाधित,'
प्रीतीनें मज हा धडा शिकविला, हो शांति हस्तंगत ! ४

# काळास

अंधकार मातला, वेष्टितसे भूतला,
शून्य मना खिन्नपणें सुखदायक जाहला.
झोंप न ये लोचनीं, शांतता न मन्मनीं,
दाहकता घोर भरे परि अंतरशोषिणी ! १

हा मारुत वाहतो, नेइल मज काय तो
काळ जिथें विगताचेंत विस्मरणीं नांदतो ?
तेजोमय चमकती दिव्य गोल हे किती !
त्यावरतीं असतिल किति देवलोक संप्रती ! २

मजलागीं बघूनियां येइल कां तयां दया ?
अमृतसेक करितिल शिरिं शांति मला द्यावया ?
सप्तलोक वेष्टुनी स्थिर बसली यामिनी,
देइल मज आणुनि ती शांतपणा कोठुनी ? ३

लपवूं दिग्वदनीं मुख होइल तरी मजला सुख ?
ये काळा, ध्यान तुझें मात्र मला लागलें !
मित्रपणा भेसुर हा काळकूट प्रेम महा !
मारिल मज म्हणुनि तुला बाहतसे बाळ हा ! ४

विस्मृतिमधिं बुडवि जीव, तव हृदयीं हृदय ठेव
तूं आतां आप्त—जगा संबंधचि संपला ! ५

४०

# दोष व प्रीति

दोष असती जगतांत किती याचें
नसे मजला सामर्थ्य गणायाचें;
दोष माझा परि हाच मला वाटे,
दोष बघतां सत्प्रेम कसें आटे ? १

दोष असती जगतांत—असायाचे;
मला त्यांशीं तरि काय करायाचें ?
प्रेमगंगेच्या शुद्धसिंचनेंही
शुद्ध होइ न जो, दोष असा नाहीं. २

गड्या पूर्णा ! मज आस तुझी नाहीं;
सख्या न्यूना ! ये मार मिठी देहीं,
प्रीति माझ्या हृदयांत करी वास.
न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास ! ३

या जगात पूर्ण असे काही नाही व कोणाच्याही ओंजळीत पूर्णत्व [illegible]

# जीर्णदुर्ग

'दुर्ग भयंकर जीर्ण पसरला पुढतीं', जो गतकालीं
शूर साहसी नरसिंहांनीं अपुली वसती केली,
कड्याकड्यामधिं घुमुनि नर्मदा गात यशोमय गीतें
सांगत होतीं सर्व देशभर सद्यःकर्तव्यातें. १

रंगमहालीं शेज फुलांची याच गडावर झाली,
स्वातंत्र्यास्तव अग्नि भडकला—राख तयाची केली.
तरवारीची धार देवता हीच जयांची एक,
ब्रीद जयाचें सदा तियेला रुधिराचा अभिषेक. २

जीव नव्हे संसार ओपिला स्वातंत्र्यास्तव ज्यांनीं.
त्या वीरांचा वास जाहला गतकालीं या स्थानीं.
आतां कोणी क्षुद्र पुजारी देविस पूजायातें
घालित बसतो कुंकुमपूरित चंदन अपुल्या हस्तें, ३

आणि पिवोनी भांग दुखारी झिंगत वदतो कांहीं
पूर्वकथा निर्विकार चित्तें. . .हर्षित दोन पयांहीं.
हे काळाचे खेळ, कुठेंही असेच चालायाचे,
त्यास कशाला परि आम्हांला कांहिं न वाटे त्याचें. ४

एक खुराडें–भाड्याचें तें–राहूं त्यांत खुशाल
क्षुद्र जिवांना आम्हां कशाला असले रंगमहाल ! ५

# तूं तर चाफेकळी !

" गर्द सभोंतीं रान साजणी तूं तर चाफेकळी !
काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं ? " १

ती वनमाला म्हणे " नृपाळा, हें तर माझें घर;
पाहत बसतें मी तर येथें जललहरी सुंदर,
हरिणी माझी, तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी गोड बोलते, तिजला माझा लळा.
घेउनि हातीं गोड तिला त्या कुरणावरतीं फिरे—
भाऊ माझा, मंजुळवाणें गाणें न कधीं विरे " २

" रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी ! तुला;
तूं वनराणी, दिसे न भुवनीं तुझिया रूपा तुला.
तव अधरावर मंजुळ गाणीं ठसलीं कसलीं तरी;
तव नयनीं या प्रेमदेवता धार विखारी भरी !
क्रीडांगण जणुं चंचल सुंदर भाल तुझें हें गडे,
भुरु भुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळे उडे.
अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालावरी;
भुललें तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरीं. " ३

सांज सकाळीं हिमवंतीचे सुंदर मोतीं घडे;
हात लावितां परि नरनाथा तें तर खालीं पडे.
ती वनबाला म्हणे नृपाळा " सुंदर मी हो खरी,— ४

अपूर्ण

# प्रीति हवी तर

प्रीति हवी तर जीव आधि कर अपुला कुरबान
प्रीति हवी तर तळहातावर घे कापुनि मान !
तलवारीची धार नागिणी लसलसती प्रीत,
याद ठेव अंगार जगाला लाविल निमिषांत ! १

प्रीति निर्मिली तुला वाटतें का दुबळ्यासाठीं ?
प्रीतिदेवि जगदेकवीर जो जाय तयापाठीं !
नव्हे प्रीतिला रंग लाविला लाल गुलाबांचा,
परि रुधिराचा, धडधडणाऱ्या जळत्या जीवांचा. २

गुल गुल बोले प्रीति काय ती ? काय महालांत ?
प्रीति बोलते काळ घालितां कलिजाला हात !
स्त्रैणपणाच्या चार भावना नच पचती ज्याला
हीन जिवानें घेउं नये त्या[1] हा जहरी प्याला ! ३

सह्य जिवाचा होय जाहला जरि विद्युत्पात,
परी प्रीतिचा घात भयंकर दुसरा कल्पांत !
जीवंतपणीं मरण घेउनी फिरणें जगतांत,
सांठविली ब्रह्मांडदाहिनी दाहकता यांत ! ४

थबथबली, ओथंबुनि खालीं आली,
जलदाली मज दिसली सायंकालीं.
रंगहि ते नच येती वर्णायातें!
सुंदरता मम त्यांची भुलवी चित्ता. १

व्योमपटीं जलदांची झाली दाटी;
कृष्ण कुणी काजळिच्या शिखरावाणी.
नील कुणी इन्द्रमण्याच्या कान्तिहुनी,
गोकर्णी मिश्र जांभळे तसे कुणी; २

तेजांत धूमाचे उठती झोत
चकमकती पांडुरही त्यापरिस किती!
जणुं ठेवी माल भरुनि वर्षादेवी
आणुनिया दिगंतराहुनि या ठाया! ३

कोठारी यावरला दिसतो न परी
पाहुनि तें मग मारुत शिरतो तेथें;
न्याहळुनी नाहिं बघत दुसरें कोणी
मग हातें अस्ताव्यस्त करी त्यातें
मधु मोतीं भूवरतीं भरभर ओती! ४

अपूर्ण

## उदासीनता

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला
काय बोंचतें तें समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला. १

येथें नाहीं तेथें नाहीं,
काय पाहिजे मिळवायाला ?
कुणीकडे हा झुकतो वारा ?
हांका मारी जीव कुणाला ? २

मुक्या मनाचे मुके बोल हे
घरें पाडिती पण हृदयाला.
तीव्र वेदना करिती, परि ती
दिव्य औषधी कसली त्याला ? ३

मनाला काही तरी हवे असते पण ते
न मिळाल्याने, मनाला उदासीनता येते
व [illegible] कळल्याने.

# निराशा

रात्र संपली, दिवसहि गेले,
अंधपणा ये फिरुनि धरेला,
खिन्न निराशा परि हृदयाला—या सोडित नाहीं. १

नित्यापरि रविकिरणें देती
रंग मनोहर सांध्यमुखीं तीं,
खळबळ ओढा गुंगत गीती—राईंतुनि वाहे. २

सुंदर सगळें, मोहक सगळें,
खिन्नपणा परि मनिंचा न गळे,
नुसती हुरहुर होय जिवाला—कां न कळे कांहीं ! ३

चंद्रबिंब धरि अभिनव कांती,
मेघ तयांनीं धवलित होती,
परि हृदयीं नैराश्यकालिमा—मम खंडत नाहीं ! ४

भोंवऱ्यांत जणुं पडलों कोठें,
स्वप्न भयंकर दिसतें वाटे,
जीवित केवळ करुणासंकुल—नैराश्यें होई ! ५

अपूर्ण

## ४७ पारवा

भिंत खचली, कलथून खांब गेला,
जुनी पडकी उद्‌ध्वस्त धर्मशाला;
तिच्या कौलारीं बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकांतगीत गातो. १

सूर्य मध्यान्हीं नभीं उभा राहे,
घार मंडळ त्याभंवतिं घालिताहे.
पक्षि पानांच्या शांत सांवल्यांत
सुखें साखरझोपेंत पेंगतात. २

तुला नाहीं परि हौस उडायाची,
गोड हिरव्या झुबक्यांत दडायाची.
उष्ण झळया बाहेर तापतात.
गीतनिद्रा तव आंत अखंडीत ३

चित्त किंवा तव कोंवळया विकारें
दुखतखुपतें कां सांग, सांग बा रे !
तुला कांहीं जगतांत नको मान !
गोड गावें मग भान हें कुठून ? ४

झोंप सौख्यानंदांत मानवाची
पुरी क्षणही कोठून टिकायाची ?
दुःखनिद्रें निद्रिस्त बुद्धराज
करुणगीतें घुमवीत जगीं आज. ५

दुःखनिद्रा ती आज तुला लागे;
तुझें जगही निद्रिस्त तुझ्या संगें.
फिरे माझ्या जगतांत उष्ण वारें,
तुला त्याचें भानही नसे बा रे ! ६

अपूर्ण

त्या उजाड माळावरती
बुरुजाच्या पडल्या भिंती;
ओसाड देवळापुढती
वडाचा पार–अंधार दाटला तेथ भरे भरपूर. १

ओढ्यांत भालु ओरडती,
वाऱ्यांत भुतें बडबडती,
डोहांत सांवल्या पडती
काळ्या शार–त्या गर्द जाळिमधिं रात देत हुंकार. २

भररानीं कोकस्थानीं
उठतात ज्वाळ भडकोनी.
असमान मिळालें धरणीं,
आर ना पार–अवकळा रात्रिचा प्रहर घुमे तो घोर. ३

## ४९ कवीची इच्छा

जगाचे बंध कोणाला ?–जगाला बांधला त्याला;
मला जो थांबवी ऐसा—जगीं निर्बंध ये कैसा ? १

जगानें देह हा केला—जगाला वाहिलें त्याला;
हाणा मारा खुडा तोडा—परी आतां मला सोडा. २

न कीर्तीला, न प्रेमाला—न सौख्याला, विलासाला,
न विघ्नाला न मृत्यूला—मला ये आडवायाला ! ३

वृथा या वाहणें चिंता—वृथा अश्रू, वृथा ममता;
वृथा निःश्वासमालाही—मला जी थांबवीना ही. ४

पुरे संबंध प्रेमाचा—नको हा खेळ प्रेमाचा
खरा जो प्रीतिचा प्याला—जगीं प्याला, सुखी झाला ५

अपूर्ण

## ( ताराराणी )

या शुभ्र विरल अभ्रांचें । शशिभंवतीं नर्तन चाले.
गंभीर धवळली रजनी । बेभान पवनही डोले;
तंद्रींतच अर्धीमुर्धी । लुकलुकते ताराराणी,
ये झुंजुमुंजु [१] तेजानें । पूर्वेवर पिवळें पाणी;
निस्पंद मंद घटिका ती । अंधुकता धुंद भरीत,
ब्रह्मांडमंदिरीं गाईशी सौभाग्य सुभग संगीत. १

निद्रिस्त नील वनमाला । निद्रिस्त सरोवर खालीं,
वर मूक मोहनें जैसीं । शशिकिरणें विरघळलेलीं;
इवलाच अधर हलवून । जल मंद सोडितें श्वास;
इवलाच वेल लववून । ये नीज पुन्हां पवनास.
निश्चिंत शांति-देवीचा । किंचितसा अंचल हाले;
रोमांच कपोलीं भरती । कुंजांत कोकिला बोले. २

घननील लतावल्यांत । हिमधवल शिलातलभागीं
चमकून मोहिनी झाली । जणुं कुंजगुंजनें जागी.
सौंदर्यभरीं भरलेलें । तारुण्य चढे रंगास,
अलवार कोंवळें अंग । जशि काय फुलांची मूस.
धरि आम्रमंजरी कानीं । हातांत जुईची वेणी,
कंठांत मालतीमाला । माधवीच भासे बाला. ३

मदनाची मंगलमाया । नटनाच करी हृदयांत;
स्फुरतात कल्पनातीत । रणकार सुखाचे त्यांत.

किति होत नाच नयनांचा । किति रंग मुखावर आले;
तें चित्र चोर चित्ताला । कितिदां तरी चुकवुनि गेले.
उत्कंठा धीर धरीना । लागला दुखाया ऊर;
तारुण्यतरल बालेच्या । चित्तांत भरे हुरहूर. ४

पायांत रुप्याचा तोडा । ये थबकत थोडा थोडा
युवराज विजयसिंहाचा । झाडींतुनि पिवळा घोडा.
शिरपेंच शिरावर साजे । पाठीवर लटके ढाल,
रूदार झगा जरतार । अंगावर हिरवी शाल;
उतरून विलासी वीर । चुंबुनी ती मोहनमाला
जणुं रम्य हृदय रमणीचें । हळुवार धरी हृदयाला,
उतरून वारुवरतून । सरदार शिपाई आले;
हळुवार हृदय रमणीचें । हृदयाशी संगत झालें; ५

अपूर्ण

## हृदयाची गुंतागुंत

हृदयाची गुंतागुंत कशी उकलावी ?
ही तीव्र वेदना मनामनाची ठावी,
अंधार दाटला अपार भरला पूर,
परि पार तयाच्या कोण मला नेणार ? १

हें ज्ञान मला तर अज्ञानापरि भासे,
मी सोडवितां तें उलटें बांधी फासे,
मन विटलें, विटली शब्दचिकित्सा सारी
मी फिरतां गरगर बुद्धि तयामाझारीं; २

सौंदर्य फुलांचें गाणीं वनविहगांचीं;
ती गोड शांतता हिरव्या वृक्षलतांची,
शीतलता सुंदर चंचल निर्झरिणींची,
गंभीरपणाची मूर्ती गिरिरायाची, ३

मज रुचे न किमपी व्यापकता गगनाची;
तीं अनंततेचीं किरणें ग्रहगोलांचीं,
ती अमर्यादता अचिंत्य गूढ दिशांची,
ही अगाधता कीं सर्वंकष कालाची ! ४

हें दिसून सर्वहि मज न दिसेसें होई,
समजून मनाला कांहीं उमगत नाहीं;
हे धर्म सांगती भिन्न भिन्न पथ कांहीं,
मम वृत्ति सांगती, भिन्न तुझा पथ पाहीं, ५

ही बुद्धि सांगतां मन ऐके ना तीतें,
हें चित्त वदे तें पटेच ना बुद्धीतें.
द्वैताची असली अक्षय झोंबी चाले,
सुखदुःखीं खातें चंचल चित्तहि झोले. ६

दुर्भाग्य दुबळा मनास दिसतें सारें,
परि चंचल चळतें चपळहि चित्त कसें रे।
मानवतो कवणां स्वार्थ, कुणा परमार्थ,
परि अर्थ दिसेना हाय मला उभयांत. ७

वैराग्य बरें कीं सुखद बरा अनुराग,
परि हाय प्रीतिचें उगाच माझें सोंग.
तें कर्म बरें कीं बरवा कर्मत्याग ?
दुर्दैव तसें, मज नव्हे त्याग ना भोग. ८

ती श्रद्धा बरवी अश्रद्धाहि बरी ती;
परि मानवते मज मधेंच भलती रीति.
व्यामोह भयंकर दुस्तर भरला भारी,
कीं जीव दडपतो मम निद्रेमाझारीं ! ९

मज व्यर्थ नको तीं अमरपणाचीं गाणीं;
कुणि उठवा असल्या गहनांतुनि हलवोनी.
तूं तुझाच कर उद्धार बोल हे कळती,
परि सहायार्थ या वृत्ति मनीं तळमळती. १०

हा हांक मारितो. उठवा मजला कोणी,
या वर निद्रेच्या दुस्तर गहनांतूनी
दिन पक्षमास ऋतु वर्ष भराभर गेले
हें रक्त जसेंच्या तसेंच सांकळलेलें— ११

अपूर्ण

फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा,
वरुनि कुणीं गुलजार फिरविला हात कुसुंब्याचा;
त्यांतहि हंसली मंदपणें ती चंद्रकला राणी;
कडेकडेच्या मेघांवर ये मोत्यांचें पाणी, १

इंद्रनिळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला,
मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोहनमाला;
चौंबाजूला थाट दाटला हा हिरवाळीचा,
सृष्टिसतीनें साज घेतला पाउसकाळींचा. २

यशस्विनी सौभाग्यदेवता माता जगताची;
घोर घनघटा भूलिंगाला प्रक्षाळुनि गेल्या— ३

अपूर्ण

५३

# औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासावळा झरा वाहतो बेटांबेटांतुन.
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढें. १

पायवाट पांढरी तयांतुनि अडवीतिडवी पडे;
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.
झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर;
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर. २

शून्य मनाच्या घुमटांत
कसलें तरि घुमतें गीत;
अर्थ कळेना कसलाही,
विश्रांती परि त्या नाहीं;
वारा वाही,
निर्झर गाई,
मर्मर होई.

परि त्यांचें भीषण भूत
घोंघावत फिरतें येथ.
दिव्यरूपिणी सृष्टि जरी
भीषण रूपा एथ धरी;
जग सगळें भीषण होतें
नांदाया मग ये येथें;
न कळे असला,
घुमट बनविला,
कुणीं कशाला ?-- २

ग्रंथ संग्रहालय
शाखा (स्थळ प्रत)

अव्यक्तांतिल दूरदूरच्या शांत गुहेंतून
दिव्ययोगिनी रजनी झाली गगनीं अवतीर्ण.
जगद्व्यापिनी काव्यकल्पना कविहृदयामधुनी
जेंविं अवतरे शब्दसृष्टिच्या मधु वातावरणीं-- १

दिशादिशांतुनि तेविं प्रगटली छायारूपानें
गभीर मूर्ती निशादेविची, कोण न हें जाणे ?
अर्पुनिया हें सुवर्णरंगीं सूर्यकमल पायीं
त्या भगवतिची करिते पूजा निसर्गदेवी ही. २

लाक्षारस चर्चिला, गुलालहि भरला भांगांत,
रम्य तारकाफुलें उधळलीं स्तुतिगीतें गात,
सप्तलोक दशदिशा अप्सरा सुर वदती सारे
' उदोउदो ! ' ब्रह्मांड दुमदुमे त्या जयजयकारें ! ३

अपूर्ण

# संशय

मृत्यू येइल जेधवां पसरुनी विक्राळ दाढा पुढें,
जेव्हां त्या बघुनी थरारुनि मनीं चैतन्य हो बापुडें,
जेव्हां बुद्धि (नुरे,[1] ) धृतीहि विधरे, श्रद्धा बिचारी मरे,
जेव्हां झापड येउनी जनिं मनीं अंधार सारा भरे— १

तेव्हां कोण करील सोबत मला हा प्रश्न चित्तांतरीं
मी पाहे पुसुनी पुनःपुनरपी, अंधार सारा परी!
स्वर्गाचीं रमणीय आजवरि जीं स्वप्नें मनीं पाहिलीं
प्रेमाचीं बरवीं हृदंगम अहा गाणीं किती गाइलीं! २

अज्ञानें परि बाहिलें निजमनीं ज्या ईश्वरालागुनी,
साह्या त्या समयास तो तरि अहो येईल का धांवुनी?
नाना प्रश्न असे उठून करिती जेव्हां मना व्याकुळ,
त्यांतें शांत करील अद्भुत असें आहें कुणा का बळ? ३

हे योगीशा, मोहमूढ मी नर दुर्बल दीन,
आनंदाच्या मागें वणवण दमलों भटकून, १

अपूर्णतेनें पूर्ण निराशा हृदयाची होते,
अमृत मुखाशीं नेतां नेतां विषमय हो येथें, २

आनंदाच्या भाराचेंही दुखावणारें चित्त,
दुःख बघुनि मग नवल न याचे तुकडे होतात, ३

खराखुरा आनंद असे, कीं सर्वच आभास ?
पडतें कोडें लागे वेढें चित्त रडायास ? ४

उदास जीवन कंठायातें मग कांहीं नाहीं
भूलभुलाई तत्त्वज्ञांची शोधुनिया पाहीं ५

# या कवितासंबंधी

## लेखक : कुसुमाग्रज

### १. आनंदी-आनंद

माणसाच्या परमोच्च आनंदाचे निधान मानवी व्यवहारात नसून निसर्ग-सौंदर्याच्या निरामय आविष्कारात आहे अशी बालकवींची श्रद्धा होती. या श्रद्धेचे दर्शन त्यांच्या ज्या अनेक कवितांतून होते, त्यांतील ही एक. या कवितेतुन प्रकट झालेली नैसर्गिक सौंदर्याची अनुभूती सूक्ष्म नसून स्थूल व सांकेतिक आहे. तरी देखील सहज, सुंदर आणि नादरम्य लेखनामुळे, बालगीताशी जवळीक असलेली एक मधुर आकर्षकता या कवितेला लाभलेली आहे.

आनंदी आनंद गडे
इकडे, तिकडे, चोहिंकडे

या पहिल्या दोन ओळींतील सहजोद्रेकच वाचकाला इतका नादावून टाकतो की पुढील कवितेमध्ये वारा वाहतो आहे, चांदणे फुलते आहे, पक्षी गात आहेत, इत्यादी सामान्य गोष्टीच आपल्याला सांगितल्या जात आहेत, याचे भानही त्याला उरत नाही. अखेरच्या कडव्यात कविता सृष्टीतून पार्थिव व्यवहाराच्या पातळीवर आली आहे. निसर्गातील आनंद निःस्वार्थतेतून उदयाला आलेला आहे. तेथील देण्याला घेण्याची अपेक्षा नसते, परस्परांविषयीचा मत्सर त्या ठिकाणी नसतो असे ती सांगते. बालसदृश तन्मयतेकडून प्रौढ विवेचनाकडे अकस्मात् वळलेला हा समारोप काहीसा कृत्रिम आणि अकारणही वाटतो.

### २. अरुण

अरुण ही बालकवींची खूप गाजलेली आणि रसिकांप्रमाणेच कवींनाही प्रिय झालेली कविता. गोविंदाग्रजांसारख्या समकालीन प्रतिभाशाली कवीलाही या कवितेने इतके मोहून टाकले की त्यांनाही स्वतःचा एक ‘ अरुण ’ लिहिल्यावाचून राहवले नाही.

या एका कवितेच्या प्रभावाने मराठीतील अनेक लहानथोर कवींनी अरुणावर आपल्या काव्याचे भलेबुरे अलंकार चढविले. या अरुणोपासनेची विडंबनात्मक परिणती पुढे केशवकुमारांच्या 'अरुणा' मध्ये झाली.

बालकवींच्या सर्वोत्तम कवितांत या कवितेची जमा होते याबद्दल दुमत होणार नाही. किंबहुना, बालकवींच्या प्रतिभेचा, काव्यवृत्तीचा व शब्दसामर्थ्याचा एकत्रित प्रत्यय आणून देणारी एकच कविता निवडायची झाल्यास 'अरुणा' चीच निवड करावी लागेल, असे म्हणावयास हरकत नाही 'फुलराणी-' संबंधी अलीकडे बरेच लिहिले गेले आहे. तीही बालकवींची एक सर्वांगसुंदर आणि प्रातिनिधिक कविता आहे, यात शंका नाही. परंतु निसर्गाच्या सदाशिवावर स्वतःला एखाद्या बिल्वपत्राप्रमाणे भिरकावून देण्याची बालकवींची जी वृत्ती आहे, सृष्टीतील सुंदरतेत गुरफटून जाणारी जी अपूर्व तन्मयता आहे, तिचे दर्शन 'फुलराणी' पेक्षा या कवितेत कितीतरी अधिक प्रमाणात व अधिक प्रभावाने होते ! येथे कवीची अलिप्तता अल्पांशानेही शिल्लक राहात नाही. काव्यांतर्गत अनुभवाच्या पाणलोटात तो पूर्णतः बुडून गेला आहे, वाहून जात आहे असे आपल्याला वाटते. चंद्रभागेच्या वाळवंटात बेहोष होऊन पांडुरंगाचे भजन करणारा वारकरी शेवटी स्वतःच पांडुरंग होतो, त्याप्रमाणे या कवितेत बालकवी हे कवी राहिलेले नाहीत. अरुणाने आकाशपृथ्वीवर बसविलेल्या रूपनगराचे ते एक रहिवासी झालेले आहेत. भक्तांची सर्वश्रेष्ठ अवस्था सायुज्यता ही त्यांना येथे प्राप्त झाल्यासारखी वाटते. त्यांच्या इतर अनेक चांगल्या कवितांतून ही सायुज्यता कमी अधिक प्रमाणात प्रकट झाली आहे. पण 'अरुण' मधील तिचे स्वरूप विशेष मनोहर आणि निरामय आहे. पृथ्वीच्या बाजारातील स्वार्थ, मत्सर, निराशा इत्यादी दुखण्यांना या आनंदोत्सवात प्रवेश करण्यास अवसर राहिलेला नाही. जमिनीवरच्या व्यथा जमिनीवर ठेवून कवीचे मन चंडोलाप्रमाणे त्या सौंदर्याकाशाकडे झेप घेते आणि अल्पावकाशात त्यात एकरूप होऊन जाते. हा कवी म्हणजे सृष्टि-सौंदर्याच्या पंढरीचा तुकाराम आहे हे आपल्या लक्षात येते.

या कवितेला तन्मयतेची एक चढती कमान आहे. प्रारंभीच्या दोन भागांत कवीची भूमिका फक्त स्तिमित झालेल्या प्रेक्षकाची आहे. प्राचीवर उसळलेल्या रंग-

समुद्राच्या तीरावर तो दूरस्थपणाने उभा आहे. आणि केवळ दृष्टीच्या साहाय्याने त्या आनंदाचा आस्वाद घेण्याचा तो प्रयत्न करीत आहे. म्हणूनच या दोन भागांमध्ये 'की–किंवा' च्या सूत्रात ओवलेल्या अनेक उत्प्रेक्षांची व रूपकांची माळ आपल्याला पाहावयास मिळते.

ही नवयुवती उषासुंदरी दारीं येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखते राजस हस्तांनीं ?
दिवसयामिनी परस्परांचें चुंबन घेतात
अनुरागाच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत.

यासारख्या काही उत्प्रेक्षा मनोहर आहेत हे खरे. पण हा सारा कल्पनाविलास म्हणजे पुढे येणाऱ्या प्रफुल्ल काव्याकडे जाण्याचा केवळ चंदनी दरवाजा आहे. तिसऱ्या भागात कवीची प्रेक्षकता संपते, दूरस्थता मावळते आणि समोर दिसणाऱ्या विशाल सौंदर्यालयात तो खास भक्ताच्या अधिकाराने प्रवेश करतो. तेथील नानाविध घडामोडीत तो सूत्रधाराप्रमाणे संचार करू लागतो. तेजोमय झालेल्या दिशा परस्परांशी काय कुजबुजतात याचा तो कानोसा घेतो, सुखाच्या कल्पनेने वेडावून स्तब्ध झालेल्या भूदेवीला जाग आणतो. आणि पर्वत, वनदेवी, वृक्ष, कोकिळ, भारद्वाज इत्यादिकांना आपापले काम करण्याची चेतना देतो. रूपकांच्या जाळीत अडकलेली कविता तिसऱ्या भागापासून अकस्मात् वेगाने वाहू लागते आणि अरुणाच्या आगमनाबरोबर दशदिशांत सुरू झालेल्या महोत्सवाचे रंगमय, स्वरमय, चित्र आपल्यासमोर उभे करते. किंबहुना कवीबरोबर आपणही त्या रूपनगरचे रहिवासी होतो. आपण कविता वाचीत नाही, कविता आपण जगू लागतो. कवितेच्या श्रेष्ठतेचा याहून अधिक चांगला निष्कर्ष संभवनीय नाही.

## ३. निर्झरास

बालकवींनी आपल्या मनामध्ये निसर्गसौंदर्याची जी स्वप्नसृष्टी बांधली आहे; तिच्यात प्रत्येकाकडे काही खास भूमिका सोपविण्यात आली आहे. तारका या प्रीतीची पाखरण करणाऱ्या आकाशकन्या आहेत, अरुण हा प्रकाशापेक्षा मांगल्याचे सारथ्य करणारा देवदूत आहे तर 'हरित तृणाच्या मखमालीवर' उमलणारे 'फूल

म्हणजे विवाहोत्सुक कुमारिका ' आहे. या स्वप्नसृष्टीतील निर्झराकडे कवीची भूमिका येणे अपरिहार्यच आहे. कारण तारकांजवळ, अरुणाजवळ वा फुलाजवळ नसलेला ' शब्द ' निर्झराजवळ आहे. त्याच्या दर्शनाला आणि गतीला स्वरांची साथ आहे. निर्झराच्या अन्य गुणविशेषांपेक्षा त्याचा हा स्वरच बालकवींना अधिक तीव्रतेने जाणवला आहे. म्हणून कवितेमध्ये निर्झराची विविध विलसिते व्यक्त होत असली तरी तिचा प्रारंभ या स्वराच्या निर्देशानेच होतो :

गिरिशिखरें, वनमालाही
दरीदरी घुमवित येई !

पुढील कवितेतदेखील निर्झराच्या स्वरावरतीच अधिक भर आहे. ज्या मार्गाने निर्झर वाहत आहे; तेथील सौंदर्यांनी आणि आकाशातून ओघळणाऱ्या दिव्यांनी निर्झराचे अंतःकरण संपन्न झाले आहे. आणि म्हणूनच त्याच्या शब्दातही व्यक्ताव्यक्ताला मुग्ध करण्याचे सामर्थ्य आले आहे. जीवनातील सुंदराची, मंगलाची ज्याला समज आहे, ज्याने आपल्या अंतरंगात ते रिचवून घेतले आहे असाच कवी श्रेष्ठ दर्जाचे काव्य गाऊ शकतो ही आपली आवडती कल्पना बालकवींनी या कवितेत मांडली आहे. अशा कवीच्या आणि काव्याच्या संदर्भात कवी जेव्हा आपणा स्वतःकडे पाहू लागतो तेव्हा त्याचे मन निराशेने काळवंडून जाते.

मी कवितेचा दास, मला
कवी बोलती जगांतला
परि न झरे माझ्या गानीं
दिव्यांची असली श्रेणी
जडतेला खिळुनी राही
हृदयबंध उकलत नाहीं !

' दिव्य रसात विरणारे जीवन ' आपल्याला लाभले नाही म्हणून काव्याच्या त्या आदर्शापर्यंत आपल्याला पोचता येत नाही असे त्यास वाटते आणि म्हणून तो अखेरीस निर्झराची विनवणी करतो :

शिकवी रे शिकवी मातें
दिव्य तुझीं असलीं गीतें.

दिव्य गायन करायला शिकव याचाच अर्थ, संसारातील अद्वैत जाणणारे, प्रेमसुंदरावर व निःस्वार्थावर उमललेले जीवन जगायला शिकव; कारण समृद्ध जीवनाचा स्वरही तितकाच समृद्ध असणार.

ही कविता, अखेरचा भाग सोडला तर, फारशी प्रत्ययकारी आहे असे म्हणता येणार नाही. ज्या कवितांनी बालकवींना समकालीनांत कीर्ती मिळवून दिली त्यांत या कवितेची गणना झालेली आहे. तेवढा काव्यगुण या कवितेत नक्कीच आहे. केशवसुतांच्या अशाच आशयाच्या 'भृंग' या कवितेपेक्षा 'निर्झर' कितीतरी अधिक आल्हाददायक आहे. पण तरीदेखील अरुण, तारकांचे गाणे, फुलराणी, इत्यादी कवितांच्या तुलनेने यातील काव्यात्मता कमी वाटते. सुरुवातीचा आणि शेवटचा भाग सोडल्यास इतर ठिकाणी 'हटातटा'चा वास येतो. कविता पुढे खेचली जात आहे असे वाटते. कोठलेही शब्दचित्र मनाची पकड घेत नाही, या बालकवींच्या शब्दांचा खास मोरपंखी स्पर्शही आपल्या रसिकतेला कोठे होत नाही तिसऱ्या कडव्यातील 'कृष्ण' कल्पनाही फारशी हृद्य वा समर्पक वाटत नाही. आत्माविष्काराकडे वळलेल्या शेवटच्या दोन कडव्यांनी मात्र कविता प्रत्ययाच्या पातळीवर चढविलेली आहे.

## ४. मधुयामिनी

चांदण्या रात्रीचे मंगलमोहन वर्णन करणारी ही कविता गीताच्या अथवा नाटकातील पदाच्या स्वरूपाकडे जाणारी आहे. शब्दयोजना मधुर व ओघवती असली तरी जाणीव होते ती फक्त शब्दांचीच. 'रामण्यका' सारख्या जड शब्दांनी हा ओघही अडखळल्यासारखा वाटतो. संस्कृतप्रचुर शैलीचा एक प्रयोग म्हणून या कवितेकडे पाहावयास हवे.

## ५. संध्यारजनी

'संध्यारजनी' ही 'अरुण'च्याच पंक्तीतील एक कविता आहे. 'अरुण' मध्ये उषःकालचे सौंदर्य शब्दांकित करण्याचा प्रयत्न आहे, तर या कवितेमध्ये रात्रीच्या

आगमनाचे. ‘ अस्तगिरीच्या अभिनव कुंजी ’—या सुंदर व चित्रात्म ओळीने कवितेचा प्रारंभ होतो. सुरुवातीच्या दोन पर्वात सूर्य आणि पश्चिम दिशा यांच्या प्रणयाचे वर्णन आहे. पुढील भागात तारकांच्या आगमनाचे. नंतर रात्रीच्या आणि अखेरीस चंद्राच्या प्रवेशाचे. आकाश हे ग्रहतारकांच्या परस्परप्रेमाचे क्रीडास्थान आहे ही बालकवींची खास आणि आवडती कल्पना या कवितेतही मुक्तपणाने प्रकट झाली आहे. सूर्य–पश्चिमेचा प्रणयविलास, चुम्बनामुळे आकाशात प्रकटणारा रंगकल्लोळ, तारकांचे लपत छपत येणे, रजनीचे प्रेमदान आणि चंद्राच्या रात्रीबरोबर आणि तारकांबरोबर होणाऱ्या क्रीडा ही सारी कवीची आवडती कल्पिते ‘ संध्यारजनी ’त प्रकटलेली आहेत सुंदर समर्पक शब्दांचा सरंजाम घेऊन. बालकवींच्या या घाटाच्या कविता स्वतंत्रपणाने वाचल्यास त्यातील सौन्दर्याचा पूर्ण आस्वाद घेता येतो. एकामागून एक अशा पद्धतीने वाचल्यास मात्र त्यांतील कल्पनांची पुनरुक्ती जाणवते आणि विशिष्ट कल्पनांच्या ध्यासाने निसर्गासंबंधीचे आपले स्वप्नविश्व कवीने मर्यादित केले आहे हे लक्षात येते.

कदाचित वर उल्लेखिलेल्या कारणामुळेच असेल, पण अरुणातील ताजेपणा, टवटवीतपणा या कवितेत जाणवत नाही, आविर्भाव तितकाच किंबहुना अधिक प्रसन्न असूनही. ‘ अरुणा ’तील काव्यानुभव प्रेक्षकांच्या भूमिकेने सुरू होतो आणि भक्ताच्या भूमिकेत त्याची परिणती होते. या कवितेची रचना वेगळ्या प्रकारची आहे. काही मधली पर्वे वगळता, वेगवेगळी स्वतंत्र चित्रे येथे एकत्रित केल्यासारखी वाटतात, त्यामुळे काव्यप्रवाह खंडित झाल्याप्रमाणे वाटतो. असे असले तरी बालकवींच्या उत्तम कवितांपैकी ही एक कविता आहे यात संशय नाही.

## ६. फुलराणी

बालकवी हे निसर्गाचे कवी मानले जातात आणि तसे ते आहेतही. कोणत्याही कवीवर विशिष्ट विषयाचा छाप मारणे फारसे समंजसपणाचे नसते. सामान्यतः सर्वच चांगले कवी जीवनाच्या विविध अंगांचे आपल्या प्रतिभेने टिपण करीत असतात. अनुभवाच्या एकाच दालनात ते आपल्याला कोंडून घेतात असे सहसा होत नाही. निसर्गाव्यतिरिक्त इतर अनेक विषयांवर बालकवींनी कविता – आणि चांगल्या

कविता – लिहिल्या आहेत आणि तरीसुद्धा बालकवींना निसर्गाचे कवी म्हणण्यामध्ये काही चूक नाही. एखाद्या रागामध्ये एखाद्या स्वराचाच प्राधान्याने आविष्कार व्हावा, इतर स्वरांची आवर्तने त्या स्वराच्या सभोवारच पिंगा घालीत राहावीत, त्याप्रमाणे बालकवींच्या काव्यात निसर्गाची जाणीव सर्वव्यापक आणि सर्वस्पर्शी आहे. बालकवींचे एकूण जीवन दुःखमय होते, असे त्यांच्या चरित्रावरून आणि कवितेवरूनही दिसते. यामुळे असा एक कयास बांधण्यास येतो की जे जीवनात नव्हते ते निसर्गात शोधायचा त्यांनी प्रयत्न केला. सृष्टिसौंदर्य ही त्यांच्या आंतरिक सांत्वनाची जागा होती. पण, हे म्हणणे सर्वस्वी खरे नव्हे. निसर्गातील शिवसुन्दराचा शोध बालकवींची मूळ प्रवृत्ती दिसते. या शिवसुन्दराचा आढळ सभोवारच्या संसारात न झाल्याने त्यांचे मन व्यथित झाले हे अधिक संभवनीय वाटते. बालकवींच्या निसर्गकवितांबाबत आणखी एक मुद्दा महत्त्वाचा आहे. बालकवींनी एखाद्या विशिष्ट स्थळावर, नदीवर, पर्वतावर वा फुलावर कविता लिहिली नाही. निसर्गाच्या विशिष्ट आविष्कारापेक्षा वा दर्शनापेक्षा त्यातील सौंदर्याचे मूलभूत तत्त्वच त्यांना आकर्षित करीत होते आणि म्हणून त्यांचा निसर्ग कोणत्याही एका दृश्याशी, स्थळाशी वा वस्तूशी बांधलेला नाही. निसर्गातील शिव-सुन्दराच्या आधाराने त्यांनी एक खास स्वतःची वेगळी अशी निसर्गसृष्टी निर्माण केली आणि तिच्यातच ते रममाण झाले. म्हणून ‘ अरुणा ’ तला अरुण कोणत्या ऋतूतला अथवा ‘ फुलराणी ’ तील फूल कोणत्या झाडाचे, हे प्रश्न अस्थानी ठरतात. हा अरुण कवीच्या मनात उगवलेला आहे आणि हे फूलही त्याच्या मनात फुललेले आहे.

बालकवींना ‘ बालकवी ’ हे नाव त्यांनी कुमारवयात कविता लिहिल्या म्हणून मिळाले. पण आयुष्यभर टिकलेले हे नाव कवीच्या वृत्तीचेही यथार्थ दर्शन घडविणारे होते. ‘प्रौढत्वा निज शैशवास जपणे बाणा कवींचा असे ’ हे केशवसुतांचे वचन मराठीत तरी बालकवींइतके कोणी खरे करून दाखविलेले नाही. विशेषतः निसर्गाकडे जाताना बालकवी आपल्या शैशवालाच सांगाती म्हणून घेऊन जातात. म्हणूनच त्यांच्या अशा कवितेत अकलंकित मांगल्याचा, सौंदर्याचा ध्यास, कहाणी–लोककथेतील अद्‌भुत वातावरण व लोकगीतांच्या-जवळपास जाणारी नितळ भाषा, यांचा आढळ होतो.

शैशवाला ज्यांची धास्ती वाटते अशा निसर्गाच्या रौद्र आविष्कारांची त्यांनी फारशी दखल घेतली नाही हेही लक्षात घ्यायला हवे. ' फुलराणी ' ही त्यांच्या शैशवभूमिकेतून निर्माण झालेली एक सर्वांगसुन्दर कविता. कोवळया उन्हात चमचमणाऱ्या पाचूच्या झुमक्यासारखी हिरवा गर्द ताजेपणा, कथाकहाणीतील अद्‌भुताचा गोडवा आणि प्रभावी चित्रात्मकता या गुणांच्या मिलाफामुळे या कवितेला विलक्षण माधुर्य प्राप्त झाले आहे.

### ७. मंगलमय प्रेमकवन

प्रेमाच्या साक्षात्काराने होणारी अंतःकरणाची बेभान अवस्था ही या छोटया कवितेचा विषय आहे. या उन्मनावस्थेत प्रेमाशिवाय दुसऱ्या कोणत्याच गोष्टीची जाणीव शिल्लक राहात नाही. सृष्टी, स्वर्ग, प्रकाश, अंधार ही सर्व नाहीशी होतात आणि स्वप्न-जागृतीच्या सरहद्दीवर वावरणारी कवीची प्रेमभावना गीतरूप धारण करते. शब्द येतात, सूर येतात आणि त्यांच्या मागोमाग अस्तंगत झालेल्या अन्य जाणीवाही येतात, भावरूप काव्याला शब्दाकार लाभतो.

ही कविता म्हणजे काव्यविषयक सिद्धातांचे निवेदन नव्हे. परंतु कविता कशी लिहिली जाते हे समजावून घेण्याचा हा काव्यमय प्रयत्न आहे.

### ८. तारकांचे गाणे

सृष्टीच्या विविध व्यवहारांवर मानवी जगातील निरागस, आनंदमय क्रीडांचा आरोप करणे हे बालकवींच्या कवितेचे एक वैशिष्ट्य आहे. या वैशिष्टयाचा परमोत्कर्ष ' फुलराणी ' त जसा दिसतो तसा या कवितेत दिसत नाही. तरीसुद्धा बालकवींच्या चांगल्या कवितांत सहजतेने स्थान मिळावे इतके सौंदर्य या कवितेत आहे.

सुरुवातीच्या ' कुणी नाहीं ग कुणी नाहीं–' इ. ओळीतील लज्जेचा आणि क्रीडेचा आविर्भावच इतका नाजूक आणि मनोज्ञ आहे की तारकांचा प्रवेश केवळ आकाशात नव्हे तर आपल्या मनातही होतो. ढगांच्या लताकुंजातून लपतछपत पुढे येणाऱ्या या आकाशयुवतींच्या नूपुरांचा चोरटा आवाजही आपल्या कानांवर येतो. आपल्याला कोणी पाहात नाही असे त्या मानीत असतात. पण आपण मात्र त्यांना पाहात असतो आणि

एका सुंदर कुतूहलाने आपले मन भरून जाते. आकाशाच्या अर्धप्रकाशित एकांतात चोरून लपून प्रवेश करणाऱ्या या छबेल्या परस्परांशी काय बोलतात हे ऐकण्यासाठी आपले श्रवण अधीरून जाते. आणि पुढे आपल्याला जे ऐकू येते तेही तितकेच सुंदर, तितकेच मधुरतेने ओथंबलेले. सृष्टीच्या आणि माणसांच्या व्यवहारात प्रेमानंदाचा फुलोरा फुलविण्यासाठी या आकाशकन्या अवतरलेल्या असतात. या व्यापक प्रेमाच्या कक्षेत वात्सल्य आहे, प्रणय आहे आणि महात्म्याच्या अंतरंगातील उदात्त स्वप्नेही आहेत.

जीवनाच्या वाहत्या प्रवाहात या विशाल प्रेमाचे चांदणे मिसळून देण्याचा त्यांचा इरादा आहे आणि हे काम त्यांना ' नामानिराळे ' राहून करावयाचे आहे.

या कवितेचा प्रारंभ, वरती म्हटल्याप्रमाणे, फार परिणामकारक आहे. सुरांच्या शोधात वेळ न घालविता, एखाद्या गवयाने सप्तसुरांचा सुरेल पखा उघडूनच गायनाला सुरुवात करावी, तसे येथे वाटते. कवितेच्या दाराशी नव्हे, तर अंतरंगातच या ओळी आपल्याला घेऊन जातात.

चित्रात्मकता हा याही कवितेचा एक आकर्षक विशेष आहे. पहिले आणि शेवटचे कडवे सोडल्यास इतर प्रत्येक कडवे आपल्या मनोदृष्टीसमोर एकेक चित्र उभे करते. ' फुलराणी 'प्रमाणे ही कविताही शैशवाच्या सीमेला स्पर्श करणारी आहे.

## ९. संध्यातारक :

सायंकाळच्या धूसर प्रकाशात पश्चिमेच्या क्षितिजावर एका ताऱ्याचे दर्शन होते. हा तारा म्हणजे शुक्र असावा. शुक्र सूर्यास्तानंतर उगवतो आणि घटकाभराने मावळतो. या ताऱ्यावर केलेला हा कल्पनाविलास.

सुरुवातीच्या दोन कडव्यांत संध्यातारकाचे बालरूपातील दर्शन आपल्याला होते. पुढील सर्व कविता रात्रीच्या वत्सलतेकडे व तिने गायिलेल्या अंगाईकडे वळली आहे. हा वात्सल्याचा आविष्कार फारसा मनोरम वाटत नाही.

## १०. श्रावणमास

बालकवींची वृत्तयोजना अत्यंत समर्पक असते. तारकांचे गाणे वा आनंदीआनंद या कवितांना ' बालानंद ' या नाचऱ्या त्रोटक वृत्ताशिवाय इतर कोणतेही वृत्त साजले

नसते. फुलराणी कटावात आणि अरुण ही कविता चंद्रकांतात सहजतेने फुलून येते. निर्झराच्या अस्खलित प्रवाहाला बालानंद हेच वाहते वृत्त घेतले; पण प्रवाहास व्यत्यय आणणारा त्रुटित ओळींचा अंतरा काढून टाकण्यात आला आहे. 'श्रावणमासा'साठी कवीने फटक्याची योजना केली तीही अशीच विषयानुकूल आहे. फटका ही जाती प्रदीर्घ प्रवाहाची, ठसठशीत यतिस्थानांची, आणि वाचकाच्या मनाभोवती सहजतेने वेढा घालीत जाणारी आहे. श्रावणकालाचा विशाल चित्रपट काव्यात चितारण्यासाठी असेच वृत्त आवश्यक होते. एखाद्या त्रोटक आणि खेळकर वा दीर्घ आणि गंभीर अशा वृत्ताने या विषयाला योग्य साथ दिली नसती. अर्थात ही वृत्तयोजना कवी विचारपूर्वक निवड करून करतात असे मानण्याचे कारण नाही. कवीच्या मनातील विशिष्ट विषयाची अनुभूतीच आपल्या शब्दांची त्याचप्रमाणे आपल्या वृत्ताचीही निवड करते. आशय, आकार एकजीव होऊनच लेखनात प्रवेश करतात. असा हा सुसंवाद जेथे साधत नाही तेथे कवितेत उणेपणा निर्माण होतो. आकारातील सुसंवाद हे बालकवींच्या सर्वच चांगल्या कवितांचे एक प्रभावी गुणांग आहे.

श्रावणमास नादयुक्त आहे; त्याचप्रमाणे चित्रयुक्तही आहे मोजक्या शब्दांत रेखाटलेली एक चित्रमालिकाच आपल्या दृष्टीसमोरून उलगडत जाते.

क्षणांत येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे.
झालासा सूर्यास्त वाटतो, साज अहाहा तो उघडे
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळें पिवळें ऊन पडे
फडफड करुनी भिजले अपुले पंख पाखरें सावरती,

सृष्टीतील वर्णनांनी सुरू झालेली ही कविता, आकाश, पक्षी, हरीण, अशा क्रमाने माणसापर्यंत येऊन पोचते. देवदर्शनास निघालेल्या ललनेच्या मुखावर श्रावणाचे सारे मांगल्य गीतासारखे फुललेले असते; ही कल्पना हृद्य आणि कवितेला कळसासारखी शोभणारी आहे.

## ११. फुलपाखरू–फुलवेली

नुसत्या गोड शब्दांच्या संग्रहाने चांगली कविता सिद्ध होत नाही याचे हे एक प्रात्यक्षिक. कवीच्या काही आवडत्या कल्पनांभोवती या कवितेची उभारणी झालेली

असली तरी विस्कळीतपणा, सूत्रहीनता व गोंधळ यामुळे कोणतेही प्रभावी चित्र ती मनावर उमटवू शकत नाही.

## १२. बालविहग

सृष्टिसौंदर्याची गीते गाताना बालकवी सामान्यतः जमिनीवरचे आपले जीवन आणि त्यातील दुखणी–खुपणी विसरतात. बालविहग ही कविता याला एक अपवाद आहे. सायंकाळच्या आकाशात भरारी मारणाऱ्या ' सृष्टीदेवीच्या सगुण बाळा ' कडे पाहून कवीला आपल्या बंधनांची, अशांतीची व अपूर्णतेची दुःखदायक जाणीव होते. ' बालविहग ' हा काव्यप्रतिभेचे प्रतीक होतो आणि आपले सहप्रवासी सुंदर सुंदर कविता लिहीत असताना आपण मात्र काव्यापासून दूर जात आहोत याची खंत कवीच्या मनात उत्पन्न होते. अखेरी, आपली अपूर्ण आकांक्षा इतरांच्या ठिकाणी पूर्ण झालेली पाहण्यातही एक आनंद असतो हे सांत्वन त्याला दिलासा देते. बाह्यसृष्टीतील एक दर्शन आणि आंतरिक भावना यांच्यातील सांधा या कवितेत उत्तम रीतीने जुळला आहे.

नायकाच्या प्रवेशासाठी रंगभूमीवर प्रसंगानुकूल असा पडदा सोडावा, त्याप्रमाणे ' बालविहगा ' च्या आगमनासाठी एक सुंदर चित्र अगोदर आकारित होते. या चित्रातील सारे तत्त्व आत्मसात केल्याप्रमाणे हे चिमुकले पाखरू आकाशात संचार करू लागते. पर्वतशिखराच्या फुलासारखे ते सायंकालीन वाऱ्यावर लहरू लागते. हा ' सुंदरतेचा जलसा ' पाहून सारा निसर्ग तल्लीन होतो. पार्श्वभूमीची दोन-तीन मनोहर चित्रे आपल्या दृष्टीसमोरून पुन्हा सरकतात आणि नंतर पाखराला अनुसरणारे कवीचे शब्द आपल्याला ऐकू येतात.

अरुण, संध्यारजनीप्रमाणेच या कवितेचा प्रारंभ शैशवाच्या भूमिकेवरून होतो. परंतु पुढे मात्र ती कवीच्या प्रौढ मनातील अपूर्ण आकांक्षांकडे, दुःखांकडे वळते. या दोन्ही अवस्थांची सुखदुःखे समर्पक शब्दांत व्यक्त करणारी ही कविता अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. कवितेतील–

> सुंदरतेच्या सुमनावरचें दव चुंबुनि घ्यावें
> चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावें

हे संस्मरणीय शब्द मनामध्ये सदैव रेंगाळत राहतात.

## १३. तडाग असतो तर

रात्रीच्या वेळी आकाशात प्रकट होणारे शांत सौंदर्याचे भांडार आपण आपल्या अंतःकरणात सामावून घेऊ शकत नाही, त्यासाठी आपण एखादे सरोवर असतो तर बरे झाले असते, असे कवीच्या मनात येते. सरोवराला सर्व आकाश प्रतिबिंबरूपाने आपल्या अंतःकरणात धारण करता येते. त्यातील सुंदरता आणि त्यातील शांतताही.

' तुडुंब भरलीं गगनात ' या शब्दांनी निशाकालीन शांतीच्या अपारतेचे यथार्थ आकलन आपल्याला होते. ' तडाग असतो तर '– या कडव्यातील खंतही प्रत्ययकारी वाटते कविता खरोखर येथेच संपते. पुढील स्पष्टीकरणाची दोन कडवी अनावश्यक व अस्थानी वाटतात.

पाटणकरांच्या आवृत्तीत ती कंसात दिलेली आहेत. कवींनी ती कदाचित गाळलेली असावीत.

## १४. तृणपुष्प, आनंदी पक्षी

या दोन्ही कविता सुबोध परंतु सामान्यतेच्या पातळीवर राहणाऱ्या आहेत. तृणपुष्प आणि पक्षी ही दोन्ही निरागस, अक्षय आनंदाची प्रतीके आहेत. हा आनंद आपल्या जीवनात अवतीर्ण व्हावा ही कवीची इच्छा आहे.

## १६. सुकलेलीं फुलें

शैशववृत्ती हे बालकवींच्या काव्याचे आणि पर्यायाने जीवनाचेही प्राणतत्त्व असल्याने बाल्याचा लोप म्हणजे त्यांच्या दृष्टीने सर्वस्वाचा लोप होता. हे बाल्य वयापेक्षा मनाचे अधिक समजायला हवे. सुकलेले फूल हे गतशैशवाचे प्रतीक म्हणून येते. पण तेही पुन्हा प्रतीक आहे, नव्हाळीच्या वयात अंतःकरणात उमललेल्या मधुर, निर्मळ भावनांचे, ' स्मरणाच्या थडग्यात ' विलीन झालेली ही ' कल्पतरूंची फुले ' पुन्हा आपल्याला लाभावीत म्हणजेच शैशवाच्या आनंदमय वृत्तींचा पुन्हा आपल्याला लाभ व्हावा, ही कवीची इच्छा आहे.

सत्त्वविशिष्ट प्रेमावरती
स्वर्गाची जर आहे वसती–

सात्त्विक प्रेमावरती आधारलेला स्वर्ग बालवृत्तीचा हात धरूनच पृथ्वीवर उतरतो. कृष्णाने बालपणीच मुरलीचा स्वरविलास करून संसारात दिव्य आनंद निर्माण केला ही सुंदर कल्पना या संदर्भात येते. तशा मुरलीचा कवीला ध्यास लागला आहे.

प्रौढावस्थेशी बालकवींचे फारसे सूत जमले नाही. या बाबतीत केशवसुतांशी असलेला त्यांचा विरोध लक्षात घेण्यासारखा आहे. अशाच प्रकारची भावना केशवसुतांनी ‘ पुष्पाप्रत ’ मध्ये व्यक्त केली आहे. पण केशवसुतांमध्ये बालवृत्ती प्रारंभीच्या काव्यातही दिसत नाही. त्यांची सारी कविता प्रौढावस्थेची, प्रौढावस्थेतील तात्त्विक वृत्तीची द्योतक आहे. प्रौढ, विकसित मनाला जाणवणारी सर्व सुखदुःखे त्यांनी आपल्या कवितेत कवळण्याचा प्रयत्न केला आहे. बालकवींना मात्र प्रौढावस्थेने वेदनेशिवाय दुसरे काहीच दिलेले नाही. त्यांच्या काव्याचा व जीवनाचाही सर्वोत्तम काळ शैशवाच्या सीमेवरच बसलेला होता. हा काळ ओसरल्यावर त्यांची जीवनयात्राही समाप्त झाली; हा योगही लक्षात घेण्यासारखा आहे. बालकवींची ही एक दुर्लक्षित पण चांगली कविता.

## १७. पारवा

बालकवींच्या उत्कृष्ट कवितांत जमा होणारी ही कविता कवीची वेगळी शैली आणि वेगळी वृत्ती दर्शविणारी आहे. प्रौढावस्थेची एक यातना ग्रथित करणाऱ्या या काव्याची शैली इतर निसर्गगीतांप्रमाणे गोड वा मार्दवशील नाही. ती अधिक प्रौढ आणि कणखर आहे. वृत्तही भावनेला अनुकूल असे आहे.

दिवसारात्रीचे चोवीस तास काटेरी झुडुपात बसून अविरत आक्रंदन करणारा हा पक्षी कोणता, असा प्रश्न विचारण्यात अर्थ नाही. तो कवीच्या अंतःकरणातच बसलेला आहे.

कवितेच्या शेवटच्या ओळी वाचकाच्या काळजाला पीळ पाडणाऱ्या आहेत. अशांत, दुःखी जीवाला मरणावाचून दुसरा सोयरा नाही, अंताची घटका म्हणजे

त्याच्या दृष्टीने भाग्याची घटका–हे शब्द नियतीने ऐकले होते का ?

## १८. अप्सरांचें गाणें

सुमनांच्या रसगंगेत नाहणाऱ्या आणि भृंगावर बसणाऱ्या 'अप्सरा' म्हणजे छोट्या वनदेवी किंवा पऱ्या समजायला हव्यात.

## १९ ते २३. कवि आणि कविता या संबंधीच्या कविता

केशवसुतांप्रमाणे बालकवींनीही कवी व काव्य यासंबंधी बरेच लिहिले आहे. परंतु त्यांची काव्यविषयक भूमिका केशवसुतांपेक्षा रे. टिळकांच्या भूमिकेशी अधिक जुळणारी आहे. या दोन्ही भूमिकांत काही साम्य आहे. कवी हा जीवनातील सुंदरतेचा निर्माता आणि रक्षक आहे, पृथ्वीला स्वर्गता देणारा आहे, शुद्ध प्रेमाचा प्रेषित आहे इत्यादी विचार दोहींतही समान आहेत.

हा भूस अर्पितो सदैव सुख मानवी
(कवी)

× × ×

ग्रहगोलांवरुनि तुवां मंगलता मूर्त आणली खाली.
(शारदेस)

अशा आशयाचे विचार केशवसुतांतही आढळतात. पण केशवसुतांनी आपल्या सौंदर्य-कल्पनेची कक्षा खूप व्यापक केली आहे. भोवतालच्या जीवनातील अन्याय, अज्ञान आणि पारंपरिकता ही त्यांना अतिशय कुरूप, बीभत्स वाटतात. सृष्टीतील सुंदरापेक्षा मानवी जीवनातील सुंदराची (आणि म्हणून असुंदराची) जाण त्यांना अधिक आहे. म्हणूनच त्यांनी तुतारी, नवा शिपाईसारखी तेजोगर्भ काव्ये लिहिली आणि 'पद्यपंक्तीच्या तरफेने' 'जग उलथून देण्याची' आकांक्षा दर्शविली. केशवसुतांचा हा रुद्र आवेश, शब्दांतून निखारे फुलविण्याची त्यांची ताकद, बालकवींच्या काव्यविषयक कवितांतून दिसू नये यात नवल नाही. या गोष्टींची बालकवींना जाणीव नव्हती असे नाही (धर्मवीर). परंतु यांच्याविरुद्ध आपल्याला वा आपल्या कवितेला लढायचे आहे ही प्रतिज्ञा त्यांच्या ठिकाणी नव्हती. अरुण-फुलराणीच्या कोमल विश्वात गुंतलेल्या त्यांच्या कविवृत्तीला हे

कलह, हे झगडे नकोसे, अप्रिय होते. आणि म्हणून टिळकांप्रमाणेच त्यांनीही कवीच्या सौंदर्यसाधनेवर व प्रेमावर विशेष भर दिला आहे. या पाच कवितांतून हीच भावना कमी-अधिक प्रमाणात व्यक्त झाली आहे. ' अंतरंगा 'त प्रकट झालेल्या काव्यापेक्षा कवीच्या अंतःकरणातील काव्य फार मोठे असते हा एक वेगळा विचार एका रूपकाच्या साहाय्याने मांडण्यात आला आहे.

## २४. मी

' मी शूरांचे शौर्य संगरीं ' इ. ओळी गीतेतील तत्सम शब्दांची आठवण करून देणाऱ्या आहेत. परंतु आत्म्याची ' सर्वभूताशयता ' सांगणे हा कवितेचा उद्देश नव्हे. ही कवीची वा कलावंताची सर्वात्मकता आहे. कलावंतांच्या कलेने सर्व सृष्टी साकार, सुंदर आणि प्रेममय होते, शून्यमय विश्वाला संपन्नता प्राप्त होते. केशवसुतांची ' आम्ही कोण ' ही कविता या संदर्भात वाचावी.

## २५. धर्मवीर

' धर्मवीर ' वर बरीच चर्चा झाली आहे. बहुतांशी प्रतिकूल. ' तुतारी 'च्या अनुकरणाने लिहिलेली ही कविता बालकवींच्या कोमल प्रकृतीला झेपलेली नाही. त्यांच्या वृत्तीशी सुसंवादी असा हा विषय नसल्याने कविता फसली आहे, असा या टीकेचा मथितार्थ. बालकवींच्या काळात पुण्याला ' तुतारी मंडळ ' स्थापन झाले होते. गडकऱ्यांप्रमाणे बालकवीही या मंडळाचे सभासद झाले होते. हे सर्व कवी केशवसुतांच्या काव्याचे अनन्यभक्त होते. त्यातही ' तुतारी ' मधील सुधारणावादाच्या ओजस्वी आविष्काराने ते विशेष भारावलेले होते. म्हणून या कवींच्या काव्यात तुतारीची अनेक अनुकरणे झाली. त्यातील ' धर्मवीर ' हे एक. ( दुसरे गडकऱ्यांचा ' दसरा ' )

पूर्वी अन्यत्र म्हटल्याप्रमाणे शैशववृत्ती हे बालकवींच्या काव्याचे प्राणतत्त्व आहे. ' धर्मवीर 'चा विषय केवळ सौंदर्याच्या नव्हे तर विचाराच्या अनुभवाचा आहे. वाढलेल्या वयात बालकवींना या गोष्टी कळत नव्हत्या, सभोवारच्या समाज-जीवनातील अनिष्टांची त्यांना समज नव्हती असे मानणे खुळेपणाचे आहे. ' धर्मवीरा 'तील भावना

खोटी वा कृत्रिम नाही. भावना खरी व प्रामाणिक आहे यात शंका नाही. परंतु कोणतेही काव्य चांगले होण्यासाठी केवळ ' कळणे ' पुरेसे नसते. केशवसुत–गोविंदाग्रजांना निसर्ग-सौंदर्य कळत नव्हते असे नाही. तरीही त्याचा त्यांच्या लेखनातील आविष्कार प्रभावी वाटत नाही. कवीला अनेक गोष्टी कळतात, परंतु त्यांतील काही गोष्टी अधिक कळतात, किंबहुना त्या कळण्याचे जळण्यात, ध्यासात रूपांतर होते. हे अनुभव केवळ समजुतीच्या पातळीवर राहात नाहीत, तर ते भावनेच्या आणि प्रक्षोभाच्या परिघात जातात. असे झाले म्हणजेच चांगली, प्रत्ययकारी कविता लिहिली जाते. ' तुतारी 'च्या तुलनेने ' धर्मवीर ' ही कविता, फिक्की वाटते याचे कारण तिच्यातील समज वा प्रामाणिकता कमी आहे हे नसून प्रक्षोभक भावनेच्या पातळीपर्यंत ती पोचलेली नाही हे आहे.

टिळकांप्रमाणेच बालकवींनी ' हिंदिस्तान ' हा शब्द हेतुपुरस्सर वापरलेला आहे. बालकवी टिळकांच्या आणि मिशनरी लोकांच्या सहवासात असल्याने भारताच्या सर्व-धर्मसमावेशक स्वरूपाचे त्यांना विशेष महत्त्व वाटत होते. असे असले तरी हिंदू धर्माशी संबंधित अशा आद्य ऋषी, अद्वैत, संत, इत्यादी गोष्टींचा उल्लेख लक्षात घेण्यासारखा आहे. धर्माच्या ' सोंगा ' वरती कवीने हल्ला चढविलेला असला तरी ' धर्मपताका घ्या हाती ' असा संदेशही त्याने दिला आहे. नीती ही धर्माहून अधिक श्रेष्ठ आहे हा केशवसुती विचार सांगण्याचे धाडस येथे दिसत नाही.

## २६. यमाचे दूत

मृत्यूची जाणीव बालकवींच्या मनात सतत उभी असे. कोणत्याही मंत्राने न हटणाऱ्या एखाद्या पिशाच्चासारखी. केव्हा ही जाणीव दिलासा देते, तर केव्हा छळते. ' पाखरास ' मध्ये या जाणीवेतून मिळणारा दिलासा दिसतो तर प्रस्तुत कवितेत तिचा छळ व्यक्त झाला आहे. पहिल्या दोन कडव्यांतील वातावरण यथायोग्य असून पुढील भागातही या विकाराची ' दृढता ' प्रभावीपणाने प्रकट झाली आहे.

## २७. दुबळे तारू

संसाराच्या क्षुब्ध समुद्रात माणसांचे जीवन म्हणजे शीड नसलेल्या नौकेसारखे. भावशील माणसाला जाणवणारी ही अगतिकता या कवितेत सागराच्या रूपकाधारे

सांगण्यात आली आहे. षड्रिपू, मायावर्ती इ. कल्पनांनी या अगतिकतेला मायावादाकडे नेल्यासारखे वाटते. ते खटकल्याशिवाय राहात नाही.

## २८–२९ आवाहन; शुक्रोदय

'आवाहना' त रजनीला आवाहन केलेले आहे. रात्र येण्याच्या अगोदर सर्व चराचर विश्वात साचलेला शीण समर्थ शब्दांत वर्णन करण्यात आला आहे.

जगन्मोहिनी काव्यविणेचा मंदपणे झणकार
ग्रहगोलांवर गंधर्वांचा एक जुळेना सूर

अशा अनेक सुंदर ओळी कवितेत आहेत. तरी देखील ही कविता अरुण, संध्यारजनीप्रमाणे अंतःकरणाला भिडत नाही. 'शुक्रोदया' तील प्रत्ययही फार मर्यादित आहे.

## ३०–३१. अनंत; शारदीय सौंदर्यदेवता

'अनंता' मधील भावना भारतीय तत्त्वज्ञानातील मिथ्यावादाचे सरळ, साधे दर्शन घडविणारी आहे. या विचारात आणि म्हणून कवितेतही फारसे वेगळेपण आढळत नाही.

'शारदीय सौंदर्यदेवते' तील निसर्गवर्णनही चांगल्या शब्दांत गुंफलेले असले तरी उत्कटतेचा प्रत्यय आणून देण्यास समर्थ वाटत नाही.

## ३२. कवि-बाळ

कवी हे मूळचे स्वर्गलोकचे रहिवासी. ईश्वराच्या सान्निध्यात आणि आनंदमय वातावरणात बालरूपाने तेथे खेळत होते. सूर्यकिरण, मेघ, चंद्र यांच्याबरोबर नानाप्रकारच्या क्रीडा करण्यात ते दंग होते. त्यांच्या गायनवादनाचा जलसा एकदा रंगात आला असता, खाली असलेल्या पृथ्वीवरून विषारी वाफारे उठले आणि ती 'स्वर्गीय' बाळे पृथ्वीच्या मातीमध्ये कोसळून पडली. स्वर्गाचे आनंदयात्रिक पृथ्वीवरच्या अनंत दुःखांचे आणि बंधनांचे बळी झाले. उल्केचे तेज जमिनीवर पडल्यावर विझून जाते, ती पाषाणरूप होते. तसेच या कविबाळांचे झाले.

जीवास आग लागोनी
तळमळता माशावाणी

अशी त्यांची अगतिक अवस्था झाली. हे दुःख असह्य होऊन आणि पूर्वजीवनातील स्वर्ग आठवून कविजनांनी जे आक्रंदन केले, या आक्रंदनालाच जगामध्ये ' काव्य ' मानले जाते.

गौरविते विश्व कवींना
जग सर्व डोलवी माना
परि मुग्ध मधुर आत्म्यांना
त्या काय बोचते चित्तीं—

हे काव्याचा आस्वाद घेणाऱ्या रसिकांना समजत नाही. हा या कवितेचा आशय.

या कवितेचे दोन पाठ प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांतील फरक फार थोडा आहे. सुधारलेल्या पाठास कविबाळे असे शीर्षक देऊन विषय अधिक स्पष्ट करण्यात आला आहे. कवी हे स्वर्गीय, निष्कलंक, आणि बंधनातील प्रेमानंदाचे उद्गाते आणि उपासक असतात. ऐहिक जीवनात त्यांच्या या वृत्तींचा कोंडमारा होतो. त्यांच्या आंतरिक व्यथा व आकांक्षा गीतरूपाने व्यक्त होतात. योग्य वातावरण निर्माण करणाऱ्या कल्पकतेच्या साहाय्याने हा विचार प्रस्तुत कवितेत मांडलेला आहे. स्वर्ग आणि पृथ्वी या दोहींची चित्रे प्रभावी आहेत. कवितेतील विचार ' विचार ' म्हणून सर्वांना पटेलच असे नाही. परंतु बालकवींची काव्यविषयक भूमिका ध्यानात घेता त्यांच्या बाबतीत तो स्वाभाविक वाटतो. बालकवींच्या चांगल्या कवितांत ही कविता गणली जावी.

## ३३. ध्येय

बालकवींच्या मनाची जीवनाच्या उद्दिष्टासाठी, ते शोधून काढण्यासाठी होणारी तगमग या कवितेत व्यक्त झाली आहे एवढेच तिचे वैशिष्टय. जगापासून दूर जाणाऱ्या निःसंगपणाचा आविर्भाव असला तरी ज्या अत्युच्चाची आकांक्षा आहे तेही या जगातीलच आहे. कवितेला पद म्हटले आहे. तेव्हा ती एखाद्या रागदारी चालीवर रचलेली असावी. जाती ' फटक्या ' ची आहे.

## ३४. प्रेमाचे गाणे

प्रेमाची महती गाणारे हे सूक्त आहे. प्रासादिक भाषेत लिहिलेले. ' प्रेमावाचुनि सर्व सुनें, जग भासे बापुडवाणें ' या सहजस्फूर्त ओळींनी कवितेची सुरुवात होते. प्रेम सायंकालीन रंगांसारखे क्षणजीवी नाही, सर्व सुखदु:खांत ते अक्षय राहते, असे सांगून कवी आपल्या आवडत्या कल्पनेकडे वळतो. प्रेमाचा आदर्श रानात व फुलांत असल्याचे सांगतो. ही कविता कोणा तरी मित्राला उद्देशून व प्रतिवाद करण्याच्या उद्देशाने लिहिल्यासारखी वाटते.

## ३५–३६. काळाचे लेख; प्रेमलेख

ही दोन सुनीते आहेत. सुनीताचा रचनाप्रकार इंग्रजीतून मराठीमध्ये आला. तो रूढ करण्याचे श्रेय केशवसुतांकडे आहे. मराठीत मान्यता पावलेले सुनीत शार्दुल-विक्रीडितातील चौदा ओळींचे असते. बारा ओळींतील प्रवाहाला अखेरच्या दोन ओळींत काही कलाटणी दिलेली असते हा त्याचा विशेष.

' काळाचे लेख ' या सुनीतातील कल्पना नेहमीचीच ( बालकवींच्या संदर्भात ) आहे. पृथ्वीवर स्वर्ग अवतरण्यासाठी, काळाने आकाशावर लिहिलेल्या नक्षत्रादिक लेखांचे रहस्य माणसांनी समजून घ्यायला हवे हा विचार त्यात सांगण्यात आला आहे. ' प्रेमलेख ' हे सुनीत अधिक आल्हाददायक आणि अधिक चांगले लिहिलेले आहे. यातही आकाश, समुद्र इत्यादिकांवर लिहिल्या जाणाऱ्या दिव्य लेखांचा संदर्भ आहे. ' परंतु प्रियतमा माझ्या छातीवरील डोके ठेवून आपल्या श्वासांनी जे प्रेमलेख लिहीत त्यांच्यापुढे ते सर्व ( निसर्गातील ) लेख मला तुच्छ वाटतात ' अशी कलाटणी शेवटी दिलेली आहे. बालकवींची अपार निसर्गभक्ती लक्षात घेता ही कविता आपल्या वेगळे-पणाने विशेष उठून दिसते. कवितेची भाषाही सुनीतास योग्य अशी प्रौढगंभीर आहे.

## ३७. सौंदर्याचा अभ्यास कर !

ही कविता कोणा टीकाकारास उद्देशून लिहिली असावी असे दिसते. पहिल्या दोन ओळी त्याच्या टीकेला उद्देशून असून बाकी कवितेत त्याला उत्तर देण्यात आले आहे.

स्त्रीच्या विविध विलासांचे चित्रच माझ्या काव्यात उमटले आहे म्हणून ते समजून घ्यायचे असेल तर त्या सौंदर्याचा अभ्यास कर, अशा आशयाचे हे उत्तर आहे. टीका-काराला उद्देशून बालकवींनी ही एकच कविता लिहिलेली आहे.

## ३८–३९. काल आणि जीवित; काळास

काळाला उद्देशून लिहिलेल्या या दोन कविता भिन्न आशय व्यक्त करतात. ‘ काल आणि जीवित ’ या सुनीतात, सर्व जगाचा संहार करणाऱ्या काळावर फक्त प्रीती मात करू शकते असे म्हटलेले आहे. काळाच्या सर्वंकष विध्वंसाने भयाकुल झालेल्या मनाला प्रीतीच्या या सामर्थ्याने शांतता दिली. प्रीती काळावर मात करते याचा अर्थ, तिच्या उत्कट अवस्थेत स्थलकालाचा विचार शिल्लक राहात नाही, असाच घ्यायला हवा. या आशयात फारसे वेगळेपण नसले तरी त्याचा अविर्भाव चांगला झालेला आहे.

‘ काळास ’ मध्ये जीवनातील व्यापातापांनी जखमी झालेल्या जीवाला शांती देणारा काळ हा एकच आप्त आहे असे सांगितले आहे. ही कल्पना अन्यत्र अधिक प्रभावी रीतीने व्यक्त झाली आहे. सांसारिक व्यवहारात कवीचे मन किती खिन्न होते, हे ही कविता दर्शविते.

## ४०. दोष व प्रीती

या छोट्याशा कवितेतील शेवटच्या चार ओळी फार हृद्य आहेत. पूर्णता जगात कोठेच आढळत नाही. परंतु अपूर्णाला पूर्णता देण्याची शक्ती प्रेमाच्या ठिकाणी असते. म्हणून कवी न्यूनाचेही आवाहन करतो आणि त्याला सांगतो,

प्रीति माझ्या हृदयांत करी वास
न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास.

## ४१. जीर्ण दुर्ग

अखेरच्या भागात उपरोधाची धार असलेली ही एक वेगळी वैशिष्ट्यपूर्ण कविता. ऐहिक ऐश्वर्याची आणि स्वातंत्र्यनिष्ठेची साक्ष देणारे जीर्णावशेष आम्हां । स्फूर्ती देण्याऐवजी फक्त ‘ धंदा ’ देतात. आमच्या क्षुद्रतेच्या पातळीवर आम्ही या भव्य अव-

शेपांना कसे ओढतो याचे विदारक दर्शन ही कविता घडविते. कवितेचे दोन्ही भाग ( दुर्ग आणि पुजारी यांचे वर्णन करणारे ) फार परिणामकारक आहेत.

## ४२. तूं तर चाफेकळी !

बालकवींच्या काव्यभांडारातील हे एक मनोहर रत्न आहे. कविता अपूर्ण असली तरी ही अपूर्णता तिच्या रसास्वादाला बाधक होत नाही. कोठल्यातरी संकल्पित कथा-काव्याचा हा छोटा तुकडा आहे असे वाटते. जंगलात वनविहारासाठी गेलेला एक शंतनूसारखा राजा, त्याला मत्स्यगंधेसारखी एक ' वनबाला ' भेटते. तिच्या लावण्याने तो मुग्ध होतो व तिच्यावरती प्रेम करू लागतो. त्या दोघांतील त्रोटक संवाद या कवितेत आपल्याला वाचावयास मिळतो.

भावनेतील कोमलता, वर्णनातील चित्रात्मकता, शब्दांचे मार्दव आणि संवादा-तील निरागस मोकळेपणा या गुणांच्या मिलाफामुळे या कवितेत एक अपूर्व गोडी निर्माण झाली आहे.

पहिल्या काव्यात यमुनेचा उल्लेख आला आहे, परंतु या कवितेच्या बाबतीत स्थलकालाचा शोध अनावश्यक आहे. काल कल्पनेतला आणि स्थलही कल्पनेतले. वास्तवापासून दूरवर असलेल्या देशातील हा वृत्तांत म्हणूनच—

> क्रीडांगण जणु चंचल सुंदर भाल तुझें हें गडें
> भुरुभुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे—

अशा मधुर शब्दांत राजा वनमालेचे वर्णन करतो आणि लगेच ' ये चल माझ्या घरीं ' असे मोकळे अनाच्छादित आवाहन तिला करतो. वनबालेने दिलेले उत्तर अपूर्ण आहे. तरीही त्या अर्ध्या उत्तरातील ' दवाचे थेंब झाडाच्या पानांवर सुंदर दिसतात; पण त्यांना कोणाचे हात लागताच ते विस्कटून जातात, ' ही कल्पना रम्य आहे.

स्त्रीपुरुषप्रेमासंबंधी बालकवींनी थोड्याच कविता लिहिल्या आहेत. त्या कवितांतच नव्हे तर मराठीतील सर्वोत्कृष्ट प्रेमगीतांत या कवितेची गणना होऊ शकेल.

## ४३. प्रीति हवी तर

बालकवींनी प्रेमासंबंधी लिहिलेल्या थोड्या कवितांतील ही एक कविता. केशवसुतांच्या काळापासून प्रेमाकडे पाहण्याचा एक नवा व वेगळा दृष्टिकोन अस्तित्वात आला. शरीराच्या पलीकडे जाणारे आणि आत्मिक एकतेवर भर देणारे हे 'दिव्य' प्रेम होते. या प्रेमाच्या व्यवहारात समर्पण आणि निष्ठा यांच्याइतकेच बलिदानालाही महत्त्व होते. किंबहुना ज्योतीवर जळणारा पतंग हा या प्रेमाचे सर्वोत्कृष्ट स्वरूप दर्शवीत होता. या प्रेमाची महती केशवसुतांनी अनेक ठिकाणी गाइली आहे. परंतु तिचा अतिशय काव्यात्म व रम्य आविष्कार झाला आहे तो गडकऱ्यांच्या 'प्रेम आणि मरण' या कवितेमध्ये. बालकवींच्या प्रस्तुत कवितेतही बलिदानाच्या कल्पनेवरच अधिक भर आहे. 'विजेचा आघात सहन करणाऱ्यालासुद्धा प्रीतीचा घात सहन करणे कठीण आहे.' प्रीती सफल झाली तर काय होईल याचे वर्णन कवींनी केलेले नाही. दिव्य प्रीतीच्या साक्षात्कारासाठी आणि प्रसंगी सफलतेसाठी केवढी मानसिक तयारी असावी लागते हे कवितेने सांगितले आहे.

## ४४. पाऊस

वर्षादेवीने विविध रंगांच्या मेघांचे भांडारे जमविले. त्यावरती कोणीही संरक्षक नाही असे पाहून वारा त्या ठिकाणी जातो व सर्व मेघ हातांनी अस्ताव्यस्त करतो. त्यामुळे जमिनीवर मोत्यांचा पाऊस पडतो.

बालकवींच्या चांगल्या निसर्गकाव्यातील सौंदर्याचा आत्मप्रत्यय या कवितेत फारसा जाणवत नाही. तरी कल्पकतेमुळे ती वाचनीय वाटते.

## ४५–४६. उदासीनता; निराशा

मनाला अकारण (निदान, कारण न कळणाऱ्या) ग्रासणाऱ्या निराशेची वेदना या दोन कवितांत व्यक्त झाली आहे.

'उदासीनता' मध्ये मनाला काहीतरी न समजणारे असे हवे आहे, कोणाला तरी ते सतत हाक मारीत असते–असे म्हटलेले आहे. परंतु कारण अगम्य असल्याने या वेदनेवर कोणतेही औषध नाही.

हीच भावना ‘ निराशा ’ मध्ये अधिक तीव्रपणाने प्रकट होते. सभोवारच्या सृष्टीत नाना प्रकारची सौंदर्यें असूनही ---

परि हृदयीं नैराश्यकालिमा
मम खंडित नाही

अशी कविमनाची अवस्था होते. या अगतिकतेमुळे सारे जीवनच एखाद्या भयानक स्वप्नासारखे वाटू लागते.

सृष्टीतील सौंदर्यविलास पाहून बेभान होणाऱ्या, त्याची मनोमन उपासना करणाऱ्या कवीलाही केव्हा केव्हा ते सौंदर्य जड आणि निःसत्त्व वाटत होते. उदासीनता ही बाल-कवींच्या कवितेची एक मूल प्रवृत्ती आहे. सामान्यतः सृष्टीच्या संगतीत ही उदासीनता मावळे आणि मन निरायम आनंदाने भरून जात असे. पण काही वेळा–विशेषतः प्रौढा-वस्थेत–अंतरात घर करून बसलेली निराशा सृष्टिसौंदर्यावर व प्रेमावरही मात करीत असे.

## ४७. पारवा

एका अतिशय सुन्दर शब्दचित्राने या कवितेचा प्रारंभ झाला आहे. पहिल्या तीन कडव्यांतील, उद्ध्वस्त इमारतीत बसून नीरस एकांतगीत गाणाऱ्या पारव्याचे चित्र फार समर्थपणाने रेखाटण्यात आले आहे. पुढील कविता आणि तिच्यातील दुःख-निद्रेची कल्पना मात्र अस्पष्ट व गोंधळाची आहे.

## ४८. खेड्यांतील एक रात्र

भयाची भावना मनात संक्रांत करू शकणारे शब्दचित्र या छोट्या कवितेत फार प्रभावी रीतीने चितारण्यात आले आहे. थोड्या शब्दांत संपूर्ण दृश्य पकडण्याची बाल-कवींची समर्थता ‘ औदुंबर ’ प्रमाणेच या कवितेतही प्रकट होते. वातावरणास विशिष्ट रंग देण्याचा प्रयत्न या कवितेत औदुंबरापेक्षा अधिक आहे.

## ४९. कवीची इच्छा

पकड घेणाऱ्या ओळींनी या गज्जलाची सुरुवात होते. पार्थिव व्यवहारापासून दूर जाण्याची तीव्र इच्छा पुढील कवितेत व्यक्त होते. शेवटच्या ओळीवरून कवितेचा रोख

खऱ्या प्रीतीकडे आहे, आणि जगाचे बंध तोडून या प्रीतीकडे कवीला जायचे आहे, असा अंदाज बांधता येतो. पण कविता अपूर्ण असल्याने हा केवळ अंदाजच समजायला हवा. कवितेची रचना स्थूल आणि सांकेतिक आहे.

## ५०. मोहिनी

एका अपूर्ण कथाकाव्याचा हा प्रारंभिक भाग आहे. बालकवींची प्रतिभा कथाकाव्याला फारशी अनुकूल नव्हती. त्यामुळे त्यातील निसर्गवर्णनांच्या वा प्रेमप्रसंगांच्या लेखनापलीकडे ही काव्ये गेलेली नाहीत. ' चाफेकळी ' मध्ये एक हृदयंगम संवाद आहे तर प्रस्तुत कवितेत सुरुवातीला निसर्गाचे आणि नंतर नायकाचे वर्णन आहे. या दोन्ही ठिकाणी कवीची प्रभावी वर्णनशैली आपल्याला जाणवते. विजयसिंहाच्या वर्णनात चित्र निर्माण करण्याचे त्याचे सामर्थ्यही प्रत्ययाला येते.

## ५१. हृदयाची गुंतागुंत

स्वप्नसृष्टीतून बाहेर पडलेल्या मनाची निराधार आणि विकल अवस्था ही या कवितेचा विषय आहे; कविता अपूर्ण असली तरी त्यामुळे तिचा आशय समजण्यास व्यत्यय येत नाही. अज्ञान समजणे हे ज्ञानाचे लक्षण आहे असे म्हणतात. अशा एका ज्ञानावस्थेत आणि तिच्यातून उद्भवणाऱ्या व्याकुलतेत या कवितेचा जन्म झाला आहे. या अवस्थेत तात्त्विक शब्दावडंबर निकामी वाटू लागले आहे, आकाशपृथ्वीवरील सौंदर्ये रसहीन होतात, वैराग्यावर विश्वास बसत नाही आणि प्रीती निरर्थक वाटू लागली आहे' त्यागही पटत नाही, भोगही रुचत नाही. श्रद्धा आणि अश्रद्धा–दोन्हीशी जमत नाही. अशा भयंकर भ्रांत स्थितीत मन सापडल्यावर ते तळमळून म्हणते :

मज व्यर्थ नको तीं अमरपणाचीं गाणीं
कुणि उठवा असल्या गहनांतुनि हलवोनी.

उदासीन व निराशा या कवितांतील जाणीवेचा या कवितेत अधिक विस्तार झालेला आहे. बालकवींच्या वृत्तीतील मावळणारे शैशव आणि उगविणारी प्रौढावस्था यांच्यातील संघर्षाचे चित्र या कवितेत अधिक स्पष्टपणाने उमटले आहे. निसर्गातील शिव-

सुंदराच्या स्वप्नकोषात रमणारे कविमन जेव्हा वाढत्या वयात त्यातून बाहेर आले तेव्हा आपल्या स्वप्नांशी विसंवादी व विरोधी असलेले वास्तव त्यांच्या दृष्टीला पडले आणि ते भांबावून गेले. या वास्तवाला तोंड देण्याची वा त्यातीलही ' काव्य ' समजावून घेण्याची तयारी त्यांनी कधी केलेली नव्हती. केशवसुत प्रारंभापासून वास्तवाशी झगडत होते आणि त्यासंबंधीच्या अनुकूल-प्रतिकूल प्रतिक्रियांतूनच त्यांची कविता आकारत होती. बालकवींच्या बाबतीत हे संभवनीयच नव्हते. त्यांच्या या ( उत्तर काळातील ) भ्रांत व अगतिक मनःस्थितीचा या कवितेत झालेला आविष्कार महत्त्वाचा मानायला हवा.

## ५२. मेघांचा कापूस

कवीच्या प्रारंभकाळाला साजेल अशी ही एक कविता. कविता अपूर्णच आहे; पण तिच्यात आत्मानुभूतीपेक्षा कल्पकतेवरच अधिक भर दिलेला आहे हे ध्यानात येते.

## ५३. औदुंबर

बालकवींच्या सर्वोत्कृष्ट कवितांत सहजतेने गणना व्हावी इतकी अकृत्रिम सुंदरता या छोट्या काव्यात आहे.

डोळयांना दिसलेल्या आणि अंतःकरणाला जाणवलेल्या एका मनोरम दृश्याचे वर्णन कवितेत करण्यात आले आहे. कवितेचा विस्तार अवघ्या आठ ओळींचा आहे. पण तिच्यातील शब्दांचा प्रभाव इतका मोठा आहे की, त्याच्यातील शब्दपणा नाहीसा होतो आणि सारी कविता एका मनोहर तजबिरीचे रूप धारण करते. अनुभवाशी एकजीव झालेले शब्द त्याच्या प्रवाहात कसे विरघळून, वितळून जातात याचे उत्तम उदाहरण या कवितेमध्ये मिळते.

कवितेतील सात ओळी विविध रंग भरलेल्या छायाचित्रासारख्या आहेत. हिरवी कुरणे, निळा झरा, पांढरी पायवाट आणि काळा डोह. सृष्टीत एकरूप झालेल्या रंगांची उकल होते आणि ते पुन्हा एकत्र होऊन मूळ दृश्याची अधिक सुंदर अशी प्रतिकृती निर्माण करतात. पुन्हा बेटाबेटातून वाहणारा झरा, चिमुकले गाव, शेतमळ्यांची हिरवी गर्दी, आडवीतिडवी पायवाट, झाकळलेला डोह इत्यादिकांनी या दृश्याला स्वभाव देऊन त्याची पूर्णता केली आहे.

परंतु देऊळ कळसाकडे चढत जावे त्याप्रमाणे सारी कविता शेवटल्या ओळीकडे, तिच्यातील औदुंबराकडे चढत गेली आहे. कवीला जाणवलेल्या साऱ्या दृश्यावर स्वामित्व गाजविणारा औदुंबर सर्व कवितेवरही आपल्या वर्चस्वाचे शिक्कामोर्तब करतो. कवितेचे छायाचित्राचे रूप संपते आणि ' पाय टाकुनी जळात बसला ' या शब्दांनी एक मनोरम जिवंतपणा त्या दृश्यामध्ये निर्माण होतो. पाय टाकुनी जळात बसला – एखाद्या मुलाप्रमाणे, एखाद्या कवीप्रमाणे, एखाद्या समाधानी निरुद्योगी माणसाप्रमाणे, एखाद्या तत्त्ववेत्त्याप्रमाणेही. या चार शब्दांच्या मागोमाग कितीतरी कल्पना, कितीतरी सूचना धावत येतात !

## ५४. शून्य मनाचा घुमट

निराशा, उदासीनता इ. कवितांतील अस्वस्थ मनःस्थितीच या कवितेत व्यक्त होते. त्यासाठी घुमटाच्या कल्पनेचा आश्रय घेण्यात आला आहे. बाहेरून येणारे स्वर या घुमटामध्ये घुमतात, प्रतिसाद उत्पन्न करतात. परंतु त्यांच्या भुतांसारखे. जगातील सारी रूपे आणि सारे ध्वनी भेसूर स्वरूप धारण करून मनाच्या या घुमटात प्रवेश करतात. घुमटाची कल्पना चांगली आहे पण तिचा विस्तार अकारण वाटतो.

## ५५. विश्वाचा प्रवास

रात्रीच्या आगमनाचा उत्सव अनेक उत्प्रेक्षांच्या द्वारा या कवितेत साजरा करण्यात आला आहे. बहुतेक सर्व कल्पना हृदयंगम आणि काव्यमय आहेत. कविता अपूर्ण म्हटली असली तरी – आहे त्या स्वरूपात पूर्ण झाल्यासारखी वाटते. ' विश्वाचा प्रवास ' हा मथळा मात्र संदर्भहीन आहे. बहुधा, ' रात्र विश्वाच्या प्रवासाला निघाली आहे ' अशी कल्पना असावी.

## ५६. संशय

' संशय ' या कवितेचा विषय सर्वसाधारण असला तरी तीव्रतेने व्यक्त झाला आहे. जीवनातील ज्या विविध सौंदर्यांची व शक्तीची आपण पूजाअर्चा केली त्यांपैकी

एखादी तरी मरणसमयी आपल्या मनाला दिलासा देईल का, हा संशय कविमनाला व्यथित करीत आहे.

**५७. जिज्ञासू**

कविता ईश्वराला उद्देशून लिहिली आहे.

अपूर्णतेनें पूर्ण निराशा हृदयाची होते
अमृत मुखाशीं नेतां नेतां विषमय हो येथें

ऐहिक जीवनाच्या या अनुभवाने अंतःकरण विद्ध झाले आहे. खराखुरा आनंद अस्तित्वात असतो का सारेच आभासात्मक आहे ? तत्त्वज्ञानांच्या भूलभुलाईत शोध घ्यावा तर तेथेही निश्चित उत्तर व समाधान समजत नाही. ‘ हृदयाची गुंतागुंत ’ या कवितेत हाच आशय पण अधिक समर्थपणाने प्रकट झाला आहे. कविता अपूर्ण असावी असे वाटते.

■ ■ ■

# सूची

## कवितांच्या पहिल्या ओळींची सूची


अ

अनंत तारा नक्षत्रें, हीं अनंत या गगनांत ६९
अंधकार मातला, वेष्टितसे भूतला ८२
अव्यक्तांतील दूरदूरच्या शांत गुहेंतून १०२
अस्तगिरीच्या अभिनव कुंजीं निजला निजनाथ १३
आद्य ऋत्वींनी जी केली ५२
आनंदी आनंद गडे १
आयुष्याच्या प्रभातकालीं ३६
ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन १००

क

कसें हाकारूं । शीडाविण दुबळें तारूं ? ६४
कुणि नाहीं ग, कुणि नाहीं २०
केव्हा मारूनि उंच भरारी ३५
कोठुनि येतें मला कळेना ८८

ग

गर्द सभोंती रान साजणी तूं तर चाफेकळी ८५
गाणें हें रचिलें असें जुळवुनी कोठून कांहीं तरी ८०
गिरिशिखरें वनमालाही ७
गेले भंगुनि दुर्ग, दुर्गगिरीचीं गेलीं झरोनी शिरें ८१

ज

जगाचे बंध कोणाला ? ९३

त

तुला बघावें गुंगावें गुंगतची चुंबुनि घ्यावें ४५
त्या उजाड माळावरती ९२

थ

थबथबली, ओथंबुनि खालीं आली ८७

द

दिनरजनीच्या हृदयावरलें २३
दुर्ग भयंकर जीर्ण पसरला पुढती तो गतकालीं ८४
दोष असती जगतांत किती याचें ८३

प–फ

पांखरा गाइलें, तुला कधींहि न कोणी ३९
पूर्व समुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची ३
प्रभातकालीं काव्यतारका सोज्ज्वल गगनांत ७०
प्रीति हवी तर जीव आधिं कर अपुला कुरबान ८६
प्रिय कविते अमरसुते तेजाची तूंच उज्ज्वले खाणी ४८
प्रेमावांचुनि सर्व सुनें ७६
फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा ९९

ब–भ

बोलवितात । विक्राळ यमाचे दूत ६२
ब्रह्मांडावरि नित्य नूतन अशीं चित्रें सुरम्यें किती ७८
भिंत खचली, कलथून खांब गेला ९०

म

मधुयामिनी नील–लता १२
मनोवेधका सृष्टिसतीच्या अगा चिमुकल्या बाला ३३
मी न जगाचा, मी न कुणाचा, मी नच माझा माझा ५१

मेघाचें करीं भूर्जपत्र धरुनी अस्ताचलीं प्रत्यहीं ७९
मृत्यू येइल जेधवां पसरुनी विक्राळ दाढा पुढें १०३

### य-श

या शुभ्र विरल अभ्रांचें ९४
रात्र संपली दिवसहि गेले ८९
वस्तुवस्तुमधीं काव्य विलसतें ४७
विमल चंद्रिका क्षितिजावरतीं ३१
वेडा झाला म्हणा हवें तर उठला जनतेंतूनी ४३
शून्य मनाच्या घुमटांत १०१
श्रमलें दमलें वणवण फिरुनी गगनीं रविकरजाल ६६
श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोहिंकडे २५

### स

सख्या वाचका गीत कवीचें ऐकुनिया निज कानीं ५०
सांज खुले, सोन्याहुनि पिवळें हें पडलें ऊन २८
सुमनांच्या गर्भामाजी ४२
सौंदर्य शब्दातीत-स्वर्भूवर अवतरतात ६८
सृष्टि निमाली स्वर्गहि नुरले १९
स्वर्गाच्या तेजोगर्भी ७१

### ह

हारवलें तें परकें झालें, मी शोधित फिरतों त्याला ७५
हिरवे हिरवे गार गालिचे १६
हें फूल या उडत्या स्वर्गांतील २६
हे योगीशा मोहमूढ मी नर दुर्बल दीन १०४
हृदयाची गुंतागुंत कशी उकलावी ? ९६



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २२३८८

# टीपा

## कवितांच्या तळटीपा

पृष्ठ

४ १. कर्षति इति कृष्णः; अर्थात् ज्याचे किरण सर्वंकष आहेत असा जो सूर्य तो कृष्ण.

१९ १. उन्मलित.

२० १. सुंदर तें नटवून, कोमल तें तें खुलवून, २. जग सगळें.
३. दिव्यरवांनीं गाणीं गाउनि, ४. मंदयामिनी.

३० १. हाय ! सुटेना दृढ देहाच्या परि बसल्या गांठी !

३९ १. सोडुनी आम्र जातील.

४० १. परिधान करिती पीतांबर कटिभागीं; २. गाईल; ३ डुलवोनी

४१ १. गाऊन.

४५ १. झोल.

४६ १. सत्याचें स्वप्न पहावें । सत्यानें स्वप्नें व्हावें ॥ २. नाही.
३. प्रेमें मी गुंगे गानीं

५४ १. प्राणावरती.

५६ २. हीं मरणाचीं, ३. साची, ४. जगताचीं, ५. सत्यधर्म

५८ १. हिंदुस्तान. २ हिंदुस्तानी.

५९ १. रूढि, २. सगळ्या विश्वाचे नेते.

६१ १. कवि हे, २. कांहीं, ३. कीर्तीची चाडहि नाहीं.

६७ १. फिरतां तव प्रेमांकित हात.

६८ १. कौमुदीसहवासी.

८४ १. पुढें, जेथ गतकालीं.

८६ १. त्या जहरी प्यायाला.

९४ १. मंजु मंजु.

१०३ १. मरे.

REFBK-0021498